CC-O. In Public Domain. Digitized by eGan

ॐ

आत्मज्ञानाची गुरुकिल्ली



Sri V Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अध्यात्म भांडार ग्रंथमालेचे संस्थापक:

श्री सद्‌गुरु गणपतराव महाराज, कन्नूर.

आत्मज्ञानाची गुरुकिल्ली

*

वक्ते:

श्री समर्थ सद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज, पात्री.

लेखक:

ब्र. भू. दत्तात्रय धर्मय्या पोरेडी, वकील, सोलापूर.

संपादक:

श्री सद्‌गुरु गणपतराव महाराज, कन्नूर.

सोऽहं हंसः

अध्यात्म भांडार

शांति कुटीर, कन्नूर

१९८६

किंमत रु. ११-००

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकाशक :

वेंकटेश यजमान,

गौरव कार्यदर्शी

अध्यात्म भांडार, शांति कुटीर

कन्नूर.

जिल्हा-विजापूर (कर्नाटक)

© Copy Rights Reserved

१२ वे मुद्रण १९८४

१३ वे मुद्रण १९८६

मुद्रक :

मोहनराव चि. कुलकर्णी

विजयलक्ष्मी आर्ट प्रिंटर्स,

होरी गल्ली - बेळगांव. (कर्नाटक)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रस्तावना

(दुसऱ्या आवृत्तीची)

'आत्मज्ञानाची गुरुकिल्ली' (पूर्वीचा सुलभ वेदांत लहरी-भाग २)या ग्रंथावर प्रस्तावना लिहिहिण्याविषयी माझे जेष्ठ गुरुबंधू श्री गणपतराव महाराज यांनीं सुचविले. सुलभ वेदांत लहरी हें नांव काढल्यावरोबर श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराजांच्या प्रवचनांचें लेखक माझे आदरणीय गुरुबंधु ब्र. भू. श्री पोरेडीं, वकील हे माझे मनःचक्षुपुढें दिसू लागले. श्री पोरेडी यांचा या लिखाणाबद्दल "मी फक्त शब्दांची जुळवाजुळव करून फ्रेममेकरचे काम केले आहे." असें लिहिलें असले तरी श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराजांचें वाङ्मय जगास उपलब्ध करून ठेवून ते अजरामर झाले, असेंच म्हणण्यास हरकत नाहीं. प्रत्यक्ष श्रीसद्‌गुरु महाराजानीं श्री पोरेडी यांचे लेखन बघून त्यांची पाठ थोपटली होती. असो.

'आत्मज्ञानाची गुरुकिल्ली'मध्यें चार देहातीत असलेल्या 'मी' चें वर्णन वाचून, जागे झाल्याचा प्रत्यक्ष प्रत्यय येतो. सर्व अध्यात्म शास्त्रानीं त्या 'मी' च्या शोधासाठीं आटोकाट प्रयत्न केले आहेत. पण त्यांना अंत न लागू दिलेल्या 'मी' ला श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराजानीं फार सुलभ शब्दांतच घट्ट आवळून टाकले आहे. आणि या बलाढ्य 'मी' चें पारिपत्य कसें करावें याबद्दल फार सुंदर रितीनें वर्णन केलें आहे. पुष्कळ ग्रंथ माझ्या वाचनांत आले आहेत, परंतु साधनाबद्दल इतकी सुलभता असल्याची ग्वाही मला कोठेच दिसली नाहीं! 'मी' नाशार्थ काय उपाय करावे हें या ग्रंथांत दुसऱ्या कुठल्याहि ग्रंथापेक्षां फारच सुसंगत तऱ्हेनें मांडल्यामुळें, अध्यात्म मार्ग आक्रमण करणाऱ्यास वाटेंतील पाणपोईप्रमाणें यांचा उपयोग होईल, यांत तिळमात्र शंका नाहीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

या ग्रंथांत विषय सुलभांत अति सुलभ करून सांगितले तरी "ते नीट समजत नाहीं" असें कांहीं लोक म्हणत असतात. याला एकच कारण म्हणजे गुरुमुखावांचून उलघडा होणार नाहीं. तरी अहंकाराच्या तडाक्यांतून सुटून आत्मप्राप्ती होण्याकरितां अनुभवी गुरुचा आश्रय करूनच ग्रंथांतील विषय समजून घ्यावे अशी सूचना केल्याशिवाय राहवत नाही.

श्री सद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराजांचें ग्रंथ दुर्मिळ झाले होते. ती दुर्मिळता नाहींसें करण्याचें श्रेय श्री गणपतराव महाराजांनीं साधून एक महत्कार्य केलें असें मला म्हणावेसें वाटतें. 'आत्मज्ञानाची गुरुकिल्ली' याचे वाचनानें साधकास पुष्कळ उपाय सुचतील, व तो नेटानें अभ्यासास प्रवृत्त होईल. प्रस्तावनेच्या निमित्तानें गुरुस्मरण घडविल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

मुंबई **श्री काडसिद्धेश्वरस्वामी महाराज**
ता. २६-२-१९५८ (सिद्धगिरी मठाधिपति)

उपकार स्मरण

मूलतः हें पुस्तक छापण्यास परवानगी दिल्याबद्दल मूलग्रंथाचें लेखक श्री पोरडी वकीक यांचे चिरंजीव श्री रामकृष्ण दत्तात्रय पोरेडी यांचे व प्रकाशक 'सोलापुर समाचर' प्रेस्‌चे मालक रावसाहेब श्री जक्कल यांचे आभार मानणें माझें आद्यकर्तव्य होय. त्यानंतर ह्या २ री आवृत्तीस अत्यंत प्रेमानें व कळकळींनें प्रस्तावना लिहिल्याबद्दल श्री. स. काडसिद्धेश्वरस्वामी महाराज यांचा मी ऋणी आहे. त्याचप्रमाणें ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढण्यास प्रोत्साहन दिलेंले माझ्या प्रेमळ गुरुबंधूनाही मी कृतज्ञ आहे.

मुंबई सद्‌गुरु चरणरज,
ता. १-३-१९५८ **गणपतराव कन्नूर**

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रस्तावना

(पहिल्या आवृत्तीची)

वेदांत लहरीचें पहिलें पुष्प प्रसिद्ध झाल्यावर परमार्थाचें सुसंगतावर असें एक छोटेसे पुस्तक प्रसिद्ध करावें असें मनात आलें व श्री स. सिद्धरामेश्वर महाराजांस तसा धर्तीवर प्रवचन करण्यास विनंती केली आणि त्यांनीं त्याप्रमाणें प्रवचन केले व आमचे मित्र रा. रा. दत्तोपंत पोरेडी यांनीं तें लिहून काढलें म्हणून आज हें दुसरे पुष्प वाचकांपुढें ठेवण्याचा सुयोग आला. याबद्दल वरील दोघांचे आभार मानावे तितके थोडेच आहे. तसेच महाराजांनीं आपल्या अधिकृत व अनुभविक ओजस्वी वाणींनें साधकवर्गास खालील विचारसरणी स्पष्ट मांडून कायमचें ऋणी ठेवले आहे.

१. स्वत:ची विस्मृति व स्वत:च्या ठिकाणी अन्य दर्शन, हाच तो प्रपंच किंवा जीवरूपता किंवा बंधाचे लक्षण.

२. स्वत:ची स्मृति हाच तो परमार्थ किंवा मोक्षाचे लक्षण.

३. स्वत:ची विस्मृति ना स्मृति तेंच जीव-शिवपणरहितता किंवा बंध–मोक्षरहितता अशी सहजवस्था.

४. आपली स्मृति आपल्यास होणें हेंच तें विकृतीचें लक्षण; स्थूल दृष्टीनें आपल्या स्थूल शरीराकडेच पहा. शरीरास नाक, कान, पोट, डोळे, वगैरे अवयव आहेत. पण तीं सर्व इंद्रिये आरोग्य स्थितींत किंवा सहजावस्थेंत आहेत तोपर्यंत त्यांची कोणास आठवण होते काय? आठवण होत नाहीं. म्हणून ती इंद्रियें आपणांस नाहींत असें तरी कोणास वाटेल काय? पण कान ठणकू लागले, पोट दुखू लागलें, डोळेखूपू लागले कीं मग मात्र कानाची, पोटाची, डोळ्याची आठवण होते. याचा अर्थ असाच होतो कीं आपल्या सहज असणेपणांत कशाची तरी आठवण

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

होणें हें वीकृतीचें, रोगाचे लक्षण आहे असे खास समजावे. त्याप्रमाणे आपल्या सहज ज्ञानमात्र स्वरूपांत 'मी ब्रह्म आहे, मी ज्ञानस्वरूप आहे'. अशी अहंब्रह्म-स्फूर्तिद्वारा आठवण म्हणजेच मूळ स्वरूपांत विकृति होय. ही विकृति म्हणजेच सर्व प्रपंच–परमार्थाची, किंवा भवरोगाचे महाकारणरूप मूळ प्रकृति होय. मूळ स्वरूपाचे दृष्टिनें प्रपंच व परमार्थ हे दोन्ही मिळून प्रपंचच होय. प्रपंच हा लहान स्वार्थ तर परमार्थ हा मोठा स्वार्थ असेल; पण दोन्हीं ठिकाणीं अहंकार सारखाच नांदत असल्यामुळें मूळ स्वरूपांत दोन्हींचा विटाळच आहे. देहाच्या ठिकाणीं मीपणा स्थापणारा जीव ब्रह्माचे ठिकाणीं मीपणा स्थापून त्यानें स्वतःस शिव म्हणून घेतले तरी मीपणाचें घर खालीच असल्यामुळे जीवाचीच काय, पण शिवाचीहि शिवपण ओलांडून 'मी' ला पुर्ण तिलांजली देऊन अलीकडे आल्याशिवाय स्वरूपप्राप्तीचें नांवानें आवळचाएवढें पूज्य! या एकाच गोष्टीचे साग्र विवरण या दुसऱ्या पुष्पांतून श्री महाराजानीं केले असून "मी देह, मी मन, मी कारणरूप–अज्ञान, मी महाकारणरूप ज्ञान," असे म्हणत घोरत पडलेल्या जीवास "यापैकीं तूं कोणी नव्हे," असे सांगून त्यास हालवून जागें केले आहे. सबब "काय वानू मी या संताचे उपकार । मज निरंतर जागविती" या पेक्षां मी तरी जास्त काय बोलणार?

विठ्ठल नरसाप्पा जक्कल.
सोलापूर समाचार प्रेस्चे मालक
सोलापूर

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीसद्गुरु सिद्धरामेश्वर महाराजांचें संक्षिप्त चरित्र

श्री सिद्धरामेश्वर महाराज* यांचा जन्म सोलापूरच्या पश्चिमेस १० मैलावर असलेल्या पात्री मुक्कामीं झाला. त्यांच्या पाचवीच्या दिवशीं त्यांच्या आजीबाईच्या स्वप्नांत सोलापुरी प्रसिद्ध असलेला देव **सिद्धरामेश्वर** ह्यांनीं सांगितलें कीं, **"ह्या बालकाचें नांव सिद्धरामेश्वर ठेव"**. त्या प्रमाणें आजीबाईनी **सिद्धरामप्पा** हे नांव ठेविले. पुढे **सिद्धरामप्पा** सोलापूरी शाळेंत अभ्यास करीत असतांना त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी स्वप्नांत **श्री सिद्धेश्वर व रेवण (नाथ) सिद्धेश्वर** यांनी येऊन महाप्रसाद म्हणून गुळांत भिजविलेल्या डाळीचा प्रसाद दिला. ह्यांचा अभ्यास अती थोडा झाला. लहानपणापासून ह्यांना परमार्थाचा नाद होता. शाळेंतील अल्प अभ्यास संपवून ह्यांनीं नोकरी पत्करली. नोकरीच्या निमित्तानें विजापुरास गेलें असता तेथें **श्री. स. भाऊसाहेब** महाराजांचा अनुग्रह घेतला. **श्री भाऊसाहेब** महाराज सोमवार व गुरुवारी गुरूपदेश देत होते. **सिद्धरामेश्वर** महाराज शनिवारी गुरूपदेश घेण्यास गेले. तेव्हां **भाऊसाहेब** महाराजांनीं असें उद्गार काढिले कीं, **"हा फार भाग्यवान पुरुष असून ह्याच्यानें जगावर ज्ञान प्रकाश पडणार आहे, या करितां याला आजच नाम (उपदेश) देऊन यानिमित्तानें आतां पासून पुढे शनिवारीही गुरूपदेश देण्यास सुरवात करतों."** असें म्हणून गुरूपदेश देत झाले. पुढें **सिद्धरामेश्वर** महाराजांनीं गुरुनें सांगितल्याप्रमाणें साधन करून साक्षात्कार मिळविला. सांप्रदाय नियमाप्रमाणें दर सप्ताहांत हिंचगेरीस जाऊन साधन करून निरूपण ऐकण्याविषयीं अति दक्षता ठेविली. ह्यांच्यावर गुरुकृपा

* यांच्या पिताचे नांव श्री गंगाधरप्पा कोले, मातोश्रीचे नांव पार्वतीबाई होते.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अतिशय होती. श्री सद्‌गुरु भाऊसाहेब महाराजांनीं देह ठेविल्या-नंतर **सिद्धरामेश्वर महाराज, गिरिमल्लेश्वर, व्यंकटराव व राम-राव** महाराज यांना गुरु अज्ञा झाली कीं, "लोकांवर अनुग्रह करून परमार्थ वाढवा." गुरुआज्ञेप्रमाणें ह्या चौघांनी मिळून भक्ति वाढविली. **गिरिमलेश्वर** महाराज लोकोद्धारार्थ जमखंडीकडे गेले व **सिद्धरामेश्वर** महाराज यांच्या मनांत पूर्णता मिळवून पर-मानंद घ्यावा अशी प्रबळ इच्छा झाल्याकारणानें लोकोद्धाराचें कार्य थोडचा दिवसाकरितां तहकुब ठेऊन त्यांनीं एकांतवास पत्करिला. **सिद्धरामेश्वर** महाराजांनीं अर्हनिशी साधन करून साधन पुष्कळ वाढविलें. त्यावेळीं त्यांना पुष्कळ विघ्नें आली. पण कशालाही न जुमानतां त्यानी आपलें साधन सारखे वाढविलें. आणि त्यांत पूर्ण अनुभव मिळवून आपलें परम समाधान झाल्यावर गुरुआज्ञेनें लोकोद्धाराच्या कामास सुरवात केली. पण साधनाचे वेळीं त्यांचे शरीर इतकें कृश झालें होतें कीं, देह थोडे दिवसही टिकतो कीं नाहीं अशी पुष्कळांस धास्ती वाटू लागली. पण गुरु-कृपाच ती! पुन्हा शरीर हळूहळू सुधारून प्रकृती लोककल्याण करण्यास योग्य झाली. मग **सिद्धरामेश्वर** महाराजांनीं आपल्याला मिळालेल्या परमार्थाचा अनुभव लोकांस व्हावा याकडे लक्ष दिलें आणि लोकांना उपदेश देऊन परमार्थ वाढविला. ह्यांचें पुष्कळ शिष्य सोलापूर, बागेवाडी, मुंबई, विजापूर वगैरे ठिकाणीं आहेत. ठिकठिकाणीं यांचे शिष्य मंडळींचा जमाव पुष्कळ आहे. ह्यांच्या शिष्य मंडळीत ज्ञान व अनुभव अती उच्च कोटीचा आहे.

श्री स. सिद्धरामेश्वर महाराजांचें वक्तृत्व अस्खलित व अनुभव पूर्ण असून अत्यंत परिणामकारक असें. महाराजश्रींची निरूपण शैली इतकी सरळ व गोड असे कीं, लहान मुलें सुद्धां वेदांतासारखा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



ब्र. भू. श्री स. स. सिद्धरामेश्वर महाराज, पात्री.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

समाधि, इ. स. १९३६.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



विद्यमान श्रीसद्‌गुरु गणपतराव महाराज
शांति कुटीर, कन्नूर.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गह्य विषय फार प्रेमानें व सुलभ रीतीनें ग्रहण करीत. महा-राजानीं ब्रह्मनिरूपण करितांना प्रत्यक्ष ब्रह्माचें अनुसंधान दाखवून समजावीत. त्यांच्या निरूपणाला मुंबईत नित्यशः हजारों लोक जमत असत. त्यांच्या शिष्यवर्गातील दहा-बारा जणांनीं त्यांच्या निरूपणांतील बहुतेक भाग हातानें लिहून घेतला आहे. आणि श्री महाराजांनीं वेदांताचें अनुभवपूर्ण प्रतिपादन केलेले बोध त्यांच्या पश्चात साधकांना ग्रंथरुपानें लाभले आहे. असो.

आधीं ब्रह्म प्रत्यक्ष दावा । मग तुम्हीं वेदान्त गावा ॥

या उक्तिप्रमाणें श्रोत्यांना प्रत्यक्ष अनुभव येईल अशा रीतीनें स्पष्टीकरण करीत असत.

श्री स. महाराज हे कोणाही मनुष्याकडून कोणत्याही प्रकारची भेट किंवा दक्षिणा घेत नसत. ह्यांच्या सांप्रदायाची प्रतिज्ञाच अशी आहे कीं, **आमची प्रतिज्ञा ऐशी कांहीं न मागणें शिष्यांसी । आमची मागणी भगवंतासी । तो सर्वकाळ पुरवीतसे ॥** ह्या प्रतिज्ञेनें श्री महाराज यांनी जगदुद्धार करण्याचा दंड हाती धरिला.

श्री सिद्धरामेश्वर महाराजांची राहणी फार वैभवशाली होती. त्यांचे विविध तऱ्हेचे पोषाक व त्यांच्या कलापूर्ण आणि सुंदर नित्योपयोगी वस्तूनीं लोकांचें मन वेधून घेतले जाई. त्यांनीं आपले सद्‌गुरूचें स्थानही तशाच वैभव व कलापूर्ण वस्तूनीं सज-विले. देऊळांतील भव्य सभामंडपाच्या भिंतीवर सर्वत्र रंग देऊन सद्‌गुरूंची उत्तम चित्रें त्यावर काढविलीं. या शिवाय श्री सद्‌गुरु गुरुलिंगजंगम महाराज व श्री सद्‌गुरु भाऊसाहेब महाराज यांच्या समाधीना चांदीचे मखर, मुखवटे व सोन्याची किरीटे करविली. तसेंच चांदीचीं पालखी आणि मखमलीची जरीची छत्री करवून श्री गुरुचें वैभव त्यांनी वाढविलें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्री सिद्धरामेश्वर महाराजांनीं सतत १२ वर्षं शिष्यांना बोध करून शेवटीं विज्ञान स्थितीचा उपदेश केला. हजारों साधकांस कृत्यकृत्य करून पुढें अल्पकाळांतच ते मुंबई येथें आश्विन वद्य ११, शके १८५८, या दिवशीं समाधिस्थ झाले. त्यांचा दहनविधी मुंबईत वाळकेश्वर येथें बाणगंगेला झाला. नंतर त्यांच्या अस्थीची स्थापना श्री महाराजांचे अनुग्रहीत सिद्धगिरी श्री स्वामी महाराज यांचे सांगण्यावरून बागेवाडीं येथें केली. सध्या बागेवाडींत दरसाल आश्विन वद्य ७ ते ११ पर्यंत ५ दिवसांच्या पुण्यतिथीचा सप्ताह करण्यांत येतो. शिवाय तेथें आषाढ शु. १३ पासून पौर्णिमेपर्यंत ३ दिवसांचा गुरुपौर्णिमाचा उत्सव साजरा होतो.

श्री सद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराजांच्या शिष्यवर्गात मुख्यत्वेकरून या सांप्रदायाचे आदिपूरुष **श्री काडसिद्धेश्रव महाराज** यांच्या पीठावरील सध्याचे श्रीस्वामी महाराज व यांच्या शिवाय खाली दिल्या प्रमाणे श्रींचे अधिकारी शिष्यानीं गुरुस्थानावर भूषण होऊन गुरुभक्ति अत्यंत उत्साहाने प्रसार सध्या करीतही आहेत.

१) विद्यमान् श्री सद्‌गुरु गणपतराव महाराज, शांतिकुटीर, कन्नूर. (कर्नाटक–महाराष्ट्र)

२) ,, श्री स. विलासानंद महाराज आग्रा (यु. पी.)

३) ,, श्री स. रणजित महाराज, मुंबई–४

४) ,, श्री स. ताईसाहेब महाराज अमडोसी (रायगड–जिल्हा)

५) ,, श्री स. बाळकृष्ण महाराज, डिंगर आळी, (नासिक, गोवा, कोंकण, गुजराथ)

६) ,, श्री. स. बाबूलाल महाराज वखारिया, मुंबई

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विद्यमान श्रीसद्‌गुरु गणपतराव महाराज यांचे संक्षिप्त दिव्य जीवन दर्शन.

श्रीसद्‌गुरु गणपतराव महाराज यांचे विषयीं सांगायचें म्हणजे माझ्या जीवनांतील तो एक भाग्याचा दिवस उजाडला असा मला अत्यानंद होत आहे, म्हणून हे परम सुखाचें निधान 'अध्यात्म भांडार' आज आपणापुढें उघडे करण्याची परवानगी घेत आहे.

हे भक्तोद्धारक श्रीसद्‌गुरु श्री शके १९३० भाद्रपद शुद्ध गणेशचतुर्थी या शुभदिनीं विजापूर जिल्ह्यांतील कन्नूर गांवी कुलकर्णी यांचे घराण्यांतील सुशील संपन्न श्री दत्तभक्त श्री शिवरामपंत यांच्या पुत्रपंचकांतील तृतीय संतान होऊन जन्मले. जन्मत:च त्यांची बुद्धी प्रखर व शांत असल्यामुळें ते सर्वांच्या आवडीचे झाले. लहान वयांतच त्यांना श्रीराम दर्शनाचा उत्कंठा लागून राहिली होती. ती दिवसानुदिवस वाढतच गेली. विद्यार्जनाची काळी तें नेहमी प्रथम श्रेणीतच चमकले. यांची ती देवदर्शनाची तीव्र उत्कंठा जणु जाणूनच श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज यांनीं त्यांना बाल वयांतच अवघ्या तेराव्या वर्षी गुरूपदेश केला. त्यानंतर त्यांनां देवदर्शनाचे सत्यस्वरूप काय आहे तें समजून घेतले आणि आत्मानुसंधानानें आत्मरामाचे दर्शन घेतले व तें साक्षात्कारी सिद्धपदाला पोचले. श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज यांनीं अनेक शिष्योत्तमांना आपल्या गुरु परंपरेचा संस्कार दिला. आणि त्यांचा शिष्यवर्ग कर्नाटक, महाराष्ट्र प्रातांत सर्वत्र पसरलेला आहे.

पुढें सद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज यांनीं इ. स. १९३६ साली आपली कुडी गुरुचरणी विलीन केल्यानंतर त्याच्या अधिकारी शिष्यांनीं सिद्धगिरी, मुंबई आग्रा, बसवनबागेवाडी,

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri
कारवार, सोलापूर, नागपूर अशी प्रभृति प्रमूख शहरी अव्याहत गुरुभक्ति प्रचार चालविला सध्या चालवीतही आहेत. त्याप्रमाणें सद्गुरु परंपरेचे प्रमुख केंद्र श्री क्षेत्र शांतिकुटीर कन्नूर येथील श्री सद्गुरु गणपतराव महाराज आपल्या सद्गुरुकृपेनें भक्तोद्धाराचे कार्य सहज लीलेनें चालवून आपल्या शिष्यगणाला आत्मनंदाची पक्वान्ने वाढीत आहेत. श्री सद्गुरु गणपतराव महाराज हें आजन्म ब्रह्मचारी व आधुनिक बि. एस्सी. पदवीधर असून आत्मसाक्षात्कारी पुरुष असल्यामुळें सर्वांच्या प्रितीचे स्थान व आत्मीय झाले आहेत. त्यांचे नांव माहीत नाहीं असा मनुष्य विरळाच! आपल्या लोकसंग्रहाच्या कामीं या आमच्या सद्गुरुनीं स्वानुभव सुविचार वाढीसाठीं व आत्मसुख मिळवून देण्यासाठीं सर्वांना सुगम सहज समजण्यासारख्या भाषेंत कन्नड व मराठीमध्यें सुमारे चाळीस पुस्तके लिहिली आहेत. शुद्धबुद्धीच्या जिज्ञासूना यांचे ग्रंथ म्हणजे एक वरच मिळाला असे म्हणण्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. सामन्यत: या सर्वच ग्रंथाच्या वरील दोन्ही भाषांतून पुरेशा पुनरावृत्ती निघाल्या आहेत. त्यावरून त्यांच्या प्रतिपादनाची लोकप्रियता सहज समजून येईल. त्यांच्या कार्याचें क्षेत्र कन्नूरजवळील आपल्या शेतीवर उभारलेला आश्रम 'शांति कुटीर' बनले आहे, आणि या इमारती जवळच श्री सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे सर्व भक्तगणांच्या 'श्रीसद्गुरु सेवा समिती' मार्फत ४५ खोलीचे 'भक्त निवास' साधकासाठी बांधले आहेत. म्हणून येथें सुद्धां कित्येक शिष्य आत्म-शांती मिळविण्यासाठी येऊन राहात असतात.

श्रीसद्गुरु महाराजा विषयी किती लिहावे तितके थोडेंच आहे! त्यांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षण आहे. त्यांची वाणी रसाळ, मुद्रा प्रभावी व शांतदर्शन आहे. त्यामुळे त्यांचें साक्षात् दर्शन होणें हाच एक परमानंद आहे. तितके सांगून ही लेखणीं गुरुचरणी ठेवीत आहे.

—प्रकाशक

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकाशकांचे निवेदन

* * *

श्री सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराज यांनीं आपल्या महानिर्वाणापूर्वी नित्यशः रोज एक याप्रमाणें जी चौदा निरूपणें आपल्या शिष्यगणापुढे केली, त्यांचे संकलन व काव्यानुवाद ब्र. भू दत्तात्रय धर्यय्या पोरेडी, वकील सोलापूर यांनीं "विज्ञान बोध लहरी" या नांवाखाली छापून तें १९३६ सालीच प्रसिद्ध केले होतें. त्याची आवृत्ती यापूर्वीच संपवून गेली, व हल्ली ती दुर्मिळ झाली आहे. या ग्रंथाची पुनर्मुद्रणें सद्गुरु महाराजांचें सच्छिष्य श्री स. गणपतराव महाराजांनीं पूर्वी छापून प्रकाशित केली होती. आतां तीहि वाचकांस मिळेनाशी झाली आहेत म्हणून त्या लघु-ग्रंथाची नवी आवृत्तीं छापण्यापेक्षां त्याचा (सद्गुरु महाराजांच्या) या ग्रंथातच अंतर्भाव करावा व सद्गुरुंची वाक्सुधां आकंठ प्राशन करतां यावी या कल्पनेनें त्या ग्रंथाची नित्य पाठास गरज सद्गुरु महाराजांच्या भक्तांना भासू लागल्यामुळे तो 'विज्ञान बोध लहरी' ग्रंथच आकारानें लहान असला तरी बहुमोल असल्यामुळें, प्रस्तुत 'आत्मज्ञानाची गुरुकिल्ली' या ग्रंथाचा दुसरा भाग म्हणून येथेच घेतला आहे आणि सद्गुरु महाराजांच्या सर्व भक्त मंडळींना ही कल्पना आवडेल असा आमचा विश्वास आहे.

आजवर महाराजांचे ग्रंथ त्यांच्याच प्रेरणेने प्रकाशीत होत आले असले तरी देखील कार्य सुलभ होण्यासाठी म्हणून या 'अध्यात्म भांडार' मालेंतील ग्रंथाचे प्रकाशन इ. स. १९६० सालापासून करण्याचें कार्य त्यांच्या वरद अनुज्ञेनें करण्याचे भाग्य

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मला लाभले आहे व त्या गुरुकृपेच्या आज्ञेला अनुसरून मी ग्रंथ जनतेपुढें त्यांचा आदेश म्हणून ठेवीत आहे. त्याचा सदुपयोग सर्वांना व्हावा अशी नम्र विनंति आहे.

या ग्रंथ मुद्रणाचे काम विजयलक्ष्मी आर्ट प्रिंटर्सचे मालक श्री मोहनराव चिदंबर कुलकर्णी यानीं सुबक रीतीने मुद्रण करून दिल्याबद्दल त्यांचे व नौकरवर्गाचे मन:पूर्वक आभार मानतो.

—वेंकटेश यजमान

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रमणिका

अनुक्रम नंबर	विषय	पा. न
	ग्रंथाच्या शीर्षिका. प्रस्तावना	I-IV
	श्रीसद्गुरु सिद्धरामेश्वर महाराज यांचे संक्षिप्त चरित्र	३
	श्रीसद्गुरु गणपतराव महाराज यांचे संक्षिप्त दिव्य] जीवन दर्शन	७
	प्रकाशकांचे निवेदन	
	अनुक्रमणिका	११-१६
	आत्मज्ञानाची गुरुकिल्ली भाग १	**१७**
प्रकरण १ × लें.	**आत्मज्ञानाची महती**	**(१७-४०)**
१. १.	गणेश-सरस्वती-सद्गुरूस वंदन	१७
	वस्तु दाखवून वस्तुज्ञान करून देण्याची सांप्रदायिक पद्धति	
१. २. i)*	कळलेले वळण्यास दीर्घ अभ्यास पाहिजे.	१८
ii)	पूर्णपणें वळण्यास किती वेळां वळावें याविषयी विचार	”
१. ३. i)	प्रकरणांतील जिज्ञासा	१९
ii)	जन्मापासून जीवाच्या नाना अवस्था	”
iii)	धन-मान-यौवन-अधिकारादि संपत्तीला खरोखर ज्ञावच सर्वाधार	२१
iv)	ऐहिक सुखाकरितां जीवाचे चार्वाकी वर्तन	”
१. ४. i)	जीव विषयामागे धावता, पण संत अंतर्मुख होतात या निशा सर्वभूतानां....या श्लोकाचा अर्थ	२२
ii)	सुधारणा हे मायेचे महापूर!	२३
iii)	लोकसुधारणा दुःसाध्य-रामदास स्वामी व तुकाराम महाराजांची यासंबंधाने भेट.	२४
१. ५. i)	नाना अभिमानांचें बंधन तुटण्यास आपल्या बद्धपणाचे ज्ञान अत्यावश्य	२५
ii)	ज्ञानाला अधिकारी होण्याकरितां आसुरी संपत्तीचा त्याग केला पाहिजे.	“
iii)	पुढे दैवी संपत्तीचाहि त्याग अवश्य	२६

×मोठा आंकडा प्रकरणदर्शक असून लहान आंकडे प्रकरणांतील विषयदर्शक आहेत. *प्रत्येक विषयाचे विभागदर्शक आहेत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रम नंबर	विषय	पा. नं.
iv)	दैवी संपत्तीनें आसुरी संपत्तीचा त्याग करणें. कांटयानें कांटा काढल्यासारखे	२६
१. ६. i)	ऐहिक संपत्ति सद्‌गुरु उपदेशाचे आड आहे	२७
ii)	सामाजिक कृत्रिम बंधनें	२८
iii)	दुर्गुणांचा प्रथम मानसिक त्याग	२९
iv)	जगन्मिथ्यात्वाचें ज्ञानानेंच खरा त्याग	”
v)	गुरुभक्ति, भजन-पूजन, दान पुण्य वगैरे साधनानें त्यागाचे धडे	३०
१. ७. i)	आत्मज्ञानानें मृत्युभयापासून सुटका	३२
ii)	एकटे सद्‌गुरु अभयदान देऊं शकतात	३३
iii)	धर्मप्रसाराचे विपरीत प्रकार	३४
iv)	खऱ्या स्वधर्माचे विकरण, स्वधर्माचा रूढार्थ अग्राह्य	”
v)	‘स्वधर्मे निधनं श्रेयः’ याचा अर्थ	३५
vi)	स्वरूपरूपी स्वधर्मांत राहण्याचा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क	३६
vii)	‘सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।’	“
१. ८. i)	ज्ञान अत्यंत पवित्र असून ज्ञानानें जिवंतपणीच काय पण मरणानंतर पूज्यत्व	”
ii)	राम, कृष्ण, शिवादि देव पूर्वीचे गुरुच ते जगांत विद्यमान् गुरुंच्या द्वारे भक्तांना ज्ञान देतात.	३७
iii)	लौकिक विद्या-कलादिकांनें आलेले महत्व अल्पकालिक आत्मविद्येने चिरकालीन पूज्यता	३८
iv)	शांतीप्राप्तीला आत्मशोधन (आत्मज्ञान) च एकमेव उपाय	४०
प्रकरण २ रें ‘मी’ च्या शोधासाठी चार देहांचें परीक्षण (४०-५७)		
२. १. i)	‘मी कोण’ हे शोधण्यासाठी जिज्ञासा	
ii)	‘गोमाजी गणेश, पितळी दरवाजा’ ची गोष्ट	४१
iii)	अनेक दृष्टांतावरून माया-ब्रह्माचे स्वरूप-परिक्षणावरून ‘मी’ चा खोटेपणा	४२

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रम नंबर	विषय	पृ. नं.
iv)	'मी' च्या खोट्याच कर्तृत्वाभिमानामुळें बंधन	४३
v)	'मी' च्या त्यागासाठीं आपल्यांतच 'मी' शोधण्यास प्रारंभ	४४
२. २. i)	स्थूल शरीरांत 'मी' कोठेंच सांपडत नाहीं. पण अवयवांच्या ठिकाणीं माझेपणाचा शिक्का	४४
ii)	शरीरावरील माझेपणाही सिद्ध होत नाहीं	४५
iii)	स्थूल शरीर हे केवळ शिमग्यांतलें सोंग	४६
iv)	स्थूलशरीर पंचमहाभूतांचें, त्याचे बाल्य-तारुण्यादि सर्व गुणधर्मांचा मला संबंध नाहीं.	४८
v)	स्थूल शरीराच्या नाश संबंधानें पंच प्रळयांचीं मीमांस	४९
vi)	रबराच्या सापाचे दृष्टांतावरून ज्ञानरूपी विवेकप्रळयानेंच सार्थकता	५०
२. ३. i)	सूक्ष्म शरीराची ओळख-येथेंही माझेपणाचा शिक्काच मी नाही तर माझेपणाही निराधार	५१
ii)	'मी नाहीं तेथें माझे ही नाहीं' या सिद्धांतावर आक्षेप व उत्तर	५२
iii)	"मी-माझेंपण सुटल्यावर व्यवहार नीट चालतो कीं नाहीं? "	"
	या प्रश्नास "आत्मानंदाचा कैफ चढून व्यवहार बंद पडल्यास स्पृहणीयच! " असें विशेष उत्तर	५३
iiiअ)	वरील प्रश्नास दाई व ट्रस्टी यांचे दृष्टांत देऊन "व्यवहार नीटपणें होऊ शकतो" सर्वसंमत उत्तर	५४
iiiआ)	शरिररूपी पंचभूतांचे गांठोडें सांभाळा, पण मालकी सांगू नका.	५५
२. ४.	कारण शरीराची ओळख	५६
२. ५.	महाकारण शरीर	५७
२. ६.	अनिर्वचनीय स्वरूपप्राप्ति	५७
प्रकरण ३ रें. चार देहाचें विस्तारानें निरूपण		**५८–८३**
३. १. i)	चारही देह पूर्णपणें कळले पाहिजेत, प्रकरणांतील जिज्ञासा	५८
ii)	एकएक देह नीट कळून वळल्यानंतरचं पुढचा विचार करावा	५९

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रम नंबर	विषय	पा. नं.
iii)	प्रत्येक देहासंबंधानें अगोदर महत्त्व व नंतर तुच्छता वर्णन करण्याची अध्यात्म शास्त्राची निरूपण पद्धत	५९
iv)	वरील निरूपण पद्धतींत सर्वच देहाचें निरसनचा उद्देश	६१
३. २. i)	स्थूल देह वळणांतला म्हणून थोडक्यांत वर्णन	६२
३. ३.	सूक्ष्म देहाचें वर्णन. प्रत्येक देह ओलांडण्यास कळून घेण्याचा एक पाय, वळविण्याचा दुसरा पाय	६३
३. ४. i)	कारण देह-विसरावस्था	६५
ii)	सिद्धांतानें कारण देहांत शुद्ध जाणीव असली तरी 'शून्यच ब्रह्म' वाटूं नये म्हणून कारण शरीराचा अभ्यास	६६
iii)	'मला स्थूल-सूक्ष्म देहधर्मांचा संबंध नाही' असा दृढ संकल्प करून शून्यावस्थेत राहणें	६८
iv)	कारण देह म्हणजे झोंप नव्हे, पण झोंपेसारखी विसरावस्था-याचा खुलासा	६९
v)	नामधारकांस सूचना-संकल्प-विकल्प निरसनानंतर नाम व रूपही विसरावें.	७१
३. ५. i)	महाकारण देहाचें स्वरूप-शुद्ध ज्ञान. उपाधिभदांतील ज्ञानाचा शुद्धावस्था जाणणें अवश्य	७२
ii)	महाकारण देह सर्व अवस्थांचा साक्षी	७४
iii)	शुद्ध ज्ञानानें अज्ञान नष्ट झाला तरी जगप्रतिति राहील. बद्ध, साधक, सिद्ध यांच्या तीन दृष्टी	७५
iv)	कारणदेह साक्षेप व कल्पित आहे	७७
v)	ज्ञानावस्थाही अज्ञानामुळें कल्पित	"
vi)	'मी ब्रह्म आहे' चा सत्याभिमानही जिरून सहजावस्था येणें	७८
vii)	आठव-विसररहित 'असणें' हेच स्वयंप्रकाश आत्मस्वरूप	७८
३. ६. i)	'अन्वयज्ञाना' ची ओळख सर्व निरूपण पद्धतीचा आत्मबोध हा एकच हेतू	"
ii)	अन्वय पद्धतीतील दोष व त्याचे निवारण	८१

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रम नंबर	विषय	पा. नं
iii)	जगाबद्दल निरनिराळ्या उपपत्ती सांगण्यांतील हेतु समजूतीप्रमाणें पटवून आत्मबोध करणें.	८२
प्रकरण ४ थें.	**महाकारणाचा बहुविध उलगडा व स्वरूपप्राप्ति (८४–११६)**	
४. १. i)	पहिल्या तीन देहांतील ज्ञान होण्याची रीत	८४
ii)	महाकारणांतील ज्ञान निरपेक्ष	८५
iii)	दृष्टी व्यापक केल्यानें सत्य-ज्ञान-अनंताचे दर्शन	८६
४. २. i)	ज्ञानानें अज्ञान तेवढे नष्ट होतें; स्थूल-सूक्ष्म शरीर किंवा अज्ञानाचें आशारूप कायम	
ii)	ज्ञान अज्ञान हीं मायेची जुळी पोरे	८८
४. ३. i)	चारही देहांचा नाश (मरण) कसा होतो याचा विचार	८९
ii)	स्थूल देहाचे मरण विनाप्रयासानें होईल	"
iii)	संकल्पानेंच संकल्प मोडून सूक्ष्म देहाचा नाश	९०
iv)	मनाच्या नाशाला चिकाटीचा अभ्यास अवश्य	९१
v)	विसररूपी कारण देह विसरानेच विसरला जातो	९२
vi)	महाकारणहा ओसरून, चौदेहातात परमात्म्याची अभिव्यक्ति	"
४. ४. i)	४ देहांचे ब्राह्मणादि ४ वर्णांच्या रूपानें वर्णन	९३
ii)	पहिल्या ३ देहांचे स्वर्ग-मृत्यु-पाताळलोकारूपानें वर्णन	९४
iii)	महाकारणरूप ब्राह्मणाचे कडक सोवळे	९६
४. ५. i)	ज्ञानरूपी महादेवाची सर्वत्र पूजा होय.	"
ii)	सर्व देव-महात्म्याचीच पूजा अंतरात्म्याचीच पूजा होय.	९८
iii)	'ज्ञानरूपी हरीच कर्ता भोक्ता' असें अनुसंधान-देहबुद्धीचा निरास करून आत्मबुद्धीची धारणा	९९
iv)	ज्ञानसंवित्‌ची व्यापकता–निर्विषय शुद्ध ज्ञानाचा अनुभव	१००
v)	व्यतिरेकानें शुद्ध ज्ञान समजल्यानंतरच उपाधींतले अन्वयज्ञान इष्ट	१०१
vi)	साधकानीं केवळ अन्वयाचे शब्दज्ञानच सोडून व्यतिरेकाचें अनुभवमार्गानें जावे.	१०२

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रम नंबर	विषय	पा. नं.
४. ६. i)	विशेष (सविषय, सविकल्प) ज्ञानाचा उलगडा	१०३
ii)	सामान्य (निर्विषय, निर्विकल्प) ज्ञानाचा उलगडा	१०४
iii)	सामान्य ज्ञानाचा अभ्यास-भेटा जातां पडे तुटी । न भेटताची होय भेटी ॥	१०५
iv)	वस्तूस जाणण्याचें प्रयत्न म्हणजे झोंप पकडण्याचा मूर्खपणा	१०६
v)	मन-बुद्धीच्या सहाय्यानें ब्रह्म जाणणें अशक्य. चारही देह ओलांडण्यानें सिद्ध पदवी.	१०७
४. ७. i)	आत्मा सर्वांघटी भरला आहे याचा अभ्यास	१०८
ii)	भूतमात्रांच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या पूजा	१०९
iii)	दुश्ट प्राण्यांच्या ठायीं सर्वात्मभावना करण्याविषयी प्रश्न व त्याचें उत्तर	११०
iv)	आत्मिय भावना वाढविण्याचा क्रमाक्रमानें अभ्यास	११२
v)	ज्ञानोत्तर भक्तीनेंच पूर्णत्व	११३
vi)	महाकारणाचा अभ्यास संपल्यानंतर 'नेति नेति' वस्तूची प्राप्ति, विज्ञान	”
vii)	चौदेहातीत आत्मस्वरूप, तुझें तूंच अनुभवायचे आहे. ग्रंथाचा शेवट.	११५

आत्मज्ञानाची गुरुकिल्ली भाग २ अर्थात "विज्ञानबोध लहरी"

(१) निश्चयाचे बळ पा. नं. ११७ (२) संगत्याग पा. नं. ११८ (३) शब्दांतील अनिर्वाच्य पा. नं. १२० (४) सविकल्प निर्विकल्प ज्ञान पा. नं. १२२ (५) भ्रांतीकृत चमत्कार पा. नं. १२३ (६) मी पणाचे ग्रहण पा. नं. १२६ (७) वृत्तीमुळेंच निवृत्तीची सिद्धी पा. नं. १२८ (८) तत्त्व विचार पा. नं. १२९ (९) ज्ञान भक्ति भेद अन्वय व्यतिरेक पा. नं. १३१ (१०) दर्शन साक्षात्कार मीमांसा पा. नं. १३२ (११) ज्ञान विज्ञान पा. नं. १३३ (१२) मोची कहाणी पा. नं. १३६ (१३) स्वरूपग ऐश्वर्य पा. नं. १३७ (१४) बद्ध-मुक्तता पा. न. १३९

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्री सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराजांची

आत्मज्ञानाची गुरुकिल्ली

भाग १

प्रकरण १ लें– आत्मज्ञानाची महती

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । श्री गुरुभ्यो नमः ।

१.१. (i) निरूपणारंभी प्रथम गणेशास वंदन, त्यानंतर सरस्वतीस नमस्कार व शेवटी सद्गुरूस वंदन केले पाहिजे याचें कारण काय? "हा वंदनाचा अनुक्रम जर बदलला तर घोटाळा होईल" असेंच द्यावें लागणार. कारण गणेश ही ध्यानरूप देवता आहे. सरस्वती ही निरूपणदर्शक देवता आहे आणि ध्यान व निरूपण या दोहोंच्या साहाय्यानें साधकांचे अंतःकरणांत उदय पावणारी आत्मज्योतिरूप देवता म्हणजेच सद्गुरु होय. त्या सद्गुरूस गणेश–सरस्वतीनंतरच वंदन करणें भाग आहे. अभ्यासानें वस्तू डोळ्यापुढें असते, निरूपणद्वारे त्या वस्तूची ओळखपण पक्की होते व हें असे झालें म्हणजेच सद्गुरुकृपा किंवा आत्मकृपा होते. नुसत्या ध्यानानें किंवा नुसत्या निरूपणाने साधकाचा कार्यभाग होत नसल्यामुळे त्यानें गणेश–सरस्वतीची आराधना एकदमच केली पाहिजे, हे रहस्य ओळखून **'सगूण रूप नयनी दावा । मग तुम्ही वेदांत गावा ।।'** किंवा **'सूक्ष्म नाम मुखी घ्यावे । त्याचें रूप बिंबवून द्यावे'** यांतील संताचे अनुभवाप्रमाणें सदगुरु ज्या वस्तूविषयीं निरूपण सांगावयाचे ती वस्तू प्रथम दाखवितात, मग त्याचे लक्षण सांगून त्या वस्तूचें सांगोपांग ज्ञान करून देतात, हल्लीं शाळामधून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

लहान मुलांस वस्तूपाठ देतात तो, प्रत्यक्ष पाठ देणें आहे. ती वस्तू प्रथम त्यांच्या हातांत देऊन किंवा समोर टेऊन मग 'ही वस्तू अमूक' म्हणून पाठ देतात; यास किंडरगार्टन पद्धति म्हणतात. त्याचप्रमाणें वस्तू आधी हातांत घेऊन, मागाहून वस्तुलक्षण निरूपणद्वारें बिववून देणें यास सद्गुरु सांप्रदायक्रम म्हणतात व या सांप्रदायिक पद्धतीनेंच साधकाचा कार्यभाग लौकर होतो. असो.

१.२,(i) सद्गुरूनीं सगुणरूप नयनीं दाखविल्यावर व निरूपणानें ती वस्तू अमूक असे सांगितल्यावर साधारण बुद्धिमान साधकास सद्गुरु काय सांगतात, कशाचा बोध करतात हें कळते; पण मुख्य अडचण आहे ती ही कीं, कळलेले वळणेंच अति कठीण आहे. सद्गुरुचे निरूपणानें आत्मा कोण आहे हे कळले तरी फिरूनफिरून साधकाचे ठिकाणीं 'मी आत्मा कसा?' असे संशयाचें भूत डोकेवर काढीत असतें; साधकाची वृत्ति निःसंदेह होत नाहीं. कळते पण वळत नाहीं! यास उपाय म्हणजे कळलेलीच गोष्ट फिरूनफिरून अभ्यासानें वळणें हेंच होय. दीर्घ अभ्यासाशिवाय कळलेली गोष्ट वळत नाहीं. कित्त्यांतील अक्षर काढता फार सुंदर आहे हें आपणांस कळतें, पण तसे अक्षर काढतां येत नाहीं. पण तेंच अनेकदा अक्षर वळले म्हणजे अभ्यासानें कागदावर लेखणी चालू केल्याबरोबर सहज सुंदर अक्षरे पडूं लागतात.

(ii) येथें कोणी विचारील कीं, "कोणती गोष्ट किती वेळा वळविली असतां वळतें?" तर त्यास उत्तर हेंच की, "ज्याचेत्याचें बुद्धीप्रमाणें कळलेली वस्तू पूर्णपणें वळेपर्यंत पुनःपुन्हां घोटीत राहणें." पण साधारणपणें ठोकताळ्याचा असा एक नियम सांगता येईल कीं, साधारण बुद्धिमान साधकास कोणतीही गोष्ट २–४ वेळा सांगितली असतां ती गोष्ट कळते. १०–२० वेळा तीच

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गोष्ट करीत बसले तर त्याचा सराव होतो. तीच १०० वेळा घोटली असतां त्या गोष्ठीचे व्यसन लागतें व १००० वेळा जर ती गोष्ट वळली तर वळणाऱ्याचा सहज स्वभाव होऊन बसतो. अंबाडीचे तंतू किती सूक्ष्म असता ते वाऱ्यानें फुंकरले असतां दशदिशा उडून जातात; पण तेच तंतू वळले म्हणजे त्या तंतूताच दोरखंड बनून, एका लहान खुंट्याला या दोरखंडाने अति मस्त हत्तीही सहज बांधता येतो; हे वळणरूपी अभ्यासाचे केवढे सामर्थ्य आहे! परब्रह्म सर्व व्यापक नित्यमुक्त खरा पण सूक्ष्म वायुरूपी मनानें आपल्या ठिकाणी जन्मो-जन्मीचे वळण घेऊन इतका बलवत्तर झाला कीं, त्यानें नित्यमुक्त ब्रह्मास देहबुद्धीचे बंधनांत डाबून ठेवले. वळण ऊर्फ अभ्यासाचा हा काय पराक्रम! **'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥'** हें अभ्यासाचे महत्व ओळखून साधकानें गणेश-सरस्वतीपूजन म्हणजे ध्यान- निरूपणाचा सतत अभ्यास करून कृतार्थ व्हावे.

१.३. (i) आतां या अभ्यासास सुरवात करण्यापूर्वी साधकांस त्याबद्दलच्या दुसऱ्या अनेक गोष्टी ज्ञान असणे इष्ट आहे. 'जीवाचे ठिकाणी देहच मी अशी भ्रांती कशी झाली? मनुष्य-' प्राणी जगांत जन्मला त्यावेळी त्याची अवस्था काय होती? पुढें त्यास कसली शिकवण मिळाली? मी-माझेपण त्याचे अंगात कशी आली? जगांत मूलतः त्याची निर्भय अवस्था होती कीं काय व नसल्यास त्याला या भयांतून कोणी कसे पार पाडले? हे सर्व सांगितले पाहिजे.

(ii) जीव प्रथम आपले मातेच्या उदरात टीचभर जागेंत कोलदांडी घालून पडून राहिला होता. ज्या दिवसी तो या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अफाट जगांत जन्मास येऊन बाहेर पडला, तेव्हां त्यानें आपले डोळे किलकिले करून सभोंवार पाहतांच अफाट जागा व भव्य प्रकाशानें त्याचें डोळे दिपलें; 'मी एकटा कोठे आलो, मला कोणाचा आधार आहे, आतां माझे कसे होईल?' अशा तऱ्हेची भीती त्याच्या मनांत उत्पन्न झाली. आपण निराधार आहोत म्हणून त्यास जन्माबरोबर पहिलाच धक्का बसून त्याने एकदम रडण्यास सुरवात केली. असा थोडा वेळ गेल्यावर हळूच त्याचे तोंडास मधाचे बोट लागले. त्यावरोबर हे ठीक झाले, आतां आपल्याला कांहीं तरी आधार मिळाला असे त्यानें आपले समाधान करून घेतले. पण भीतीचा बसलेला पहिला धक्का तो त्याच्या मनांत तसाच कायम राहिल्यामुळे जरा कोठे वाजल्यास तो एकदमच बिचकतो व त्यास पुन्हा एकदां मधाचे बोट लागले किंवा मातेचें स्तन मिळाले कीं, आधार मिळाला असे वाटून तो पुन्हा शांत होतो. अशा रीतीनें टेका घेत घेत बाळपणीं आई–बापाच्या आधारावर हा जीव तगून राहतो. तो जसजसा मोठा होत जातो तसतसे त्याचे जगद्गुरु आई–बाप त्यास जगाचें ज्ञान हळुहळु देऊ लागतात. पुढें शाळेंतील मास्तरहि भूगोल, भूमिती, भूगर्भशास्त्र असल्या मृत्तिकाशास्त्राची मातीमोल शिकवण देऊन त्यास तयार करतात. मग हा जीव तारुण्यांत प्रवेश करतों व आपल्या जीवनाचा आधार काय हें पाहूं लागतो तो जगांत पूर्वीच जीवाचा आधार म्हणजे पैसा व स्त्री हे ठरले असल्यामुळे हा जीव कनक-कामिनीचा संग्रह करून त्यांचे आधारावर आपला टिकाव आहे अशी समजूत करून घेऊन कालक्रमण करतो; पैसा व स्त्रीच्या मागोमाग मान, विद्वत्ता, अधिकार या संपत्तीची भर टाकून प्राणी अधिकाधिक आपल्यास जखडून घेतो.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

(iii) या जीवाची मुख्य संपत्ति व त्याचा सर्व आधार म्हणजे स्त्री, धन, मान, यौवन, रूप अधिकार याचाच होय व त्याठिकाणी त्याचा अभिमान जडल्यामुळे द्रव्यमद, अधिकारमद, रूपमद, असें अनेक तऱ्हेचे मद त्याचे अंगात भिनतात व या निशेंच्या भरांत जीव आपल्या स्वरूपास मुकतो. वरील संपत्तीपैकी निसर्गनियमानुसार एक एक कमी होण्यास ज्यावेळी सुरवात होते त्यावेळी जन्मल्याबरोबर भीतीचा बसलेला पहिला धक्का जागृत होतो व आतां कसे करूं, काय करूं, आपला आधार तुटत चालला, आपले काय होईल, म्हणून हा जीव हताश होतो पण वेडयाला हे समजत नाहीं कीं, या सर्व ऐहिक संपत्तीस सर्वाधार जो मी त्याचाच आधार असून, त्याच्याच आधारानें पैशास किंमत आली, स्त्रीस मोहकता आली, मानास मान्यता मिळाली, विद्वत्तेस शहाणपण आले, रूपास सौंदर्य चढलें, यौवनास भर आला व अधिकारास सत्ता आली. हे जीवा, या सर्व संपत्तीस आधार असणारा तूंच असून उलट या संपत्तीचा तुला आधार आहे असे वाटावे यापेक्षा असत्य कांहीं असू शकेल काय?

(iv) पैसा, स्त्री, धन, अधिकार, मान, यौवन, रूप या संपत्तीत दुर्गुणरूपी आसुरीं संपत्तीची भर पडल्यावर मग या जीवाच्या गमजा काय पाहाव्या? **'आधीच मर्कट तशातहि मद्य प्याला'** या श्लोकांत विकृत माकडाचे वर्णन करणारा कवीहि या जीवाच्या गमजा पाहून लेखणी खाली ठेवील व आपल्या कविकल्पनेस रजा देईल! देहालाच देव समजून या देवाची वरील संपत्तीने नित्य पूजा करून अहोरात्र दंग झालेल्या या जीवास चांभार म्हंटले आहे. देहरूपी चामडीचा भार (चाम-भार) वागवून मिरविणाऱ्या या भक्ताचे देवाची पूजा कशी करावी, त्याचा विधी

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संतानीं 'चांभाराच्या देवास खेटराची पूजा' या म्हणीत सांगितली आहे! **देह तोचि देव भोजन ते भक्ति। मरण तेचि मुक्ति पाखंड्याची ॥** हाच ज्याचा परमार्थ, हेंच ज्याचे ध्येय ठरून चुकलें, त्याची मजल स्थूल देहाच्या पलिकडे जावू नये यांत कसले आश्चर्य! कर्ज काढूनही खावे, प्यावे, चैन करावी; सावकारी तगादा झालाच तर नादारींत अर्ज करून पुन्हां मोकळे व्हावे व मरण येईल त्या दिवशी मरून पडावे! असला जीव 'आया वैसा गया! यापरते जीवाचे दुर्भाग्य ते कोणते?

१. ४. (i) नथ करून आणणाऱ्या नवऱ्यांची मुक्तकंठाने स्तुति करण्यांत दंग झालेली स्त्री, ज्यानें नथ घालण्यास चाफेकळीसारखे सुंदर नाक दिले, त्या प्रभूस आठवते कशाला? त्याचप्रमाणे ज्या नरपशूनीं देहाकडेच पाहिले, त्यांना देव कसे दिसणार ! ज्याच्या सत्तेनें सूर्यास सूर्यपण आला, चंद्रास चंद्रपण आला, देवास देवपण आले, असला हा सर्वाधार सर्वांतर्यामि प्रभू या जीवाला दिसेनासा झाला, याचे डोळे बहिर्मुख असल्यामुळें आपल्या बाहेर काय आहे हेच तो पाहुं लागला. डोळ्यास अक्ष असे दुसरे नांव आहे. याचे कारण असें कीं 'अ' पांसून 'क्ष' अक्षरांनी ज्या बाह्य पदार्थाचा बोध होतो तो डोळ्यानें होतो. स्थूल पदार्थ असेल, तर स्थूल डोळ्यानें व सूक्ष्म-काल्पनीक पदार्थ असेल, तर सूक्ष्म बुद्धीरूप डोळ्यानें दिसतो किंवा भासतो; म्हणजे दृष्टीचा प्रांत 'अ' पासून 'क्ष' या अक्षरांनीं नामकरण केलेल्या पदार्थापर्यंत आहे. त्या पुढील 'ज्ञ' या अक्षरानें ओळखले जाणारे ज्ञान अगर ज्ञप्ती या वस्तूपर्यंत डोळे किंवा बुद्धिरूप डोळे येऊं शकत नाहींत म्हणून डोळ्यास अक्ष हें नांव प्राप्त झाले. असो, डोळ्याप्रमाणें जीवाची सर्व इंद्रियें, कान, नाक, जीभ आदिकरून दशेंद्रियें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वहिर्मुखच असल्यामुळें ते सर्व वाह्य विषय ग्रहण करूनच आपला निर्वाह करतात. त्यामुळें सर्व इंद्रियांत बसून इंद्रियास इंद्रपद देणारा ज्ञानराज इंद्रियामागें आहे कीं नाहीं? इकडे जीवाचे लक्षच जात नाहीं. मन–बुद्धीला अनेक जन्मीच्या संवयीमुळें बहिर्मुख होण्याचेच वळण मिळाले असल्यामुळे अंतर्मुखवृत्ति करणें हें महाकर्म कठीण झाले आहे. पुढें पाहण्याचें सोडून देऊन मागें फिरून पाहण्यास मनास वळण देणें हाच तो संत, सज्जनांचा उलटा मार्ग. जेथें सर्व जीवमात्र निजलेले असतात तेथें हे संत जागतात व जेथें प्राणी जागा असतो तेथें हे सज्जन सपशेल निजतात. सर्व प्राणिमात्रांची जागृति बाह्य विषयामध्यें असून त्यात ते अगदी प्रवीण झालेले असतात. पण या विषयाचे ठिकाणीं संतानीं आपले डोळे झांक केली आहे. पण ज्या आत्मविषयांत प्राणी गाढ घोरत पडले आहेत तेथें हे सज्जन डोळ्यांत तेल घालून जागृत बसले आहेत.

(ii) जीवमात्र आज एक लाख रुपये मिळाले तर उद्या दोन लाख कसें मिळतील या विवंचनेंत 'चलो आगे बढो' म्हणून पुढे पुढे जाण्याची महत्वाकांक्षा बाळगीत आहे. तर संतानीं याच्या अगदीं उलट उपदेश केला कीं, "**उलट उलट माघार प्राण्या फिरदोते खाशी। भरला पूर मायेचा लोंढा वाहुनियां जाशी॥**" जगांतील दिवसेंदिवस होणारी सुधारणा, नवीन नवीन शोध पुढें होऊं घातलेले शोध हे सर्व मायेचे महापूर आहेत. कितीही पुढें जा, ज्याला त्या ठिकाणीं ह्या महामायेचा दुर्निवार लोंढा तुमच्यापुढे वाढवून ठेवलाच आहे हें पक्के समजा. या लोंढ्यात सांपडलेला जीव कोठपर्यंत वाहून जाईल हे कोणी सांगावे! जगांत चाललेली हीं सुधारणेची जागृति व त्यांत चाललेली जीवमात्रांची धांदल–

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

धांवपळ पाहून या जागृत मानलेल्या स्वप्नस्थितीतून प्राणिमात्रांस आत्मजागृति आणण्याकरिता संतानीं जंगजंग पछाडिले आहे. पण या कुंभकर्णी निद्रेंतून जग जागे होईल तो सुदिन!

(iii) रामदास व तुकाराम यांची एकवेळी, एका नदीच्या ऐल तीरावर रामदास व पैल तीरावर तुकाराम अशी लांबूनच गांठ पडली तेव्हां 'एकमेकांनी लोक जागृतिची कामे किती केलीं?' या उद्देशानें प्रथम हाताचे खुणेनें समर्थ रामदासांनीं तुकाराम महाराजांस प्रश्न केला. तेव्हां त्याचे उत्तर म्हणून तुकाराम महाराजांनीं आपल्या उजव्या हाताची मूठ वळून तोंडाकडे नेली व समर्थास तुकारामानीं विचारले त्यावेळी समर्थांनीहि तुकाराम महाराजांचेच अनुकरण करून जिकडे आत्मजागृतीचे नावानें बोंबाबोंब आहे असे सूचित केले व दोघे आपआपल्या वाटेस लागले! असें जरी असले तरी दयाळू संतानीं आपले कार्य अविरत चालू ठेवले आहे. "**काय वानु मी या संतांचे उपकार मज निरंतर जागविती।**" दैहिक दृष्टचा संत तुकाराम, समर्थ रामदास हे जरी आपल्यातून निघून गेलेले असले तरी त्यांनी अभंग गाथा व दासबोध या सारख्या उपदेशग्रंथांत त्यांना सांगावयाचे सर्व कांही सांगून ठेवलेले आहे. त्यानीं जेवढें द्यावयाचे तेवढी सर्व ज्ञान-संपत्ती या ग्रंथरूप मृत्युपत्रांत जीवाला बहाल केली आहे. त्याचा जो वारसा म्हणून पुढें येईल त्याला ही सर्व संपत्ती मिळणार आहे. ज्याला ही ज्ञानसंपत्ती पाहिजे त्यानें आपल्या आसुरी संपत्तीवरील अभिमान सोडला पाहिजे, एवढेच नव्हे तर चांगले मानून उराशीं वाळगलेल्या सर्व संपत्तीचाहि त्याग करून संताच्या उलटचा मार्गावर पाऊल ठेवण्यास तयार झाले पाहिजे, ही एकच अट त्या मृत्युपत्रांत आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

१.५.(i) जीवाला देहाचा अभिमान, जातीचा अभिमान, कुलाचा अभिमान, देशाभिमान, राष्ट्राभिमान, वाईटाचा अभिमान, चांगल्याचा अभिमान असे किती तरी बरे-वाईट अभिमानजडून राहिले आहेत व हे सर्व सुटून निराभिमान झाल्याशिवाय संतानी ठेवलेल्या ठेवीची वारसदारी कोणत्या तोंडाने सांगता येईल! अनेक जन्मांत जडून अंगस्वभावच बनून गेलेले अभिमान कसे व केव्हां सुटतील व कधीकाळीं आपण ज्ञानसंपत्तीचे वारसदार ठरू कीं नांहीं असें पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें वाटणाऱ्या जीवास निराश होण्याचे कारण नाहीं. गुलामास आपण गुलाम आहो ही जाणीव ज्या दिवशी होते त्या दिवसापासून त्यास स्वातंत्र्याचा मार्गहि दिसू लागतो. पण गुलामास आपली गुलामगिरीच सुखाची वाटून आहे तीच स्थिती कायम ठेवण्याची जोपर्यंत तो खटपट करतो, तोपर्यंत आपण गुलाम आहोत ही जाणीव त्याचे ठिकाणी उत्पन्न होत नाही व स्वातंत्र्याचा राजमार्ग त्याचे कल्पनेंतही येत नाहीं. त्याचप्रमाणें "आगे बढो" ची जीवमात्रांची महत्वाकांक्षा त्यास अधोगतीस नेत आहे अशीं ज्या दिवशी एखाद्या भाग्यवान् जीवास वाटू लागते, त्या दिवसापासून माघारी उलटण्याची संतानीं सांगून ठेवलेली दिशा त्यास दिसू लागते व त्यामार्गानें हळुहळू कां होईना पण प्रयत्न सुरु होतो.

(ii) चांगले-वाईट जडलेले सर्व अभिमान, एकदम कोणासही सुटणें शक्य नसले तरी एक एक सोडीत निराभिमान होण्याचे मार्गास निश्चयाने लागल्यास, परम दयाळू परमेश्वर आपल्यास या कामी हात दिल्यावाचून राहणार नाही जीवाचे ठिकाणी दुर्गुणरूपी आसुरी संपत्तीचा जडलेला अभिमान सद्गुणरूपी दैवी संपत्तीचा अभिमान वाढवून मोडला पाहिजे व अभ्यासाने सर्व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दुर्गुणांचा नायनाट होईपर्यंत सद्‌गुणांची जोपासना करून, या सद्‌गुणासही कायमचे न कंटाळता हळुहळू फांटा मारला पाहिजे. येथें अशी एक शंका येईल की, दुर्गुण त्याज्य असले तरी सद्‌गुणही सोडले पाहिजेत म्हणून सांगता हे कसे? सद्‌गुण हे केव्हांही चांगलेच

(iii) पण साधकानों, दुर्गुणांच्या सपेक्षेनें सद्‌गुणांचा संग्रह जरी चांगला असला तरी ज्ञानसंपत्ती मिळविण्याच्या कामी आसुरी संपत्ती जितकी त्याज्य आहे त्याहूनहि शंभरपटीने, दैवी संपत्तीं म्हणून उराशी धरून ठेवलेली ही किंवा सद्‌गुणसंपत्ती त्याज्य आहे. असें पहा कीं, जनलज्जेनें मनलज्जेनें संतोपदेशानें जीव दुर्गुण सोडण्याचा प्रयत्न करतो, पण सद्‌गुणसंपन्न माणसाची या जगांत वाहवाच होत असल्यामुळें, सत्कृत्याचा ज्यानें अभिमान धारण– केला त्यास त्यातून च्युत करणें हें अत्यंत कठीण! वाईट कृत्यांचा अभिमान लौकर सुटतो तसा चांगल्या कृत्यांचा अभिमान सुटत नाहीं! मी पाप केलें हे अभिमानानें सांगण्यास कोणी आपलें तोंड उघडीत नाहीं; तेंच मी सहस्रभोजने घातली, चारी धाम हिंडून देवदर्शनें केलीं, अमक्या ठिकाणीं मी सदावर्ते उघडली, कोटिलिंगार्चने केलीं वगैरे गोष्टींचा इतका दृढ अभिमान जीव– मात्राच्या ठिकाणीं जडतो कीं, हा अभिमान सुटणें अशक्यप्राय होऊन बसते! पापी जीव पश्चात्तापानें सद्‌गुरुच्या पदरांत पडतो, पण सर्वांना हवा असलेला पुण्यात्मा मात्र जगाच्या आपमतलबी स्तुतीच्या दडपणाखालीं इतका खोल पुरून जातो कीं, त्यास सद्‌गुरुकडे येण्याचा मार्गच बंद पडतो. हें पाहून एकवेळ दुरभिमान पुरवला, पण हा सदभिमान नको असेंच म्हणावें लागते!

(iv) आत्मसाधनाचे मार्गांतील दुर्गुणाचा अभिमान व सद्‌गुणाचा अभिमान हे दोन्हीही कांटेच आहेत. एका कांट्याने

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दुसरा कांटा काढला तरी तोही कांटा फेकून न देतां खिशांत वाळगल्यास तो बरगडींत घुसल्याशिवाय कसा राहील? लोखंडाची बेडी एखाद्या बेरडास घातली तर ते बंधन व सोन्याची बेडी राजास घातली म्हणून तें बंधन नव्हें असें थोडेच आहे! पण लोखंडाची बेडी काढणाऱ्याचे आभार बंदीवानानें मानले तरी, हातांत असलेल्या सोन्याचे बेडीस जर कोणी हात लावील तर मात्र त्याचे नरडीचा घोट घेण्यास हा सोनेरी बंदीवान उडी घेईल व ती सोन्याची बेडी हातांत कायम ठेवण्याचा प्रयत्न करील! हा कशाचा प्रताप? बंधनात सुख मानावयास लावणाऱ्या जीवाचा हा हितशत्रू कोण? जीवाच्या मानगुटीवर बसलेला हा सद-भिमानच जीवाचा कट्टा शत्रू होय. हाच शत्रू परमार्थाचा मार्ग जास्त नेटाने शोधू शकतो; म्हणून याचा त्याग अति प्रयासाने कां होईना, पण करणें भाग आहे. कारण त्याशिवाय ज्ञानसंपत्तीवर आपल्यास वारसाच सांगता येत नाही

१. ६. (i) या जगांत मागें वर्णन केलेली जीवसंपत्ती म्हणजे विपुल धन, लावण्यवती स्त्रीं, अधिकार इत्यादि असणे हे पूर्वजन्माचें पुण्याचें फळ समजतात. पण परमार्थ मार्गांत हेच धोंडे आड येत असल्यामुळें ही संपत्ति पापाचे फळ मानलें जाते. या संपत्तीचा अभिमान जडलेला जीव त्यांतच दंग बनून राहतो. म्हणून त्यास परमार्थास अनधिकारीच समजले जाते. याचें उलट असा एक जीव आहे कीं, ज्याचे जवळ कवडी नाही, जो अत्यंत कुरूप आहे, स्त्री नाहीं, अधिकार नाहीं, इतकेच नव्हें तर दारिद्र्यानें गांजल्यामुळे पोटाची आग शमविण्यास त्याने पाहिजे त्याच्या हाताचें व मिळेल तें खाऊनपिऊन आपली जातगोत, इष्टमित्र सर्व गमावले, असला सर्व ... दृष्टीनें पापी

Sri Vidyadharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ठरला तरी, परमार्थास आयता निराभिमान झालेला हा कंगाल पुरुष अधिक योग्य ठरतो. या नंग्याचे मोकळे कान सद्‌गुरु-उपदेशाकडे जितके लौकर वळतात तितके रोजच्या स्तुतिपाठाने ज्याचे कान भरून गेले आहे- त्याच्या कानांत सद्‌गुरु-उपदेश राहण्यास जागाच मिळत नसल्यामुळे- एक मिनिटही ते उपदेशाकडे वळत नाहींत.

(ii) जीवमात्र जन्मजात बंधनाच्या व शास्त्रीय सत्कृत्याच्या अभिमान बंधनांत सांपडून बसला, इतकेच नाहीं तर त्याने आपले-भोंवती अनेक कृत्रिम बंधनेहि निर्माण करून घेतली आहेत. हल्ली समाजांत संभावित म्हणून रहावयाचे तर सामाजिक बंधनें, रूढीचीं बंधनें, सरकारी कायद्याची बंधनें, शिष्टाचारांची बंधनें वगैरे बंधनानीं जीव इतका बांधला गेला आहे कीं, या व्यवहारांत चारचौघात संभावित मानले जाणाऱ्या कृत्रिम बंधनानें बांधलेल्या बंदिवासांत जीवास मनुष्य या नात्यानें राहणे असल्यास हीं सर्व बंधनें पाळलींच पाहिजेत. नेक्टाय (Necktie) म्हणजें गळफास किंवा गळचास तात लावून घेणें हें अलीकडील शिष्टाचारांत मोडलें जातें! अप्‌टूडेटचे सुधारणा स्वातंत्र्याचें लक्षण समजलें जातें. चहासारखे विष न पिणाऱ्यास, दररोज दाढी न करणाऱ्यास रानटीं समजले जातें. असल्या समाजाचे कृत्रिम बंधनांत राहून किंवा अशाच खुळचट कल्पना उराशीं बाळगून, जीव हा आपल्या भोंवती बंधनाचे वळसे जास्त घालून घेऊन नसत्या गोष्टीचा अभिमान वाढवीत आहे. पण असल्या तऱ्हेचीं सर्व बंधने व अभिमान पार झुगारून दिल्याशिवाय अलिकडच्या शहाण्या लोकाकडून वेडा नाऱ्या म्हणून घेतल्याशिवाय कधीकाळी बंधमुक्त होण्याची किंवा निराभिमान अवस्था येण्याची आशाच करणें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नको! ज्या समाजांत हल्ली हातांत पैशाची भाजी वागवून हमरस्त्यानें चालणें हें कमीपणाचें समजलें जातें, तेच हमरस्ते खराट्यांनीं झाडून साफ करण्यापासून तो पायखानें साफ करण्या-पर्यंत ज्यांनीं आपली मजल नेली, असे कांहीं सत्पुरुष पाहण्यांत येतात. त्याचें एकच कारण हें कीं, आपल्या ठिकाणचा अभिमान निःशेष झाडावा व देहबुद्धीचा नाश व्हावा. हें एवढे अवघड काम जीवास करण्याचे जिवावर येत असले व स्त्री, पैसा, जमीनजुमला याचा बाह्य त्याग करणें प्रथम कठीण असलें तरीं, साधकास अंतरत्यागापासून सुरवात करतां येते व तो हळुहळू साधल्यास बाह्यत्यागही घडूं लागतो.

(iii) अंतरत्याग म्हणजे मनानें केलेला त्याग. समजा कोणाला दुखवून बोलण्याची संवय असल्यास त्या संवईचा त्याग करून मिष्टभाषण करून दुसऱ्यांची मनें संतोषित करण्यास पदरचा एक पैसाहि सोडावा लागत नाही. एकाद्यास निष्कारण खोटें बोलण्याचीच संवय असते, त्यानें खोटे न बोललें तर अति विकट प्रसंग ओढवणार एवढ्या कारणाशिवाय उठल्या बसल्या खोटे बोलण्याचे तरी प्रथम सोडावें, त्यासहि कांहीं खर्च पडत नाहीं. शेजाऱ्याचा उत्कर्ष पाहून त्याचा मत्सर करावयाचा नाही, असें मनाने ठरविल्यास त्यांचें कांहीं नुकसान होईल काय? याचप्रमाणे सर्व दुर्गुणाचा मानसिक त्याग हळुहळू करीत गेल्यास बाह्य त्यागाची धमकचि अंगात येतें.

(iv) हें जग आत्मस्वरूपावर पडलेले स्वप्न असून या स्वप्न-सृष्टींतले सर्व चांगले–वाईट, धर्माधर्म, पाप-पुण्य, नीती–अनीतीं व त्यावद्दलचा अभिमान याचा आत्मा-जागृतीत कांहींच उपयोग नाही, म्हणून सर्व शुभ-अशुभ बऱ्या-वाईटाचा त्याग, आत्मज्ञान होण्यास

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जरूर आहे. हें जरी खरें असले तरी त्याग कसा घडतो, अभिमान कसा सुटतो याचे सर्व जीवांना कोडें पडलेलें आहे. तोंडानें नुसतें त्याग करा म्हणून सांगितल्यानें त्याग होणे केव्हांही शक्य नाहीं; म्हणून अभिमान कां जडतो याचें कारण शोधून काढून तें कारण नाहींसे केले असता आपोआप त्यागबुद्धी येतें. वस्तूमात्राचे ठिकाणीं अभिमान जडण्याचे मुख्य कारण म्हणजे अभिमान जडलेल्या वस्तूबद्दल जीवाची असलेली सत्यत्वबुद्धी. पण वस्तूबद्दलचा फोलपणा बुद्धीस पटला अथवा त्याचें मिथ्यात्व एकदा कळून चुकले तर त्याबद्दलची सत्यबुद्धी मावळून वस्तूत्याग आपोआप घडतो; सत्य वस्तू म्हणून उराशीं घट्ट बाळगून ठेवली त्याबद्दल अनासक्त होता येते. गोकाकची रंगीत लाकडी चिंच ही खरीखुरी चिंच नसून लाकडाची आहे असे ज्ञान होण्यापूर्वी त्याकडे पाहून तोंडास पाणी सुटणारच. याचें कारण चिंचेकडे पाहणाऱ्याच्या बुद्धीनें चिंचेबद्दल धारण केलेली सत्यत्वबुद्धी होय; पण ती चिंच लाकडाची आहे हें एकवार निश्चित कळल्यावर, त्याकडे आपण जरी कौतुकानें पाहत राहिलो तरी ती खाण्याची बुद्धी होऊन तोंडास पाणी सुटणार नाहीं हेंच त्या वस्तुबद्दलचें वैराग्य व हाच तो वस्तूत्याग होय. यावरून काय ठरलें कीं कोणत्याहि वस्तूबद्दलचे फोलपणाचें खरें ज्ञान हेंच त्या वस्तुत्यागाचें कारण होय. सर्व वस्तुसंग्रह किंवा अजबखाना म्हणजेच हे जगत् आहे. या जगाचा फोलपणा साधकाचे मनावर बिंबल्याशिवाय आत्मज्ञान दुर्लभ आहे. असत्य वस्तू कळविल्याशिवाय सत्य वस्तूप्राप्तीची इच्छा होत नाही व असत्य वस्तूचा त्याचे ठिकाणीं सत्यबुद्धी असल्यामुळें त्याग घडत नाहीं.

(v) जगद्विषयक असलेलें विपरीत ज्ञान सद्गुरुबोधानें नाहिसें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

होऊन जगन्मिथ्यात्व ज्यादिवशीं बरोबर ठसेल त्यादिवशीं जगाकडे कौतुकबुद्धीनें करमणूकीचें साधन म्हणून सिनेमाप्रमाणें जरी पाहत राहिलों तरीं जगाबद्दलची दृढमूल आसक्ति गेल्याशिवाय राहणार नाहीं, अशा रीतीनें बाणलेले वैराग्य ते खरा वैराग्य व आत्मज्ञानाचें अभावी असलेले वैराग्य तें स्मशानवैराग्य होय. आत्मज्ञानाशिवाय खरा त्याग घडत नाहीं व त्यागाशिवाय आत्मज्ञान होत नाहीं असा हा उलटसुलट पेंच आहें. या पेंचातून सोडविण्यास संतानी गुरुभक्ति, देवभक्ति, भजन, पूजन, कीर्तन, तीर्थाटन, दान, पुण्य इत्यादि मिषांनी जीवमात्रास त्यागाचे धडे घालून दिले, हे त्यांचे अनंत उपकार आहेत. प्रत्येक जीवाचा असा एक स्वभाव आहे की, कोणतीही वस्तू त्याजकडून बलात्कारानें हिरावून घेतल्यास त्यास परम दुःख होते व ती वस्तू परत मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न करतो; पण तीच वस्तू त्यानें खुषीनें दिली तर मात्र या खुषीच्या त्यागाबद्दल त्यास आनंद होतो. जो जबरदस्तीनें १ पैसाहि सोडण्यास तयार नसतो, तोच मनुष्य पंढरपूरसारख्या क्षेत्रांत सहस्रभोजनें घालून आनंदानें १००० रुपयें सोडतो व त्यांत आनंद मानतो. जो दुसऱ्यापुढे कधींही आपली मान लववीत नाहीं, तोच मनुष्य संतांचे भजनमेळयात सामील झाल्याबरोबर आपल्या जाती-गोतीचा, दर्जाचा अभिमान सोडून आपल्याहूनहि कमी दर्जाचे माणसाचे पायावर लोटांगणे घालतो. जे रावसाहेब घरांत गंध लावणें हा शिष्टाचाराचा भंग समजतात, ते एकदां भजन मंडळीच्या रांगेत उभे राहिले म्हणजे मुकाटयानें कपाळास बुका लावून घेतात; व अभिमानाचे तोंड काळे करितात. ज्याला नृत्यगायनादि प्रकार अश्लीलपणाचें वाटतात तोच भजनाचे ऐन रंगांत सर्व लाजलज्जा सोडून देहभान विसरून थयथया नाचूं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

बागडू लागतो, फुगडी खेळतो व मोठमोठ्याने हरिनामाचा गजर तालसुरांवर करूं लागतो, हे जीवमात्राचे खुषीचे त्यागाचे रहस्य ओळखून भजन–पूजनाचा सांप्रदायिक मार्ग प्रचारांत संतानीं आणला व आत्मज्ञानाचा पुर्वीही त्याग घडणें साधकांची वृत्ति निराभिमान होणें कसे सुलभ आहे हे जीवास पटवून आत्मज्ञानाचा पुढचा मार्ग मोकळा केला.

१. ७. (i) आत्मज्ञान म्हणजे स्वतःचे ज्ञान. आपण कोण आहो याची ओळख पटली म्हणजे नित्य काय, अनित्य काय, याचा आपोआप निर्णय होऊन अनित्य वस्तूत्याग व नित्यवस्तूचे ग्रहण होते. सर्व वस्तू नाशवंत असल्यामुळें प्रत्येक वस्तूस मृत्युभय ठेवलेलेच आहे; याच भयाने जीव भीतीग्रस्त होऊन अमुक वस्तूंचा व माझा वियोग होऊं नये म्हणून सतत जपत असतो. पैसा जाऊं नये म्हणून जपतो, स्त्रीचें तारुण्य, सौंदर्य कायम ठेव–ण्याची खटपट करतो. आपला मान व अधिकार सतत टिकवून धरण्याची धडपड करतो; पण याचे इच्छेप्रमाणें कांहींच घडून येत नाहीं. काल हा सर्वभक्षक असल्यामुळें त्याच्या निर्दय दाडेंतून भरडून निघण्याचें कोणाचेच नशिबाचें टळत नाही. मृत्युभया–पासून ब्रह्मादिक देवहि सुटले नाहीत. अशा भयग्रस्त जीवास कांहींही दिले तरी त्याची भीति थोडीच टळणार आहे! त्यास जर कशाची जरूरी असेल तर अभयदान हेंच होय, त्यास असे कांहीं मिळालें पाहिजे कीं, जेणें करून तो सदाच निर्भय झाला पाहिजे. स्वतःचे जवळ असलेला आत्मठेवा गमावून त्यास पारखा झालेला हा भिकारी जीव दोम दोम (देहोहं देहोहं=देह मी आहे) करीत; मला हें पाहिजे मला तें पाहिजे म्हणत, वणवण करीत सुटला आहे; व कांहीहि मिळालें तरी जो सदाचा अतृप्त राहून आणखी कांहीं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तरी मिळावे म्हणून याचना करणारा हा भणंग आत्मदानानेंच तृप्त करून शांत केला पाहिजे. माझे कसें होईल, माझ्या म्हणून मानलेल्या पैशाचे, बायका-पोराचें व घरादाराचें कसें होईल असा मंत्र घोकीत सतत बेचैन झालेल्या या घाबरगुंड्यास अभयदान मिळून निर्भय केला पाहिजे; व हे सर्वात श्रेष्ठ असलेलें अभयदान देण्यास फक्त सद्गुरूच समर्थ व उदार आहेत.

(ii) हे अभयदान देण्यास राजे-महाराजे किंवा देवेंद्रही असमर्थ आहेत. सर्व ऐहिक ऐश्वर्य व सर्व सुखोपभोग नित्यशः ज्याच्या पायाशीं लोळत घेत आहेत असले साम्राट ही परचक्राचे भीतीने ग्रस्त होऊन बेचैन झालेले दिसतात. तसेच एखाद्या तापसाचे उग्र तपोबलाने आपले इंद्रपद केव्हां डळमळेल याची अहर्निशी चिंता इंद्रासहि लागून राहिली आहे; मग विचार करून पहा कीं, जे स्वतःच भयापासून सुटले नाहींत तें दुसऱ्यास अभयदान काय देणार? सर्व भयाचें मूळ जी देहबुद्धी त्याचा निरास करून आत्मकेंद्रात स्थिर झालेले महात्मेच अभयदान देण्यास समर्थ आहेत. त्याशिवाय इतर सर्व मग ते देव, दानव, मानव कोणी असोत भणंग भिकारीच होत. या सर्वांना सद्गुरुचा आश्रय केल्याशिवाय केव्हांहीं निर्भयपदाची प्राप्ती होणे शक्य नाहीं. देव झाले तरी त्यानीं आपल्या दैवी संपत्तीचा अभिमान धरला आहे. दानवांनीं आसुरी संपत्तीचा व मानवांनीं जीवसंपत्तीचा अभिमान व्यर्थ आपल्या शिरावर घेऊन त्याच्या भाराखाली ते चिरडून जात आहेत. दुसऱ्यांचे ओझे आपल्या डोक्यावर वाहणाऱ्या हमालापेक्षां देवांचीही किंमत आधिक नाहीं. मग तेथें मानवी रंक काय किंमतीचा आहे? या हमालाचे ओझे खाली उतरण्यास सद्गुरुनेंच आपला हात पुढे केला व त्या हातानें त्यांना अभयदान दिले. सर्व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ज्ञानांत आत्मज्ञान व सर्व धर्मांत स्वधर्म श्रेष्ठ होय. म्हणून याच महात्म्यानीं जीवकल्याणार्थ आत्मज्ञानाचा प्रसार करून स्वधर्म म्हणजे काय तें शिकविले.

(iii) या जगांत भविष्यज्ञान, चेटुकज्ञान, व्यवहारज्ञान, शास्त्र–ज्ञान, चौदा विद्या–चौसष्ट कला यांचे ज्ञान शिकविले जाते. पण आत्मज्ञानाशिवाय इतर ज्ञान हें सर्व लुटपुटीचे ज्ञान असून, संतानीं त्या सर्वांचा इनकार करून शुद्ध ज्ञानकलेचा फैलाव केला. पण जगांत अनेक धर्मप्रसारक आपापले घोडे पुढे दामटून अहमहमिकेने "माझाच काय तो धर्म श्रेष्ठ, माझ्याच धर्मांत मोक्ष आहे, बाकी सर्व धर्म अधोगतीस नेणारे आहेत" असा उपदेश चालविला आहे. नुसते उपदेश करूनच ते थांबले नाहींत तर कोठें लांचलुचपत देऊन कोठे धाकदपटशा दाखवून, प्रत्यक्ष घरास आगी लावून व जीव घेऊन धर्मप्रसाराचें अति पवित्र कर्तव्य पूर्वी बजावण्यांत आले व थोडयाफार फरकानें हल्ली चालूही आहे!! तर हा जुलूम–जबरदस्तीचा, मारपीटीचा, लुटारू धर्म कोणाचेही अंतिम कल्याण साधण्यास उपयोगी नाहीं. सर्व जगाचा जर कोणता धर्म असेल तर तो एकच आहे– **धर्मामाजी परम धर्म। स्वरूपी राहणें हा स्वधर्म ॥**

(iv) मानव, मग तो कोणत्याहि जातीचा, धर्माचा, किंवा राष्ट्राचा असो, त्याला स्वतःचे म्हणून कांहीं स्वरूप आहे व त्या स्वरूपांत राहणें हाच त्याचा स्वधर्म होय. किडामुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत एकजिनसी व एकमासला असलेल्या स्वतःचे स्वरूपास ओळखणें हाच काय तो स्वधर्म व बाकीचे धर्माच्या नांवानें बोकाळलेले अनेक पंथ-धर्म हे परधर्म होत. कोणत्याहि प्रचलित पंथाचे धर्म असोत, राष्ट्राचे धर्म असोत, एखाद्या व्यक्तीचा धर्म

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असोत, एका व्यक्तीचे देहधर्म असोत, किंवा देहांतील मनबुद्धीचे धर्म असोत, हे सर्व धर्म आपल्या स्वरूपाहून वेगळें असल्यामुळें आपल्याहून परक्याचे धर्म म्हणजे परधर्म होत; स्वधर्म व परधर्मांची अशी व्याख्या आहे. पण स्वधर्म म्हणजे हल्ली जो रुढार्थ आहे तोच ग्राह्य धरल्यास काय मौज उडेल पहा! समजा एक वारयोषिता आहे तिचाहि तिच्या धंद्याला साजेल असा एक धर्म असतोच, व तोच त्या नगरभवानीचा स्वधर्म आहे हें गृहीत धरून तिनें एकनिष्ठपणें पाळला, आपले पोटीं जन्मास आलेल्या मुलीस पाळण्यास शिकविले व शेवटी ती आपल्या स्वधर्मांतची मरण पावली तर, या स्वधर्मांत राहून स्वधर्माचाच आपल्या मुलीबाळींत प्रसार करणाऱ्या व स्वधर्मांतच निधन पावणाऱ्या बाईचें चरित्र एखादे संतलीलामृतांत गोवण्यास कोणीं श्रीधरस्वामी पुढें आल्यास कोणी सांगावें?

(v) भगवंतानीं धोक्याची सूचना देऊन ठेवली कीं, **'स्वधर्में निधनं श्रेयः परधर्मो भयावहः'** । याचा अर्थ वर स्वधर्माची व्याख्या केली आहे त्या प्रमाणें 'स्वधर्म साधण्याचे कामी देहदृष्टचां मरण आले तरी ते मरण श्रेयस्कर होय पण परधर्माचा स्वीकार करणें भीतीदायक आहे, असाच करणें योग्य होय देहबुद्धीचा निरास होणें हेच स्वधर्माचे म्हणजे आत्मज्ञानाचें लक्षण आहे व हे असले निधन जिते जीवंतपणीच महात्मे पाहत असल्यामुळें तें मरण श्रेयस्कर होय! **'माझें मी मरण पाहिले जे डोळा । काय वर्णू सोहळा अनुपम ।'** या जीतेपणांतील मरणाचा सोहळा कसा असतो ते परधर्मांत राहून मरणाऱ्या मुर्दाडाना काय कळणार? मरण म्हटल्याबरोबर बांब, कडबा, सुतळी, मडके, गोवऱ्या, लाकडे, पिंजरा, गाडी, पेटी, व व. ज्याच्या त्याच्या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जातीप्रमाणें जो तो सोहळा असतो, असल्याच मरणसोहळ्यांची कल्पना या अभागी जीवाच्या डोळ्यापुढें उभी राहणार!

(vi) देहबुद्धीच्या भरभक्कम पायावर ज्या इतर सर्व धर्मांची उभारणी झाली त्या परधर्मांत स्वर्ग-नरकाची, पुण्य-पापाची मोक्ष-बंधनाची लालुच व भीती आहे. पण स्वर्गसुखाची लालुचही जेथें नाहीं किंवा यमयातनेची भीतीही जेथें नाहीं, बंध-मोक्षाचे जेथें तोंड काळे आहे, जन्म-मरण म्हणजे काय हेंच जेथें कळत नाहीं, अशा स्वधर्मांत राहण्याचा प्रत्येक जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे बाकीचे सर्व परधर्म हे आगंतुकच कार्यपरत्वें आले; व 'जे आले ते गेले पाहिजे'. या निष्ठूर सिद्धांताप्रमाणें सर्व धर्म जरी कांही काळ नव्या-नवाईनें तळपत राहिले, राजाश्रयानें टिकून राहिल्यासारखें वाटले तरी ते निश्चयानें रसातळास जाणार व स्वधर्माचाच जगांत जयजयकार झाल्याशिवाय राहणार नाहीं.

(vii) परमात्म्यानीं अर्जुनास "**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥**" असाच उपदेश केला. माझ्या, प्राप्तीचे आड येणारे सर्व धर्म टाकून ज्ञानस्वरूपी परमात्मा जो मी त्या मला शरण ये. माझी प्राप्ती झाल्यानें तू कृतकृत्य होशील. करावयाचे म्हणून शिल्लक कांहीं राहणार नाहीं. तुझ्यामागील सर्व धर्मांची, सर्व कर्मांची कटकट एकदम मिटून जाईल. '**सर्वं कर्माखीलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ।**" म्हणून अर्जुनाचे मिषानें सर्व जीवास भगवंतानीं आत्मज्ञानाचा बोध केला, तो ग्रहण करून जीवानीं कृतकृत्य व्हावें

१. ८. (i) '**नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**' ज्ञान-आत्मज्ञानाइतकी पवित्र वस्तू नाहीं. ज्ञानाशिवाय इतर सर्व कार्य निरर्थक आहेत. **आत्मज्ञानविना पार्थ सर्वं कर्म निरर्थकं ।**' या ठिकाणीं असे समजू नये कीं आत्मज्ञानाव्यतिरिक्त इतर ज्ञान अगर कर्में

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निरर्थक म्हणजे फुकट अथवा निष्फल आहेत. सर्व अर्थात परम अर्थ असा जो परमार्थ तो प्राप्त करून देण्याचे कामीं इतर कर्में निष्फळ आहेत. परमार्थाशिवाय इतर आवांतर फले म्हणजे यज्ञानें स्वर्गप्राप्ती, पुत्रप्राप्ती वगैरेसारखी फलप्राप्ती होत नाहीं असें नाहीं, शास्त्रपठणानें विद्वत्ता लाभेल, नाना दैवतपूजनानें त्या त्या देवाची कृपा संपादन करता येईल. असें जरीं असले तरी जोपर्यंत आत्मकृपा झाली नाहीं तोपर्यंत ही सर्व कर्में व्यवहारदृष्टचा कितीही पुण्यप्रद असली तरी आत्मप्राप्तीचे बाबतींत अडथळेंच होत. व्यवाहारांतील सर्व उत्तमोत्तम गुण येथें अवगुण ठरतात व सर्व उपाय अपायच होतात. हें जाणून त्रैलोक्याची प्राप्ती झाली असतांहि ज्यांना त्याची दरकार नाहीं, भयानें विटाळलेले इंद्रपद ज्यांनीं काकविष्टेप्रमाणें मानले त्या संतानी फक्त ब्रह्मप्राप्तीचीच वासना आपले ठिकाणीं धारण केलीं. **ब्रह्मी 'स्पृहा इतरी निःपृहा'** हाच त्यांचा बाणा असल्यामुळें हे परम दैवाचें पुतळे ब्रह्मच होऊन राहिलें. इतकेच नव्हें तर, एकवेळ चैतन्याची व या जड शरीराची फारकत झाल्यावरोबर शरीरास प्रेत समजलें जाऊन त्याचा विटाळ मानतात, तेच महात्मे जीवंतपणीं जनवंद्य होऊन देह ठेवल्यावरहि आपल्या मृतशरीराची पूजा घेतात. त्यांच्या मृतशरीरावर अनेक देवळे बनून सर्व जगाकडून ते नित्य पूजाअर्चा घेत अमर झालेले आहे.

(ii) राम, कृष्ण, शंकर, सिद्धेश्वर, हनुमान, मल्हारी, जगदंबा हे सर्व गुरुरूप महात्मेच होते. त्यानींही जींवंतपणी उपदेशकार्य करून देह ठेवल्यावर ते देव झाले. पृथ्वींतील वरील सर्व देवळें याच देवांची असून, हेच भक्तांचें नवसास त्यांचे इच्छेनुरूप

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

पावतात व साधकांस आपल्याच तोंडीचे सद्गुरु लाभवून देऊन

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्यांचे कार्य साधून देतात. पुष्कळांची अशी समजूत असते की मी ज्या देवाची पुजा करतो तोच देव मला भेटून माझे काम करून देतो पण देव हा भक्तांचे समजूतीप्रमाणें एकांगी नसून, सर्वांतर्यामी आहे व तो कोणाचेही अंतर्यामांत स्फुरण देऊन आपलें भक्तकार्य करीत असतो. एकदां देह ठेवल्यावर तोच देह धारण करून समाधींतून बाहेर पडून मगच भक्तकार्य यांचे हातून होतें, असा कोणी गैरसमज करून घेऊ नये. पुण्याच्या पोस्ट ऑफीसांतून तेथील एखादे माणसास १० रुपये मिळावे अशी जेव्हां तुमची इच्छा असते तेव्हां तुम्ही सोलापुरास पोष्ट ऑफीसांत १० रुपये रोख अगर १० रुपयाची नोट मनिऑर्डर करण्याकरितां देतां व पोष्टाचे नियमाप्रमाणें तुमचे १० रुपये पुण्यास इष्ट अशा माणसास पावती करून त्याची पावती दुसरे तिसरे दिवशीं तुमच्या हातांत पडते. त्यावेळीं तुम्हीं कधी अशीं चौकशीं केली आहे कां कीं, 'मी' जे रुपये येथें भरले तेच रुपये अगर ज्या नंबरची नोट मी सोलापूर पोष्ट ऑफीसांत दिली,त्याच नंबरचीं नोट पुण्याचे इसमास मिळाली कीं, नाहीं?' अशा तऱ्हेचा प्रश्न तुमच्या मनांत केव्हांच उत्पन्न होत नाहीं. याचें कारण तुमचें लक्ष नंबरावर नसून त्या किंमतीच्या ऐवजावर असतें व तितका ऐवज बरोबर पावती झाला म्हणजे मग तो कोणत्याहि रूपानें मिळाला तरी तुमची तक्रार नसतें. त्याच-प्रमाणें हे देव होऊन बसलेले संत, महंत आपल्या भक्तांचें कार्य आपल्याच तोंडीचे जगांत जीवंतपणीं उपलब्ध असलेल्या महात्म्या-मार्फत घडवून आणतात, हेंच त्यांचे नवसास पावणें होय. असो (iii) जितेपणीं मान्यता पावून देहदृष्टचा मरण आल्यावरही कीर्तिरूपानें जे अमर झाले, त्यांच्यापाशी अशी काय किमया होती की, त्यांनी हें असलें ध्रुवपद पटकावून अजरामर व्हावें! अशीं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कोणती विद्या होती कीं, त्यांचे बलावर त्यांनी लोकांकडून मृत झाल्यावरही पुजा घ्यावीं! जगांत अनेक विद्या आहेत, अनेक शोधक आहेत, अनेक धाडशी, शूरवीर आहेत व त्यांची ते जीवंत असतांना लोकांत वाहवा होते. पुष्पभारानीं, हारांनीं, गुच्छांनीं ते आपल्या लौकिकाबद्दल आच्छादले जातात. त्यांच्या गाड्याचे घोडे सोडून माणसें त्यांना वाहून नेवून आपली भक्ति प्रकट करतात, पण हा एकवेळ वंद्य झालेला महापुरुष लगेच लोक–निंदेसही पात्र होतो. "महात्मा" म्हणून ज्यांचे थोडे दिवस लोक थोर माजवतात, त्यांचेवरच निंदाव्यंजक ठराव अनेक सभांतून पास करण्यास तेच लोक पुढाकार घेतात. यावरून या महात्म्यांचे महात्मेपण कृत्रिम असते, ते चिरकालिक नसते, हे उघड आहे. याचें कारण त्यांचें महात्म्य त्यांचे ठिकाणीं असलेल्या कृत्रिम अशाश्वत विद्येच्या जोरावर टिकलेलें असते. त्यांचें महात्म्य आत्मविद्येसारख्या पवित्र चिरकालीन शांतिदायक अशा विद्येवर आलेले नसून भौतिक शास्त्राच्या, राजकारणांच्या व्यवहाराच्या पायावर उभारलेले असतें व राजकारणाची पगडी जसजशी फिरते, जसजशी भौतिक शास्त्रांत पुढील प्रगति होते, त्या मानानें पूर्वी एकवेळ मान पावलेला पुरुष, पामर ठरतो व तो जगाच्या कोठल्या तरी कोना-कोपऱ्यांत पडून दुसराच कोणी सुधारणेच्या क्षितीजावर चमकूं लागतो. आत्मविद्येशिवाय दुसऱ्या कोणत्याहि विद्येवर प्राप्त झालेली महती ही वरीलप्रमाणें उलटा-पालटीची असल्यामुळें जीवंतपणींच या महंताना मान व अप–मानाचे आंवट, गोड अनुभव घ्यावा लागतो. मग मृत झाल्यावर या महंताकडे कोणी ढुंकूनही बघत नसल्यास नवल नाहीं. पण 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' – सर्व विद्येत अध्यात्मविद्या हीच

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

चिरकालिक, शांतिप्रद आहे व या विद्येच्या जोरावर अंगी येणारे महात्म्यहि चिरकालिक असतें; म्हणून **'नेदी चित्ता शांती ऐशी विद्या कशाला ।'** अशी पृच्छा एक संत कवीनें केली आहे.

(vi) जगांत हल्लीं इतक्या विद्या प्रचलित असूनहि कोणालाच शांतीने वरूं नये, थोडीहि धडपड शांत होऊं नये, मनाची तळमळ बंद होऊं नये, त्याचे एकच कारण तें हें की, या सर्व विद्या अविद्यात्मक असून मानवी मनाची शोभा वाढविण्याकडेच त्यांचा उपयोग होतो. शांतीचा व या विद्याचा कसलाहि कार्य-कारण संबंध नाहीं. नाना रत्नांची परिक्षा करणारा, नाना शास्त्रांची परिक्षा करणारा, नाना सौंदर्यांची परिक्षा करणारा, स्वतःचीच परिक्षा करण्यास असमर्थ असल्यामुळे शांतिसुखास आंचवला! ज्यानें स्वतःचे घर तपासलें नाहीं, त्याने दुसऱ्याची परिक्षा काय म्हणून करावी? हा अमका तो अमका असे बेधडक सांगणारा आपण स्वतः कोण हें सांगू शकत नाहीं तोपर्यंत त्याची भगभग सुटणें शक्य नाहीं स्वतःचा स्वतःलाच पत्ता लागला नाहीं, त्यानें दुसऱ्याचे कितीहि पत्ते काढून अमूक वस्तू अमक्यापासून निघते असा जरी शोध लावला तरी आत्मशोधनाशिवाय सर्व कांहीं व्यर्थ आहे.

प्रकरण २ रें– 'मी' च्या शोधासाठीं चार देहांचें परीक्षण

२१. (i) प्रत्येक जीवमात्रांचे ठिकाणी "मी" म्हणून हुंकार भरणारा, माजलेल्या बैलाप्रमाणें डरकाळी फोडणारा हा "मी तरी कोण आहे? या "मी" चे आई, बाप कोण? "मी" ला खरोखरीचें अस्तित्व आहे कीं, हा कोणी उपटशुंभ दोघांचे भांडणांत तिसराच कोणी मध्ये घुसला आहे, याचा आपण तपास तर करूं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

(ii) कोणी एक अंधेरी नगरींत बरेच दिवस 'गोमाजी गणेश पितळी दरवाजा' या नांवाचा शिक्का करून एका उपटशुंभानें तो शिक्का दरबारचे कोणत्याहि हुकुमावर अगर इस्टेटीचे कोणतेही दस्तऐवजावर असल्याशिवाय हुकुम किंवा दस्तऐवज कायदेशीर मानला जाऊं नये, अशी वहिवाट पाडून ठेविली होतीं व त्या 'पिछेशी आयी' च्या वहिवाटीप्रमाणें त्या अंधेरी नगरीचे सर्व अधिकारी -"गोमाजी गणेश पितळी दरवाजा" हा शिक्का असल्यासच दस्तऐवज ग्राह्य समजत व हुकुम कायदेशीर समजत. असा क्रम वरेच दिवस चालल्यामुळें अंधेरी नगरींत तो शिक्का दृढमूल होऊन बसला. "गोमा गणेश" हा आहें तरी कोण याचा कोणी चौकशीच केली नाहीं; पण कालांतरानें कोर्टाचे एका कामांत "गोमा गणेश" चा शिक्का नसलेला एक महत्वाचा कागद पुढें आला व मामुली वहिवाटीप्रमाणें इतर सर्व बाजूनी कायदेशीर असूनहि 'गोमा गणेश' चा शिक्का नाहीं म्हणून पुराव्यास अग्राह्य आहे. असा मुद्दा निघाला. त्यावेळी त्या अर्जांतील एका खंबीर पक्षकारानें चालूं राजवटींतील योग्य त्या अधिकाऱ्याच्या सह्या शिक्यानिशी पूर्ण असलेला हा दस्तऐवज कोणत्या आधारानें अग्राह्य ठरतो व हा "गोमाजी गणेश" कोण? त्याचा शिक्का काय म्हणून दस्तऐवजावर पाहिजे! हाच मुद्दा भांडणांत उपस्थित करून त्या शिक्याच्या कायदेशीरपणाच वादाला घातला. आजपर्यंत अशा तऱ्हेचे धारिष्ट कोणी केले नसल्यामुळें व मुळासच हात घालून "गोमा गणेश पितळी दरवाजा" बंड तरी काय आहे, याचा निकाल करून घेण्यास मुद्दा प्रथमच नवीन उपस्थित झाल्यामुळें, कोर्टानीहि हें काय प्रकरण आहे, या कुतूहलबुद्धीने तो मुद्दा चौकशीस घेतला. पूर्ण चौकशी अंती

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कोणीतरी उपटशुंभानें अंधेरी नगरीच्या टिमटिम राज्यपद्धतीचा फायदा घेऊन आपला शिक्का उगीचच्या उगीचच अनधिकारानें मध्येंच घुसडून दिला व अंधेरी नगरींतील आंधळ्या अधिकारी, वर्गांनी तो निमूटपणें चालू दिला; वास्तविक हा 'गोमा गणेश' म्हणजे कोणीच नसून, त्याला कसलाच अधिकार नव्हता असें आढळून आले! त्या दिवसापासून त्या शिक्याची काय शोभा झाली असेल हें निराळे सांगण्याची जरूरी नाहीं.

(iii) वर सांगितलेल्या गोष्टींतील गोम्याप्रमाणे जिथें तिथे 'मी' 'मी' 'माझे' 'माझे' म्हणून वर्चस्व गाजविणारा हा मी आहे तरी कोण, याची आपण चौकशी केली पाहिजे. असा एक नियम आहे की, दोघांचे भांडणांत तिसऱ्याचा फायदा होतो किंवा दोन वस्तूंच्या संगमांत तिसराच एक पदार्थ, नसलेलीच एक वस्तू तयार होते. जसें फुले आणि दोरीच्या संयोगांत "हार" ही कधीं नसलेलीच वस्तू तयार होते व ज्या आईबापापासून हा हार निर्माण होतो तो उत्पन्न झाल्यावरोवर आईबापाच्या नांवाला काळोखी फासून आपणच प्रसिद्ध होतो. फूल आणि दोरा ही नावें नाहीशीं होऊन, हार हें नवीनच नांव पुढें येते व त्या नांवानें पुढील सर्व व्यवहार होतो. पाणि आणि मातीच्या संयोगानें पाणि आणि माती हीं दोन्हीं नांवे जाऊन 'चिखल' हा 'मी' म्हणून उठतो. तसेंच दगड, विटा, चिखल व गवंडी यांच्या संयोगाने 'भिंत' ही तिसरीच वस्तू डोळ्यापुढें उभी राहून दगड, विटा, चिखल व गवंडी हे दृष्टिपथांतून केव्हांच गडप होतात. त्याप्रमाणें ज्ञान व अज्ञान यांचे संयोगांत बुद्धी म्हणून एक अजब चीज पैदा झाली आणि अज्ञान-बुद्धीसंयोगांनें जगत् निर्माण झाले. सोनें आणि सोनार मिळून दागिन्यास जन्म झाला; दागिना

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दागिन्याचे रूपानें दृष्टिस भूल पाडू लागला की, तो सोन्याचा व सोनाराचा विसर पाडतो. वास्तविक सोन्यांत दागिना म्हणून पदार्थ कोठें आहे हें पाहूं गेल्यास, पाहू तेथें सोनेंच दिसते. सोन्यास हात न लावतां जर कोणास दागिना आणून दे म्हंटल्यास तो काय आणून देईल? दागिना हा चोर आपले तोंडच काळे करील. त्यांच न्यायानें माया आणि ब्रह्म यांचें मिलनानें, सर्व जीवाचें ठिकाणीं दिमाखानें हुंकार भरणारा चोर 'मी' हा आपलें डोकें वर काढून, माया आणि ब्रह्म या दोघांचेहि उच्चाटन करतो; नसलेलाच हा वंध्यापुत्र सर्व जगांत आपली एकछत्री सत्ता कायम करण्याचा प्रयत्न करतो. याचे आई-वापाकडें जरा पाहिल्यास असें दिसून येईल कीं, या जोडप्याना हे 'मी' चें कारटें होणेच आधी दुरापास्त आहे. 'मी' ची आई माया (मा=नाहीं, या=जी) जी नाहीं, असल्या नाहींबाईच्या पोटी, तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी कर्तृत्वकलाशून्य अशा बापापासून 'मी' ची उत्पत्ती झाली, तो 'मी' काय स्वरूपाचा असेल याची वाचकांनीं कल्पना करावी.

(iv) वर वर्णिल्याप्रमाणें मीचें अस्तित्व नांवालाच असून गोमा गणेशाप्रमाणें हा जिथें तिथें आपले नांवाने ग्वाही फिरवून 'मी शहाणा', 'मी मोठा', 'मी छोटा', म्हणून मिरवतो, तो मीं कोण याचा आपण आणखी तपास करूंया. या 'मी' नें आपलें मी पण गाजवून ज्याच्यापासून आपली उत्पत्ती झाली त्याचा विसर जीवास पाडला व त्यांतच स्वत:स हा 'मी' धन्य मानू लागलो, हें जरी खरें तरी या बेटयाने तूप पाहिले पण गडगा कोठे पाहिला? अधिकार घेतल्याबरोबर जबाबदारीही मागे लागते. मीं अमुक कृत्याचा कर्ता म्हटल्याबरोबर त्या कृत्यफलाचा भोक्ताही मीच झाला पाहिजे. कर्तेपणाच्या बोकांडीच भोक्तेपण बसलें आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वास्तविक 'मी' हा कोणीच नसून सर्व कर्तेपण ब्रह्माचे ठिकाणी आहे; पण परब्रह्मही कसले धूर्त आहे, स्वत: सर्व कांहीं करून, त्याला आयताच एक घमेंडानंद 'मी' भेटल्याबरोबर, आपली सर्व जबाबदारी त्या 'मी' च्या डोक्यावर लादून स्वत: अलिप्त राहिला व हा मूर्ख बेटा 'मी' दुसऱ्याचे ओझे आपल्या डोक्यावर घेऊन जन्म–मरणाच्या चक्रांत गिरक्या खात पडला आहे!

(v) फुले व दोऱ्याचा लोप करून हारास हार हे नांव घेऊन जरी पुढें येता आलें तरी फुलें सुकल्यावर कोणी फुलें सुकलीं असें म्हणत नाहींत, तर हार सुकला असे म्हणतात; वास्तवीक दोरा तुटला तरी हार तुटला असे म्हणतात; म्हणजे मूलभूत पदार्थीचें क्रियाकर्तुत्व आरोपित वस्तूवर, त्या वस्तूचे अभिमानामुळें येते. त्याचप्रमाणें या नसलेल्या 'मी' च्या अभिमानामुळें त्याचेवर सर्व संकट परंपरा ओढवते. या संकटातून मुक्त व्हावयाचें असल्यास मीपणा टाकून दिला पाहिजे; पण तो मीपणा टाकण्यापूर्वी 'मी' 'मी' म्हणणारा हा मी कोठे आहे तें पाहूं व तो एकदा सांपडल्यावर, मग टाकण्याच्या बाता मारूं.

'मी' चा शोध ज्यानें त्यानें आपल्यापासूनच करण्यास सुरवात करावी. आपल्याबाहेर 'मी' कोठेच सांपडणार नाहीं, प्रत्येक जीवाचे ठिकाणी अहंता म्हणजे मी, व ममता म्हणजे माझेपणा ठेवून भरला आहे 'जगांतील सर्व व्यवहार या अहंता व ममतेच्या जोरावर चालले आहेत, असा सर्व जीवांचा पक्का सिद्धांत होऊन बसला आहे. पण सर्व व्यवहार अहंता व ममतेशिवायही होऊ शकतात; ते कसे तें पुढें पाहू. तूर्त अहंता, ममता यांचीच मीमांसा करूं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

२. २. (i) मी कित्ता आहे शोधण्यासाठीं अगदीं जवळचें, आपल्यास

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

खेटून असलेले आपलें जड स्थूल शरीर घेऊं व त्याचे पृथ:करण करून 'मी' कोठे सांपडतो कां तें पाहू. शरीर म्हणजे तरी काय? हात, पाय, पाठ, तोंड, नाक, डोळे, कान वगैरे अवयवांचे संमेलन. या सर्व सभासदांची कमिटी म्हणजे हें शरीर या कमिटींतील सभासदापैकीं 'मी' कोण आहे ते पहा. हात म्हणजे मी असे म्हणावें, तर हात कापला तर मी कापला असे कोणींच म्हणत नाहीं. डोळें गेले तर 'मीं गेलो' असेहि म्हणत नाही. पोट फुगले तर मी फुगलो असा कोणी शब्दप्रयोग करीत नाहीं. तर माझा हात कापला, माझे डोळे गेले, माझें पोट फुगले वगैरे सर्व अवय-वाबद्दलही अशीच माझेंपणाची भाषा वापरली जाते. इतकेच नाही· तर सर्व अवयवांची मिळून झालेली कमिटी म्हणजे शरीरही माझें आहे असाच शब्दप्रयोग होतो. म्हणजे सर्वं अवयवांचे ठिकाणीं व शरीराचे ठिकाणीं माझेपणा स्थापित करणारा अवयवाचा व शरीराचा मालक मी हा या सर्वांपासून कोणी वेगळाच आहे असे ठरले.

(ii) वर स्थूल शरीरांतील कोणतांहि भाग मी नसून ते माझे आहेत असे आपण बोललों खरें; पण जेथें मी नाहीं तेथें माझे-पणाही असणें शक्य नाहीं, या न्यायाने शरीर, अवयव हे माझे असणें शक्य नाहीं. शेजाऱ्याच्या घरांत मी नाही मग शेजाऱ्याचे घर किंवा त्यांतील मंडळी ही तरी माझी कशीं होऊं शकतील? 'जेथें' मी नाही तेथें माझेपणाही नाहीं' या सिद्धांताचा रोखठोक अनुभव घ्यावयाचा असेल तर शेजारी असलेल्या रावबहादूराच्या घरांत जा व रावबहादूर तो मीच व रावबहादुरची वायको ती माझीच म्हणून तिच्यावर ममता (मम–माझें ता–पणा) दाखवा, तिच्याशी प्रेमालाप करण्यास लागा म्हणजे माझेपणानें काय

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

साक्षात्कार होतो तें पहा! लगेच रावबहादूरच्या हातानें तुमच्या गालावर गुलाबी रंग चढून "मी तो नव्हें" व "ती माझी नव्हें" असा खाडदिशी झणझणीत अनुभव येईल, त्याचप्रमाणें शरिरांत जर मी कोठेंच नाही तर शरिराचे अवयव व शरीरधर्म माझे आहेत असे कसें म्हणावें? जर म्हणाल तर काय परिणाम होईल, त्याचा विचार करा; किंवा विचार करण्याचें कारणच काय? देह माझा असें मानून आपण वर्तू लागल्यामुळें सर्व जीवांची काय दशा झाली व होत आहे हें आपण रोजच्या रोजच पहात आहोंत स्वतःस विसरून मी कोण आहे हें न कळल्यामुळें जीवास अनेक योनीत जन्म घेऊन कोठें जंत होऊन नरकांत पडावें लागले, तर डुकर होऊन विष्टा खावीं लागलीं आणि कोठें बैल होऊन तेल्याचे घाण्यास जुंपून फिरावे लागलें, तर गाढव होऊन मरेतो–पर्यंत काम करून उकिरड्यावर लोळावे लागले! अशा किती यातना भोगाव्या लागल्या याचे वर्णन करणें अशक्य आहे.

(iii) सर्व जीवयोनी भोगून शेवटीं परमात्म्यास ओळखतां यावें म्हणुन जीव बुद्धिप्रदान मनुष्य योनींत जन्मास आला. याही योनींत विचार करून आपल्या शरिराकडे पाहिल्यास नुसतें शिमग्याचें सोंग दिसते. शिमग्यांत एखाद्या माणसाचे तोंडास काळे फासून, अंगभर चिंध्या घालुन, गळ्यांत खेटराची माळ घालून, डोक्यावर केरसुणीं व जुनी खेटरांनीं तयार केलेली छत्री धरून, गाढवावर बसवून शंखध्वनीच्या × × मंगल वाद्यगजरांत त्याची रस्त्यानें मिरवणूक चाललेली असते; पण ही गाढवावर बसलेली ध्यानदेवता स्वतःस या फजितीनेच धन्य मानून, ऐटीने गाढवावर बसूनच लोकांस रामराम करींत सुटते! त्याचप्रमाणें मनुष्याचें शरीर म्हणजे एक विचित्र ध्यानच आहे. तोंडाकडे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निरखून पहा तोंडाचे सर्व सौंदर्य नाकाडोळयांत आहे, नाका-डोळयांनीं अमका मनुष्य अगर स्त्री सुंदर आहे म्हणतो; पण नाक म्हणजे शेंबडाची नळी व डोळे म्हणजे चिपळाचीं उखळी आहे. तोंड म्हणजे लाळ–बेडकाची पिकदानी, पोट म्हणजे म्युनिसि–पालिटीचा मैला डेपो व शरीर म्हणजें हाडमांस रक्ताचे चिखलानें तयार केलेला शिराळशेट! अशा शरीराचें रूपानें जीवाची फजित करून सुखासाठीं बोंवलून, दाही दिशा हिंडवून त्यास जागा करण्याचा परमात्म्याचा हेतु असून, जीवानं उलट त्यांतच आनंद मानला व शेंबडयाचे नळीस चाफेकळी, चिपळाचे उखळींस कमलनेत्र, लाळथुंकीच्या पिकदानीस मुखचंद्रमा, झाडाच्या फांद्यासारखा वेडयाविद्रया हातपायास हस्तपादकमल अशा गोजिर-वाण्या भाषेनें या शब्दांस गौरवून फजितीमध्येंच जिती (जय) मानून हा जीव आपले कोडगेपणाचें प्रदर्शन करीत आहे! परमेश्वरानें असल्याहि मनुष्यरूपी शिमग्याचें सोंगात इतर योनीपेक्षा एक अजब चीज म्हणजे बुद्धी देऊन ठेवली आहे. त्याचा उपयोग परमात्म्यास ओळखून सर्व सोंगाची समाप्ती या जीवांस करता यावी हा हेतु आहे. परंतु जीव हा अशाही सोंगात आपल्या बुद्धीचा दुरुपयोग करून गटारांसच गंगा व देहासच देव मानीत आहे व त्याचेच चोचले करीत आहे! स्थूल शरीराचे ठिकाणीं 'मी' चा अभिमान धारण करून या शरीराचे नटविण्यामुरडण्याकडे वेळ खर्चून त्यांतच जीव दंग होतो व या शरीराशीं दुसऱ्या एका स्त्रीशरीराचा शरीरसंबंध जोडून त्या स्त्रीशरीरास माझे म्हणून तिचे ठिकाणीं ममता (माझेपणा) ठेवतो व या मी व माझेपणाच्या संयोगांत अनेक लेंढारे मागे लागून संसार कसा जोडतो, कसा मोडतो जीवाची कशी फजिती होते, याचें अति बहारीचें वर्णन

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

समर्थांनीं दासबोधांत केलें आहे, ते संपूर्ण वाचावें अशी शिफारस केल्यावांचून राहवत नाहीं. असो.

(iv) शरीरांत तर मीचा शोध लागत नाही शरीर माझेही पण नाहीं, मग हें शरीर कोणाचें आहे? याचा मालक कोण? या शरीरावर पंचाची मालकी आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हे त्याचे मालक होत. देह पडल्यावर जे ते आपापला भाग आपल्यांत समावेश करून देह नाहीसें करतात. पंचभूतांचें गांठोडे म्हणजे हे शरीर आहे. गांठोडयांतील सर्व कपडे ज्याचे त्यानें घेतले व ज्यांत सर्व कपडे बांधले होते तेही कापड त्याचे मालकानें घेतल्यावर गांठोडे म्हणून काय चीज राहील? ती दाखविण्यासही शिल्लक राहत नाही. त्याच-प्रमाणें पंचतत्त्वांचें शरीर पंचतत्त्वास पावल्याबरोबर शरीर म्हणून कांहीं पदार्थच राहत नाहीं. याप्रमाणें शरीरांत मी नाहीं व शरीर माझेंहीं नाहीं. अशा शरीरावर मीपणाचा अभिमान राहूं शकत नाहीं; किंवा देहसंबंध करून असलेल्या सर्व नात्या-गोत्याशीं, जन्म-मरणाशी, षड्विकाराशीं माझेंपणाचा अभिमान राहणें शक्य नाहीं, शरीर बाल्य, तारुण्य व वार्धक्य या दशेंत असलें किंवा शरीर काळें, गोरें, सुंदर, कुरूप असलें, शरीर कोणत्याही देशांत, जातीत, धर्मांत, कुलांत उत्पन्न झालेले असलें, शरीरावर अनेक व्याधींनीं आपलें ठाणें दिलेले असलें, शरीर हे वणवण करीत किंवा तीर्थयात्रा करीत भटकत असलें, किंवा समाधिस्थ होऊन तटस्थ बसलेले असले तरी हे सर्व धर्म देहाचे असून त्यापैकीं एकही धर्म माझा नाहीं, मी या सर्वांहून निराळा आहे. एवढें आपल्याला या स्थूल देहाचे पृथःकरणांत समजून चुकतें. परक्याचें सोन्यासारखें गोंडस पोर पण आपल्या शेंबडया

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

देवीच्या वणाच्या काळा टोण्यापुढें तें कांहींच नाहीं. आपले जुने खेटर हरवल्याचें जेवढें दुःख आपल्यास होतें तेवढेंही दुःख दुसऱ्याचें गोंडस पोर मेलें तरी होत नाहीं. याचे कारण परक्याचे ठिकाणी माझेंपणा नव्हता, तो आपले ठिकाणीं माझेंपणाचा अभिमान आहे, हें तें एकदां अमुक माझी नाहीं, ती परक्याची आहे असे समजल्यावरोबर परक्याचें ठिकाणीं उदाशीन होतो व पुढेपुढे परक्याचा तिरस्कार वाटून त्याचा त्यागही होतो. 'परक्याचे शरीर हें आपले नव्हे, तें पंचाच्या ताब्यांतले परक्याचें धन आहे. हें आपल्यास समजल्यावर ते कसेही असलें तरी त्याचे आपल्याला काय!' चला याचा त्याग करून पुढें जाऊं.

(v) शरीराचा त्याग करावयाचें म्हणजे त्यास विहिरींत ढकलून द्यावयाचे किंवा त्यास फांसावर लटकावयाचें असें मात्र नव्हे; शरीराचें यथार्थ ज्ञान हेंच त्यागाचें लक्षण होय. शरीराचा प्रत्यक्ष नाश करून त्याचा त्याग केल्यानें शरीर हें फिरून फिरून जन्मास येणारच आहे. शरीराचा आत्यंतिक त्याग फक्त विचारानेच होतो व हा विचारानें झालेला शरीर त्याग पुनः जन्मास कारणीभूत न होतां जीवास मोक्षप्रद होतो. नित्यप्रळय, मृत्यूप्रळय, ब्रह्मप्रळय, कल्पांतप्रळय, विचारप्रळय असे पंचप्रळय आहेत. त्यापैकी नित्यप्रळय, सर्वांच्या परिचयाचा आहे. तो प्रळय म्हणजे झोंप. गाढ झोंपेंमध्यें सर्व जगाचा आपल्या देहासकट प्रळय होतो; पण जाग झाल्यावरोबर जग व शरीर जसेच्या तसे दिसूं लागतात व पूर्ववत् सर्व व्यवहार सुरु होतात. मृत्यूप्रळयाचीही गोष्ट अशीच आहे. मृत्यूनंतर आत्मज्ञानाचें अभावी जीवांचें कर्माप्रमाणें कोणत्या तरी योनींत जन्म घेऊन पुन्हां शरीर धारण करावें लागतें व तेथेंहि आहार, निद्रा, भय, मैथुनादि व्यवहार पूर्व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जन्मसंस्काराप्रमाणें सुरु होतात. ब्रह्मप्रळय म्हणजे ब्रह्मदेवाची आयुष्यमर्यादा संपल्याबरोबर होणारा प्रळय, कल्पप्रळय म्हणजे अनेक ब्रह्मदेव एका कल्पाचे ठिकाणीं येऊन-जाऊन शेवटी ठराविक वेळीं होणारा प्रळय; पुन्हा नवीन कल्प सुरु होऊन कांहीं काळ सुप्त असलेली सृष्टी नव्या दमानें उदयाला येऊन पूर्ववत् व्यवहार सुरु होतो. येणेप्रमाणें हें उदय अस्ताचे रहाटगाडगे या चारी प्रळयांत चालूच राहतें. त्यामुळें शरीराचा अत्यंत नाश या चारी प्रळयांत होऊं शकत नाहीं. परंतु विचार प्रळयांचें सामर्थ्य मात्र फार मोठे आहे व विलक्षणही आहे; या प्रळयांत शरीर जीवंत असूनहि त्याचा नाश करतें व शरीर मृत झाल्यावर तर त्याचा अत्यंत नाश करील व फिरून त्यास डोकें वर करूं देणार नाहीं यांत नवल नाहीं.

(iv) रबराचा एक साप पडला आहे. असें समजा तो रबराचा आहे असें जोपर्यंत विचारानें त्याचें ज्ञान झालें नाही तोपर्यंत तो साप दिसूं नये म्हणून डोळे झांकून घेतले अगर त्यास टोपलींत झांकलें तरी सर्पदर्शन व सर्पभय हे नाहींसे होईल काय? डोळे किंवा टोपली उघडले कीं पुन्हा साप! वरें कोणाकडून तो साप काढवून लांब फेकून देऊन कांहीं काल स्वस्थ राहिला तरी पुन्हा एखादे टार्गट पोरांनी तो रबराचा साप आणून पुढें टाकला कीं, फिरून याची घाबरगुंडी होतेच. साप दिसूं नये म्हणून गाढ झोंपी गेला तरी उठल्यावरोर साप दिसण्याचें बंद पडत नाहीं. साप दिसूं नये म्हणून किंवा त्याची भीती वाटू नये म्हणून दारू अफूची निशा केली किंवा क्लोरोफार्म घेऊन बेशुद्ध पडला तरी शुद्धींत आल्यावरोबर पुन्हा साप जीवंतच! एकूण काय की सर्पाचा अशा रीतीनें केलेला प्रळय तो चिरकालीन नसून तात्पुरता

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

होय; पण तेवढ्यानें कायमची सर्पभयापासून सुटका कशी होणार? जर सर्पभयापासून सुटका करून घेण्याचें असेल तर त्यास एकच उपाय तो हा कीं, त्याचें यथार्थ ज्ञान विचारानें करून घेऊन तो रबराचा आहे असे ठाम समजणें. व एकदां असें ज्ञान झाले म्हणजे रबराचा साप डोळ्याने दिसत असूनहि सान मेल्यासारखाच आहे व कोणी भिवविले तरी मग भय वाटण्याचें कांहींच कारण राहत नाहीं. त्याचप्रमाणें हें शरीर काय आहे याचें बरोबर ज्ञान झाल्यावर मग हें शरीर जीवंत असूनहि त्याच्यावरचा अभिमान लुप्त होऊन त्याचा त्याग घडतो. हाच तो विचारप्रळय होय व अशा विचारांनीं एकदां शरीर नाहींसे केल्यावर त्यास पुनरावृत्ती नाहीं. जो विचारानें मेला तो कायमचा मेला व जो अविचारानें मेला तो पुन्हां मरण्याकरितां जन्मलाच म्हणून समजावें! विचारप्रळयाने वस्तू दिसत असूनहि नसल्यासारखीच आहे, व इतर प्रळयानें वस्तू कांहीं काल नाहींशी केली तरी ती असल्यासारखीच आहे म्हणून समर्थही म्हणतात:— **'विचारेंचि सार्थकता जनामध्यें'**. असो. येणेंप्रमाणे विचारप्रळयाचे चाळणींतून स्थूल शरीरांत 'मी' हा कोठेंच सांपडला नाहीं.

२.३. (i) आतां ही विचारप्रळयाची चाळण सूक्ष्म शरीरास लावून त्यांत कोठें हा चोरटा 'मी' सांपडतो कीं काय पाहूं. आतां सूक्ष्म शरीर म्हणजे तरी काय हें प्रथम पाहिलें पाहिजें. हें शरीरही पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, पंचप्राण, मन, बुद्धी अशा १७ मेंबरांची वरिष्ठ दर्जाची कमिटी आहे. या कमिटीतून जे हुकुम सुटतात ते स्थूल शरीररूपी कमिटीच्या कार्यकारी सभासदाकडून अमलांत आणलें जातात. सूक्ष्मशरीर कमिटीचा अधिकार फार मोठा असल्यामुळें त्या अधिकारलालसेनें 'मी' याच कमिटीत सांपडण्याचा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संभव आहे म्हणून येथें त्याचा शोध केला तर, येथेंही जिकडे पाहावे तिकडे 'मी' नें माझेपणाचाच शिक्का मारलेला दिसतो. माझी इंद्रिये, माझे प्राण, माझें मन, माझी बुद्धी, असेच जिकडे तिकडे दिसून येतें. मी प्राण, मी मन, मी बुद्धी, मी इद्रियें असा ध्वनि कोठेच ऐकू येत नाहीं. या सूक्ष्म शरीरावर 'मी' आपली मालकी सत्ता ठेवून स्वत: कोठेच दिसत नाहीं. 'जेथें मी नाहीं तेथें माझें नाहीं' या आपल्या सिद्धांताप्रमाणें सूक्ष्म शरीर किंवा त्याचे घटक इंद्रियें प्राण, मन, बुद्धी हे मी अगर माझे नाहींत किंवा त्याचे व्यापार–धर्म हेही माझे नाहीं.

(ii) 'जेथें' मी नाहीं तेथें माझे नाहीं' या सिद्धांतावर असा एक आक्षेप येईल कीं, सोलापुरांत पंचम जार्ज बादशहा नाहीं म्हणून सोलापुर हे त्याचे मालकीचें आहेच कीं नाही?* येथें ते नसले म्हणून काय झालें! याचें उत्तर असें आहे कीं, पंचम जार्ज बादशहा म्हणून कोणी तरी व्यक्ति अस्तित्वांत आहे. व तो कोठेंहि आपले अस्तित्वानें असला तरी त्याचि सत्ता तो प्रत्यक्ष नसल्या ठिकाणींहीं असू शकते. पण हा 'मी' कोणीच नसून गोमा गणेशाप्रमाणें अंधेर नगरींत म्हणजे अज्ञानाचे साम्राज्यांत सत्ता गाजवूं लागला आहे. सबब सुतराम नसलेल्या 'मी' चा जेथें पत्ता लागत नाहीं तेथें माझेपणा तरी कोठून येणार? सूक्ष्म शरीर हेही एक पंचतत्त्वाचे सूक्ष्म रेशमी गांठोडेंच आहे. स्थूल देहाचें गांठोड्यापेक्षां या रेशमी गांठोड्याची रेशमीं गांठ विचारानें सोडविणें कठिण असले तरी, रेशमी गांठ प्रयत्नानें सोडविणें

---

*त्या काळांत (सन इ. स. [illegible] ला) हिंदुस्थानावर ब्रिटोशांची सत्ता असून पंचम जार्ज बादशहा होता.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भाग आहे व ही गांठ एकदां सूटून गांठोडे उघडें पडल्यावर सूक्ष्म शरीराचें ज्ञान होऊन त्याचा त्याग घडतो. जन्म-मरणाचें मूळबीज हेंच वासनारूपी सूक्ष्म शरीर होय. ते बीज ज्ञानाग्नीनें एक वेळ भाजल्यावर बीज हें बीजरूपाने दिसत राहिले तरी भाजलेले बी पेरल्यास पुन्हां उगवण्याची आशाच नको.

(iii) पण येणेंप्रमाणें स्थूल–सूक्ष्म शरीरांचा त्याग घडून त्याज-वरील मीपणा-माझेंपणाचा अभिमान सुटला तर त्याचे सर्व व्यवहार बंद पडतील किंवा व्यवस्थितपणें चालणार नाहींत अशी एक शंका या ठिकाणीं उद्भवते. त्याचें समाधान असें कीं, एकवेळ सोनें म्हणून तिजोरींत जपून ठेवलेली वस्तू परीक्षणानें पितळ ठरल्यावर ती टाकून देणारा टाकून देईल, किंवा तिजोरीतून बाहेर काढून तसेंच पडू देईल; पण त्या वस्तुबद्दलची त्याची आसक्ति जाईल किंवा कमी होईल एवढें मात्र खरें. त्याप्रमाणें शरीरावरचा अभिमान सुटला म्हणजे त्याबद्दल बेफिकीरी उत्पन्न होईल तर त्यांत कांही मोठेसे वावगें नाही. '**देह जावो अथवा राहो पांडुरंगी दृढ भावो**' अशा निश्चयापर्यंत ज्या साधकांची मजल गेली त्याची **ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी ॥**' अशी स्थिती झाल्यास ती कौतुकास्पद आहे कबीराच्या पोटरीचे मांस एक कुत्र्यानें तोडलेले लोकांनीं पाहिले व कबीरास तसें सांगितलें तेंव्हां– "**कुत्ता जानेचमडा जाने** हें त्या भगवद्भक्ताचें उत्तर ऐकूण लोकांस काय वाटले असेल ? देहाभिमानाचा त्याग कबीराचे ठिकाणी कोणत्या पल्लचास गेला असेल याची साधकांनी कल्पना करावी. पण कबीराचें असें झाले. तुकारामाच्या संसाराचा सत्यानाश झाला म्हणून अभ्यासाचे सुरवातीसच तुमचा देह न सांभाळता येण्याइतका आत्मानंदाचा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कैफ किंवा मद तुमच्या अंगी येणार नाही व हरिकृपेने असला मद तुमच्या अंगी चढलाच तर तुम्हीहि "देह म्हणजे क्या बात है" असे आपोआपच म्हणाल व माझा ससार नीट चालेल कां? "जगाचा व्यवहार मी सुरळीतपणें करीन कां? असले पोचट प्रश्न मग तुम्हीं विचारणारच नाही 'होईल तें होईना कां! आणि जाईल तें जाईना कां' अशीच बेफिकीर वृत्ती तुमचीहि होईल.

(iiiअ) पण आत्मानुभवाचे अलीकडचे पायरीवर उभा राहून "आत्मज्ञान झाल्यावर शरीर-मनावरचा अभिमान सुटल्यास व्यवहार व्यवस्थितपणें चालू शकतो कीं नाहीं?" असा साधक प्रश्न करतो. त्यास धीर येण्याकरितां सद्गुरु सांगतात- "बाबारे, शरीराचा व मनाचा फोलपणा लक्षांत आल्यावरहि व त्यावरील अभिमान सुटल्यावरहि निरभिमानपणें बायका-पोरांचा संसार थाटांत करायला येतो. फोल मानलेल्या या परक्या शरीरांचे व मनाचेंही पोषण उत्तम रीतीचें करतां येते. व सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणेंच सुसंगत चोख रीतीनें बजावतां येतात. कसें तें पहा! लहानपणीचें मातृविहीन झालेल्या लेकरास सांभाळण्याकरितां ठेवलेल्या दाईच्या वर्तनाकडे पहा-ती मुलास पाजविते, हिंडविते रडल्यास रडे थांबविते. आजारी पडल्यास त्याची शुश्रुषा करते, सर्व कांही त्याच्या आईप्रमाणें करतें; लहर लागल्यास मटामटा मुक्केहि घेते पण या सर्व कृत्ययांत ते मूल आपलें आहे अशी तिची चूकूनहि भावना नसते. इतकें करूनहि मुलाचे बापानें तिला रजा दिल्यास तावडतोब चंबूगबाळें आटपून घराबाहेर पडण्याची तिची तयारी असते. मूल धष्टपुष्ट झाल्याचा तिला आनंद होत नाही किंवा एखादे दिवशी वाटेंत पोर गमावले तरी त्याचा शोकही तिला होत नाही. याचें बीज तिचें मुलाचे ठिकाणचे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निरभिमानांत आहे. निरभिमानामुळें तिच्या कर्तव्यांत कसूर झाली असें म्हणता येत नाहीं. दुसरें उदाहरण-अज्ञानाची लाखो रुपयांची इस्टेट सांभाळणारा ट्रस्टी पहा, अज्ञानाची इस्टेटींत त्याचा मीपणा, माझेपणा कोठेंही अडकलेला नसतो, तरी सर्व इस्टेटीची व्यवस्था कशीं चोख रीतीनें चाललेली असते. कामांत कसूर केल्यास उलट दंडास मात्र ट्रस्टी पात्र होतो. इस्टेटींतील वाढ होवो किंवा ती एखादे दाव्यात अज्ञानाची इस्टेट न ठरल्या-मुळें दुसऱ्या कोणाची ठरो, त्याचे शुभाशुभ ट्रस्टीला कांहीच नाही. जोपर्यंत इस्टेट ताब्यात आहे तोपर्यंत काळजीपूर्वक त्याची व्यवस्था करणें एवढेंच त्याचें काम. सारांश, व्यवहार सुरळीतपणें चालण्यास मी व माझेपणाचा अहंकार पाहिजेच असें नाहीं. त्या-प्रमाणें हें स्थूल-सूक्ष्म शरीर पंचभूतांचे मालकीचे असून त्यांनीं जीवापाशीं आपले गांठोडे ठेव म्हणून ठेवलें आहे.

(iii आ) त्या गांठोड्याची तुम्हीं ट्रस्टीं या नात्यानें उत्तम रीतीनें सांभाळ केला पाहिजे. जर कसूर कराल तर शरीराचें व मनाचें आरोग्य बिघडून तुम्हांस देहदंड भरावा लागेल. ट्रस्टीनें अज्ञानाचें इस्टेटीची चोख व्यवस्था ठेवल्याबद्दल व दाईनें मुलीची उत्तम जोपासना केल्याबद्दल जसें त्यांना मोबदल्याचा पगार मिळतो त्याप्रमाणें तुम्हींहि शरीराचा, मनाचा सांभाळ करून त्याना निरोगी स्थितींत ठेवल्यास तुम्हालाही आनंदाचा मोबदला मिळतो व परमार्थास निरोगी शरीराची मदत होते. पण हें सर्व मीपणा-माझेंपणारहित झालें पाहिजे. मग देह पुष्ट होवो किंवा रोड होवो. तो जगो किंवा मरो, त्याचे सोयरसुतक तुम्हांला येत नाहीं. अज्ञानाचा ट्रस्टी जर आपले कर्तव्य सोडून त्या इस्टेटीत माझेपणा स्थापून इस्टेटीची अफरातफर करील तरी गोष्ट

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

उघडकीस येईल तर त्यास अफू खाऊन आत्महत्या करावी लागेल किंवा तुरुंगाचा रस्ता धरावा लागेल. त्याचप्रमाणें तुम्ही शरीरा-वरील ट्रस्टीपणा सोडून शरीरावर माझें म्हणून मालकी चालवाल तर तुम्हावरहि आत्महत्येचा प्रसंग येईल (देहबुद्धी म्हणजेच आत्मविस्मृति किंवा आत्महत्या), किंवा देहबुद्धीच्या बंधनांत पडून मोक्षाची आशा दूरावेल. असो, वरील विवेचनावरून तुमच्या लक्षांत आलेच असेल कीं, सर्व प्रपंच–व्यवहार व आपले देह-मनो-व्यापार सुरळीतपणें चालल्यास त्यावर आपला अभिमान स्थापित झालाच पाहिजे असें नाही. दाई आणि ट्रस्टीचे व्यवहारांत त्यांचा अभिमान कोठेही जडला नसून त्याचे सर्व व्यवहार सुरळीत चाल-तात; तसेंच या जीवाचे सर्व व्यवहार निरभिमानपणें होऊं शकतात.

२. ४. (i) स्थूल, सूक्ष्म शरीरावरील आपला मी व माझेपणाचा ताबा उडाला व तें परक्याचें गांठोडे म्हणून निरभिमानपणें सांभाळण्याचें आपण कबूल केले तरी मी कोण, कोठें आहे? याचा अद्याप आपल्यास पत्ता काढावयाचा आहे. तर चला, आपण आतां कारण शरीरांत पाय ठेवूं; पण काय, येथें पाय ठेवल्याबरोबर जिकडे तिकडे गडप अंधार! अज्ञान ही तर मीची अंधेर नगरी नसेल ना! हेंच त्याचें राजधानीचें शहर दिसते. येथें मात्र तो मी सांपडेल अशीं आशा वाटतें. पाहूं तर खरें. पण बराच वेळ या अंधारात चांचपडलों तरी हा चोरटा मी कोठेंच हातास लागत नाहीं. येथें मीनें आपलें माझेपणही सोडून दिल्यासारखें दिसते. माझे असें म्हणण्यासारखी कांहींच वस्तू येथें दिसत नाही. येथें सर्व कांहीं सामसूम आहे. 'मी मी' 'माझे माझें' म्हणून कर्णकर्कश आरोळ्या (स्थूल-सूक्ष्म देहांत) ठोकणारा 'मी' येथें अगदीं गुपचुप बसला आहे. शोधणाऱ्यास सांपडू नयें म्हणूनच

Sri Vidyabharati Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

हा त्याचा लपंडाव दिसतो! शोधणारा या अज्ञान अंधाराच्या खड्ड्यात पडावा आपला मार्ग सोडावा म्हणून या चोरट्यानें हा काळोखाचा खंदक खणून ठेवला आहे. पण साधकानों, भिऊ नका. याही खंदकांतून सुरक्षित पार नेणारा तुमचा पाठीराखा सद्‌गुरु तुमच्या मागें व पुढें आहे. वरेच विद्वान पंडित या खंदकाचे भेसूर काळेकुट्ट स्वरूप पाहून येथूनच परत फिरले व मीचा शोध करण्याचें त्यांनीं सोडून दिले; पण तुम्हांस तसें भिण्याचें कारण नाहीं. चला, पुढें तुमचा वाटाड्याचा समर्थ सद्‌गुरु आहे.

२. ५. बराच वेळ या अज्ञान अंधःकारांत स्थिर झाल्यावर धैर्यांने तेथेंच पाय टिकवून, धरल्यावर "या अज्ञानाचा साक्षी मी आहे" अशी हळूच आकाशवाणी या ठिकाणीं कानीं पडली, त्या बरोबर 'अरे हा मी-चोर जवळपास या पलिकडे कोठें तरी आहे व तेथून अज्ञानाचें साक्षित्व करतो', असें वाटून थोडा धीर आला व त्या चोरास पकडण्याची आशा पुन्हां जोरावली व जरा नेटानें पाहू लागलो, (येथें पाहण्याचें सोडून देणें हेंच नेटाने पाहणें आहे. तें पाहणें कशा रीतीचें असणें ते पुढील अभ्यास प्रकरणांत येईलच) तो या कारणदेहाच्या खड्ड्यापलीकडें महाकारण देहांत राहून, तेथून तो कारणदेहाचें साक्षित्व करतो असे चटकन उमगले व 'मी' मला सांपडलों म्हणून जो कांही आनंद झाला तो काय वर्णावा! त्या आनंदाच्या भरांत 'प्रज्ञानं ब्रह्म' 'अहं ब्रह्मास्मि' अशी आरोळी ठोकली, मी मी म्हणणारा सर्वसाक्षी ब्रह्म मी आहे, ज्ञानस्वरूप तो मी आहे, अशीं माझीं खात्री झाली व आनंदाच्या उकळ्यांवर उकळ्या येऊं लागल्या

२. ६. पण आनंदाचा भर ओसरल्यावर काय चमत्कार झाला तो पहा; मी ज्ञानस्वरूपहि नाहीं असें विचारांती वाटू लागले.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अज्ञान जसें मला झालें तसें ज्ञानही मला झाले, मी कांहीं अज्ञानाला किंवा ज्ञानाला झालों नाहीं; ज्ञान, अज्ञान हे झाल्यानें येऊं लागले व त्यांचे जनकत्वही माझ्याचकडे येऊ लागले. सबब ज्ञान हें माझें पोर असून मी त्याचा बाप त्याहूनही निराळा आहे. ही विचार परंपरा ज्यावेळीं माझ्या ठिकाणीं सुरूं झाली त्यावेळी मी मला सांपडलो म्हणून झालेला आनंदहि हळुहळू जिरूं लागला व या महाकारणांतील अहंब्रह्मास्मीस ओहटी लागून अहंब्रह्मास्मीचा पूर्ण नायनाट झाल्यावर मात्र मी अगदी उघडा पडलों. तो मी कसा कोण याचें मला कोणत्याहि शब्दाने वर्णन करतां येंत नाहीं. तुम्हांला येथल्या मीचें वर्णन शब्दानेच पाहिजे असेल तर तुम्हीच शब्दकोशांत असलेला कोणताहि शब्द उच्चारा, शब्दांची जुळणीं करून कोणतेहि वाक्य तयार करा, तुमच्या उच्चारलेल्या शब्दापुढें अगर तयार केलेल्या वाक्यापुढें 'ते नसून त्याचें प्रकाशन करणारा' हे शब्द घालून मग तुमचे शब्द व वाक्य पुन्हा उच्चारा, म्हणजे त्यांतून जो अर्थ निघेल तें 'मी' चें वर्णन समजा. समजत नसल्यास सर्व शब्द सोडून महामौन धारण करून मी कोण तें पहा.

प्रकरण ३ रें—चार देहांचें विस्तारानें निरूपण

३. १. (i) 'मी' च्या शोधनांत स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण असें चारी देह उलथेपालथे करावे लागले तरी त्याचा पत्ता येथें लागला नाही. या चौदेहापलीकडे जेथें 'मी—तू' चें नांवही ऐकूं येत नाहीं तेथपर्यंत निःशब्दानें गेलो खरें; पण तोंड मिटून महा-मौन धरून आतांच भागणार नाहीं. मागील निरूपणांत स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण शरीराचा स्थूलपणेंच उल्लेख झाला

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असल्यामुळें या चार देहांचे सर्वांग स्वरूप निरखून ठेवण्याची अधिक जरूरी आहे व हें देह उत्तम रीतीनें समजून उमगल्याशिवाय, नीट पचनी पाडल्याशिवाय, साधकास महामौन साधणार नाहीं, म्हणून या चार देहांचें सविस्तर स्वरूप काय आहे, हें सूक्ष्म दृष्टीनें पाहूं.

(ii) येथें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, चार देह म्हणजे निःशब्दाकडे पांचव्या मजल्यावर जाण्याच्या चार पायऱ्याच आहेत. पायरी पायरीनें एक एक पायरी चढत गेल्यास बिनधोक शेंवटपर्यंत मजल गांठतां येते. मधलीच एखादी पायरी सोडून त्याचेवरील पायरीवर पाय ठेवूं गेल्यास मागें झोंक जाऊन कोसळण्याचा संभव फार सबब, एक देह कळला व तो अभ्यासाने पूर्णपणें वळला म्हणजे साधकानें दुसरा देह काय आहे म्हणून पुढें पहावें. असें न करतां व सर्वच पायऱ्या एकदम लगबगीनें पायाखाली तुडवून म्हंटल्यास सर्वच घोटाळा होईल. मग या धांदलीत झोंप व समाधी, अज्ञान व विज्ञान यांतील समअवस्थेमुळें भेदच कळेनासे होऊन, झोंपेसच समाधी व अज्ञानासच विज्ञान म्हणून साधकाचा घोटाळा होणार आहे. स्थिर भोंवरा व अतिवेगानें फिरत असल्यामुळें स्थिर वाटणारा भोंवरा त्याचप्रमाणें अंधार व अतिप्रकाशामुळें उत्पन्न झालेली काळोखी ही वरवर जरी सारखी भासली तरी दोहोंच्या अवस्थेंत जमिनअस्मानाचा फरक आहे व दोहोंची कार्येंहीं भिन्नभिन्न आहेत. सबब पायरीपायरीनें चढत गेल्यास वरील घोटाळा उत्पन्न होणार नाहीं.

(iii) या ठिकाणीं दुसरीही गोष्ट सूचने दाखल सांगून ठेवणें अगत्याचे आहे. ती गोष्ट म्हणजे शास्त्रांतील उलटसुलट निरूपणपद्धतीबद्दल साधकाचे ठिकाणीं (शास्त्रांतील खरेखोटेपणाबद्दल) उठणारे संशय कसे निमूल आहेत ते साधकास पटवणें; म्हणून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शास्त्रनिरूपण पद्धत आहे तें पाहूं. एखादी गोष्ट साधकास समजावून सांगणें झाल्यास, त्या गोष्टीचें महत्वपूर्ण वर्णन व त्याची एखादी मोठीं फलश्रुती सांगितलेली असते व ती गोष्ट एकदां पूर्णपणें साधकास समजली म्हणजे, त्यापुढील गोष्ट सांगण्यापूर्वी, समजलेल्या गोष्टीची तुच्छता व समजावून सांगितले जाणाऱ्या पुढील गोष्टीचें महत्व व फलश्रुती, पुन्हां भडक भाषेंत रंगवून सांगणें ही पद्धत आहे. याचें कारण असें की, एखादी गोष्ट समजावयाची असल्यास त्याचें महत्व वर्णन केल्याशिवाय किंवा एकाद्या मोठ्या फलप्राप्तीची लालुच दाखविल्याशिवाय त्या गोष्टीकडे प्रवृत्तीच होत नाहीं. व अशा रीतीनें एकदां ती गोष्ट समजली म्हणजे त्याबद्दलची तुच्छता आपोआप निर्माण होऊन समजलेल्या गोष्टीचा त्याग घडतो व त्यापुढील गोष्ट जाणण्यास साधक उद्युक्त होतो. ही साधकाची मनोभूमिका लक्षांत घेऊन श्रुतीमाउलीनें पायरीपायरीनें प्रथम अन्नब्रह्म असे सांगून जीवास अन्न संपादन करण्याचे कामास उद्युक्त केले. त्यानंतर स्थूल देहच ब्रह्म असें सांगून स्थूल देहास कोडकौतुक करण्यास थोडा अवधी दिला. त्यानंतर स्थूल देहास घडणारे भोग वास्तविक सूक्ष्म देहासच होतात, स्थूल शरीरांत सूक्ष्म शरीर नसले तर स्थूल शरीर हें केवळ प्रेतवत् असून त्या प्रेतास कसलेही भोग घडू शकत नाहीं. सबब स्थूल देहाचे मागे असलेले मन, बुद्धी, इंद्रियें, प्राणरूपी सूक्ष्म देहच ब्रह्म (ब्रह्म=मोठे) असा मोठेपणा देऊन सूक्ष्म देहाचे निरूपण केलें. तदनंतर सूक्ष्म देहासही गिळून गप्प बसणारा जो कारणदेह तो मोठा म्हणून कारणशरीर ब्रह्म आहे. अशीं त्याची महती गायली व तेच तूं होऊन रहा असा उपदेश केला. कारणदेह साधकाचे पूर्ण पचनीं पडल्यावर त्याचाहि निषेध

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करून त्यास जाणणारा ज्ञानस्वरूप महाकारण देहच ब्रह्म आहे सबब तेंच तूं होऊन रहा असें सांगितले, व महाकारण देहाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर आतांपर्यंत एका देहाचें सापेक्षेनें दुसरा देह मोठा व तोच ब्रह्म असें सांगत महाकारण देहाचाहि निपट करून निश्चळ ब्रह्म निरूपण करण्याचा प्रसंग जेव्हां श्रुतीवर येऊन पडला, त्यावेळी मात्र तिनें कानांवर हात ठेवले व 'नेति नेति' ते 'नव्हें नव्हें' असें एकच वाक्य उच्चार करीत राहिली. 'अज्ञान नव्हें तें ब्रह्म' ज्ञान नव्हें तें ब्रह्म व ज्याला तुम्ही ब्रह्म म्हणतां तें नव्हें तें ब्रह्म, असा निषेधरूपानें तिनें चौदेहापलीकडील परब्रह्माचें वर्णन केले. याचें तात्पर्य, हेंच कीं, अमूक अमक्यापेक्षा मोठा असें जेव्हां म्हणण्यांत येते त्याचा अर्थ तो सर्वश्रेष्ठ असा होत नाही. सुईचे सापेक्षेनें दाभण मोठें असलें तरी पहाणारेपेक्षां ते मोठें असू शकणार नाहीं. सबब लहान मोठपणा हा वस्तूच्या ठिकाणचा स्वयंसिद्ध गुणधर्म नसून सापेक्ष भावनेंने वस्तूवर आलेला आरोपित धर्म होय. त्याच न्यायानें अन्नब्रह्म, स्थूलब्रह्म, कारणब्रह्म व महाकारणब्रह्म असें क्रमवार एकापेक्षां एक मोठें सांगून, मग यापैकी कोणतेच मोठें ब्रह्म नव्हें असे सांगण्यांत 'एक अवस्था दुसऱ्याचे सापेक्षेनें मोठी असली तरी वास्तविक तें ब्रह्म नसून परब्रह्म कांहीं औरच आहे' असा बोध करण्याचा हेतू आहे.

(iv) वरील निरूपणपद्धति ध्यानात ठेवून ब्रह्म कशास म्हणावें कां म्हणावें, व कोठपर्यंत म्हणावें, व ज्याला एकदां ब्रह्म म्हटले ते ब्रह्म नव्हें असें फिरून त्याच तोंडाने कां सांगितले जावे; हें नीट समजावून घेणें जरूरीचें आहे. भात होण्याकरितां तांदळाचे भोगाण्याखालीं "जाळ लाव" म्हटलें व थोडावेळ गेल्यावर "जाड काड" असेहि सांगितलें. ही उलटसुलट वचनें एकाच

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

माणसानें भात करणाऱ्या नवाशिक्या उमेदवारास सांगितली. त्यावेळी त्यास विस्मय झाला; पण त्याच्या गुरूनें समजावलें कीं 'बाबा, भात होईपर्यंत जाळ लावण्याची जरूरी असली तरी भात झाल्यावर जाळ बंद केलाच पाहिजे. नाहीं तर भात न होतां कोळसा मात्र पदरांत पडेल, त्याप्रमाणें कोणतेंही साधन साध्य हातात येईपर्यंत करण्याची जरूरी असते. त्यापुढें शीण मात्र होऊन प्राप्तीचें नांवाने पूज्य! याच न्यायाने सूक्ष्म शरीर ब्रह्म म्हटले कीं, त्या शरीराचा मोठेपणा कशांत आहे, एवढें समजलें कीं त्याचा ब्रह्मपणाहीं गेला व त्यापुढील वस्तू संशोधन करणें भाग आलें. सबब आपल्या कार्यापुरते एखाद्या वस्तूस दिलेला मोठेपणा हा कायमचा नाही. 'बखत पडें बाका, तो गद्धेकू कहे काका' यांतील गाढवास दिलेला मोठेपणा आल्या प्रसंगामुळें आहें. त्याचप्रमाणें जीवावर स्वरूपविस्मृतीमुळें जीवदशा येऊन बाकी प्रसंगच ओढवला आहे. सबब तो ज्याच्या सपाट्यांत सांपडला त्यास ब्रह्म म्हणूनच त्यांतून सुटका करून घेणें आहे. "ससूरबाई तुझी पाठ मऊ" म्हणून तिची स्तुति करून तिच्या मगरमिठींतून सुटका झाल्याबरोबर "तिची पाठ परक्याच्या गादीप्रमाणें होती की काय?" हें त्या सुटलेल्या गृहस्थास विचारावे. चारी देहाच्या मगरमिठीतून सुटण्याकरितांच त्यास कांही काळ ब्रह्म म्हंटले. ही निरूपणपद्धत लक्षांत ठेवून आपण चौदेहांचें वर्णनाकडे वळूं.

३. २. स्थूल देह यांचें स्वरूप अगदी उघडें आहे. जड अस्थी मांस-रुधिरमय हातास लागणारा असा हा एक गोळा असल्यामुळें तो सर्वांचे परिचयाचा आहे. इतकेच नव्हें तर तो प्रत्येंकाच्या पुर्ण वळणांतला आहे. स्थूल देहच मी व त्यासंबंधेंकरून जडणारे सर्व विकार माझेच आहेत; स्थूल देहाचे काळें-गोरेपण, बाल्य,

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तारुण्य, वार्धक्यादि अवस्था माझ्याच ठिकाणीं आहेत; स्थूल शरीर-संबंधानें जडलेले नाते, गोतें जात, धर्म, पंथ, घर, दार, जमीन-जुमला, हीं सर्व माझीच आहेत; असा पक्का धडा सर्व जीवमात्रास मूर्खपणें अनेक जन्मापासून मिळून घोटला असल्यामुळें स्वप्नांत सुद्धां मी अमुक गोमाजी म्हणून बरोबर सांगतो. सबब इतका दृढ झालेला धडा पुन्हां देऊन कोणाकडूनहीं घोटवून घेण्याचें कारण नाहीं. सर्व जीवांचें पाय व स्थूलदेहाच्या पायरीवर पक्के रोंवले गेले आहेत. या स्थूलदेहाची अवस्था जागृति असून या देहांत थोडा आठव व थोडा विसर, असा मिश्रगुण असल्यामुळें देह रजोगुणात्मक आहे; इतके स्पष्टीकरण स्थूलदेह समजण्यास पुरेसे आहे, आतां पुढील सूक्ष्मदेहाचे पायरीकडे आपला पाय उचलूं-

३. ३. सूक्ष्मशरीर म्हणजे स्थूल डोळें मिटल्यावरोबर स्थूल जगत् दिसेनासें होऊन विश्वामित्री प्रति मानससृष्टी निर्माण करणारी इंद्रियें, मन-बुद्धी, प्राण व अंतःकरण यांची कमिटी होय. थोडयाशा विचारांती सूक्ष्मशरीर म्हणून कांहीं निराळेंच कंत्राट आहे हें लक्षांत येतें. स्थूल देहाची सर्व हालचाल या सूक्ष्म देहांच्या आज्ञानेंच चाललेली असतें. सूक्ष्म शरीराशिवाय स्थूल शरीराला चेतनाच नाहीं. संकल्प म्हणजे अमूक आहे व विकल्प म्हणजे अमूक नव्हे, अशा उलट-सुलट विचारांचे संकल्पविकल्पात्मक व स्वरूपाविषयीचें विपरीत ज्ञान करून देणारें हे शरीर असून याची स्वप्न हीं अवस्था आहे. अखंड आठव हें या शरीरांतील लक्षण असल्यामुळें तें सत्वगुणप्रधान आहे. येणेंप्रमाणें सूक्ष्म शरीराची ओळख झाल्यावर साधकानें तेंच बनून राहावयाचें. एक पाय पुढील पायरीवर स्थिर झाल्यावर मागील पायरीवरील दुसरा पाय उचलून तोहि पहिल्या पायाबरोबर पुढील पायरीवर ठेवून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मागील पायरीचा अजिबात संबध सोडावा लागतो. एका गांवची शीमा ओलांडून दुसऱ्या गांवच्या हद्दीत पाय ठेवल्याबरोबर मागला गांव सुटतो व पुढल्या गांवचा प्रवाशी बनतो. त्याचप्रमाणें सूक्ष्म शरीराची वरील पायरी कळल्यास त्यावर साधकानें एक पाय पक्का रोवला कीं, तें पूर्णपणें वळण्याकरितां दुसराही पाय मागील स्थूल शरीराचें पायरीवरून उचलावा लागेल म्हणजे त्या शरीराचा संबंध तोडावा लागतो, परंतु हें काम दिसतें तितकें सोपें नाहीं. या सर्व पायऱ्या ओलांडण्यास प्रत्येक जीवास दोन पाय आहेत. कळून येण्याचा एक व कळून घेतलेलें वळण्याचा दुसरा पाय स्थूलशरीरावरील दोन्ही पाय काढून सूक्ष्म शरीरावर ठेवून तेंच होऊन राहणें म्हणजे स्थूल शरीर ओलांडणें होय. स्थूल शरीराचा अभिमान सोडून सूक्ष्म शरीरच मी असा अधिमान धारण करणें म्हणजेच स्थूल शरिराचा त्याग व सूक्ष्म शरीराचें ग्रहण झाले किंवा स्थूल शरीराची पायरी टाकून सूक्ष्म शरीराचें पायरीवर आलो असें समजावें. या दुसऱ्या पायरीवर साधक आला म्हणजें खालची पायरी स्थूल शरीर मी नव्हे, त्याचा माझा आतां संबंध तुटला, स्थूल शरीराचें काळेगोरेपण, त्यासंबंधेंकरून जडणारे कोणतेहि विकार माझें नाहींत, स्थूलाचे कोणतेही धर्म माझ्या ठिकाणीं नाहींत, मी तर सूक्ष्म शरीर आहे असा अभ्यास सुरू होतो. सूक्ष्म शरीरांतील मुख्य सूत्रधार जें मन, बुद्धि, इंद्रयें आहेत ते लठ्ठ, बारीक, काळे, गोरे, नकटे, चपटे या स्थूल देहधर्मानीं युक्त आहेत काय? नाहीं. मी तर मन, बुद्धी आहे असा अभ्यास साधकाने कसून केला तर त्याचे दोन्ही पाय सूक्ष्म शरीराचे पायरीवर पक्के रोवले जाऊन स्थूलाचा अभिमान सुटतो व स्थूलासंबंधी असलेल्या सर्व उपाधींतून साधक उदाशीन होतो

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

३. ४. यापुढील तिसरी पायरी म्हणजे कारणशरीर किंवा अज्ञान होय. जेथें स्थूल, सूक्ष्म शरीराचें भले नाहीं किंवा महाकारणाचेही ज्ञान नाहीं अशी केवळ तमोगुणात्म विसर अवस्था! जेथें कशाचेंही ज्ञान नाहीं, अशी झोंपेसारखी (झोंप मात्र नव्हे) अवस्था तो कारणदेह होय. ही अवस्था नीट समजणें अतिशय जरूरीचें आहे. शून्यवादी याच अवस्थेपर्यंत येऊन पुढे कांहीं नाहीं म्हणून मागे परतले. मोंठमोठ्या युरोपियन तत्त्ववेत्त्यांचा अज्ञेयवादाचे हेंच तें ठिकाण! सर्व संकल्पविकल्प-शून्य अशी ही अवस्था असल्यामुळें निर्विकल्प परब्रह्म तें हेंच, हीच ती समाधी अशी समजूत या अवस्थेंत होते व ही शून्यावस्था आल्यावरोबर "आजि मी ब्रह्म पाहिलें" म्हणून खोटेंच समाधान होत असते. एक वृत्ति मावळली व दुसरी उठली नाहीं, त्या दरम्यान असलेली संधी, किंवा निद्रा येण्याचे आधीं व जागृतीचे अंती असलेली संधी, ही केवळ विसर अवस्था आहे. ही विसर अवस्था म्हणजे शास्त्रांत सांगितलेल्या आनंदमय कोश होय. स्थूल, सूक्ष्म शरीरांतील सर्व गडबड, धांदल विचाराच्या अनंत उर्मी या कारणशरीरांत थांबल्या असल्यामुळें, वरील दोन शरीरांतील गडबडीच्या अपेक्षेनें या तिसऱ्या शरीरांत शांती आहे व त्या मानाने साधकांस येथें विश्रांती मिळत असल्यामुळें सुखही होतें, हेही खरें; पण ही पराशांति नाहीं किंवा खरी सुखरूपताही नव्हें. हें पक्के लक्षांत ठेवलें पाहिजे. देवदानवाची, सर्व जीवमात्रांची असलेलीं स्वाभाविक अवस्था म्हणजेच हें विसररूपीं कारणशरीर होय. सर्वांचा विसर पडणें हेच या शरीराचें मुख्य लक्षण आहे. विसरल्याशिवाय गाढ झोंप सुद्धां येत नाहीं. "मी निजलो होतों पण कांहीतरी आठवत होतें" असें म्हणणे म्हणजे मी निजलोंच

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नव्हतो असें म्हणण्यासारखें आहे. म्हणून झोंपेंत गाढ निजणें म्हणजे कांहीं न आठवणें. त्याचप्रमाणें जागेपणी गाढ झोपी जाणें म्हणजे जीवाची जी स्वाभाविक अवस्था कारणदेह त्यांत प्रवेश करणें होय; किंवा कशाचेहि ज्ञान न होणें, असल्या विसर अवस्थेंत येणें होय. शिवस्वरूप तर राहोच; पण जीवस्वरूप तरी काय आहे याचीही ओळख मोठमोठ्या शास्त्रज्ञाना झालेली नसते. ती ओळख पटविण्याकरितांच प्रत्येक विचाराच्या संधींत असलेली ही जीवाची विसर अवस्था समजावण्याकरितांच संधी–अभ्यासाची सोय केली आहे. संधी–अभ्यासानें जीवस्वरूपाची पक्की ओळख झाल्यावर शिवस्वरूप समजणें फारसें कठीण नाही. जर कांहीं कठीण असेल तर विसर अवस्था पूर्ण पचनी पाडणें, ती नीट समजणें हीच गोष्ट दुर्गम आहे. ती प्रयत्नेकरून साधकाने साधावी असा आग्रह आहे.

(ii) खरें पाहुं जाता कोणत्याहि द्वंद्वांत असलेल्या संधींत शुद्ध जाणिवेशिवाय दुसरें कांही नाहीं. कोणताहि शब्द न उठूं देतां किंवा शब्द उठला असतांहि त्या शब्दाचा बोध चित्तावर उमटूं न दिला की, **'जो शब्द सांडूनि बैसला। तोचि मौनि म्हणावा भला॥'** शब्द उठून त्याचा चित्तावर बोध होणें म्हणजेंच जगाची उत्पत्ती होणें व शब्द सांडणें किंवा शब्दार्थाचा बोध न होऊं देणें म्हणजेच जगाचें उच्चाटण होणें होय. चित्तांत जग स्फुरलें नाहीं म्हणजे बाकीं शुद्ध स्फुरद्रूप अशी जाणीवच शिल्लक राहते. त्याचाच अनुभव घेत राहणें हीच ती मौन अवस्था होय. पण असें जरी असले तरी पहिल्या दुसऱ्या पायरीवरून तिसऱ्या पायरीवर पाय टाकणाऱ्या साधकास हीच अवस्था शुद्ध ज्ञानरूप आहे असे एकदम सांगितल्यास, शून्य बोधरूपानें या अवस्थेचा ठसा साधकाचे चित्तावर उमटून, शून्यालाच ब्रह्म समजुन, त्यास शून्यालक्षित्व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करतां येईनासे होते. तिसऱ्या पायरीवरून चौथ्या पायरीवर साधक गेला व तेथून तिसऱ्या पायरीकडे पाहूं लागला तर मात्र तिसरी पायरी त्याला दिसणारच नाही. व नसलेल्याच पायरीवर अधांत्री आपल्यास सद्गुरूनें कसें पाय ठेवावयास लावलें याचें त्याला आश्चर्य वाटतें. कारण चौथ्या देहांतील शुद्ध ज्ञानाची एकवार ओळख पटल्यावर अज्ञान म्हणून कांहीं शिल्लकच राहत नाहीं, विसर-अवस्था म्हणजे काय हेच समजेनासें होते; साधकांचे ठिकाणीं ज्ञानस्फूर्तीशिवाय कसलीही अन्य-स्फूर्ति उठत नाहीं. त्याचे ठिकाणीं अहोरात्र ज्ञान दोन तऱ्हेनें प्रतीत होत राहील. ज्यावेळी ज्ञानामध्यें विषय येईल त्यावेळीं तें ज्ञान 'सविषय ज्ञान' या रूपानें अनुभवास येईल व ज्ञानास ज्यावेळीं कोणताही विषय नसेल त्यावेळीं 'शुद्ध ज्ञान' रूपानें अनुभव देत राहील. विषय असेल यावेळीं सविषय व विषय नसेल त्यावेळीं निर्विषय ज्ञान किंवा शुद्ध ज्ञान या दोहोंखेरीज तिसरे कांहींच स्फुरणार नाहीं. अज्ञान, हा शब्द या साधकाचे दृष्टीनें निरर्थक ठरतो. अज्ञान किंवा विसर अवस्था असणेच शक्य नाहीं, जें कांही आहे ते सर्व अज्ञान ते कधीं सविषय तर कधीं निर्विषय असूं शकेल, एवढेच. पण हेंच कळण्याकरितां आधीं अज्ञान आहे, शून्य आहे विसर अवस्था आहे. कांही नाहीं अशी एक चीज आहे अशी काल्पनिक तिसऱ्या कारण देहाची पायरी मांडून त्या पायरीचा अभ्यास साधकास करावयास लावणें अगत्याचें आहें बिंदूला लांबी रुंदी नाहीं, हें समजावून सांगण्याकरितां शाळामास्तर फळचावर खडूनें एक भला मोठां लांबीरुंदीचा बिंदू काढून दाखवितो, तशांतलाच हा प्रकार आहे पण असें केल्याशिवाय पुढील पायरी समजावतांच येत नाहीं त्यास काय इलाज? म्हणून साधकानें सद्गुरु वचनावर विश्वास ठेवून

Sri Vidyabharathi Book Centre, Srinagar

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तर्क कुतर्क न लढवितां, विसर अवस्था आहे असे धरूनच त्याचा अभ्यास करावा व सर्व कांहीं विसरण्यास शिकावे; कारण शरीर हें मागील दोन शरीराचे कारण आहे.

(iii) स्टेजवर ज्यांतून सर्व पात्रें येतात व फिरून ज्यांत गडप होतात त्या नाटकी पडद्याप्रमाणें जीवाची स्वभाविक अवस्था म्हणजे हा विसररूपी पडदा होय. या पडद्यांतून सर्व आठवणी येतात व त्यांतच फिरून जिरतात. एखादी गोष्ट मला आठवली असे जेव्हां आपण म्हणतो तेव्हां ती गोष्ट आठवणीपूर्वी विसरलो होतो म्हणजेच विसरावस्थेच्या पोटीं होती, तींतून बाहेर आलीं हें सिद्ध होतें व त्याचे उलट एखादी गोष्ट मी विसरलो असें जेव्हां आपण म्हणतो त्यावेळीं आठवलेली गोष्ट विसराच्या पडद्यांत गडप झाली असाच अर्थ होतो. विसरापूर्वील आठवण व आठवणीं नंतरचा विसर, हे एकाच विसररूप अंथरुणावरील सहकारीं मित्र होत. सर्व कल्पनांचे उदय व अस्त या एका विसराचेंच पोटी असल्यामुळें विसरावस्था हें सर्व जीवांचे सामान्य अंथरूण अतएव विसर आहे म्हणूनच जीवामात्र मी अज्ञानी आहे असें म्हणतो व कसले तरी ज्ञान व्हावें म्हणून खटपट करतो. त्या खटपटींत लौकीक ज्ञान मिळवून स्वरूपज्ञानास पारखे होणारे हतभागीच फार! असो. येणेंप्रमाणें कारणशरीराची ओळख करून देऊन सद्गुरु शिष्यास सांगतात– "बाबारे तू स्थूल नव्हेस. सूक्ष्म नव्हेस, तूं कारण शरीरच ब्रह्म आहेस, सबब तूं कारणशरीरच होऊन रहा" साधकानें विसररूपच होऊन राहणें म्हणजे असें– स्थूल शरीर तर मी नव्हेच नव्हे, पण सूक्ष्म शशीर व त्या संबंधे-करून उठणारे मनाचे कोणतेही संकल्प–विकल्प माझ्या ठिकाणी नाहींत, मी तर निर्विकल्प विसर आहे. देहाचे जन्म-मरण व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मनाचें शोक, मोह, सुख, दुःख प्राणाचे क्षुधा, तृषादि धर्म, मला स्पर्श करू शकत नाहींत मानपमान मनाचें ठिकाणीं आहेत. काळे-गोरेपण स्थूल शरीराचे ठिकाणी आहे, मी निर्लेप आहे. मला कशाचाच संग नाहीं, मी केवळ विसर आहे असा वरचेवर दृढ संकल्प करून अभ्यास केला असतां, सर्व भावविहीन स्थूल सूक्ष्म देहधर्मरहित विसर अवस्था पदरांत पडते. अशा तऱ्हेचा दृढ अभ्यास झाला म्हणजे साधक कारण शरीररूपी तिसऱ्या पायरीवर पक्का आरूढ झाला व पुढच्या महाकारण शरीराच्या चौथ्या पायरीवर पाय ठेवण्यास लायख झाला, म्हणतां येईल.

(iv) चौथ्या पायरीकडे जाण्यापूर्वी येथें एक गोष्ट सांगणें जरूर आहे कीं, वर एके ठिकाणीं 'कारण शरीर म्हणजे झोंपे-सारखी पण झोंप नव्हें अशी अवस्था आहे' असें सांगितल्याचा थोडा अधिक खुलासा होणें जरूर आहे--गाढ झोंपेंतही सर्व इंद्रियांचा उपशमन आहे; इद्रियांचा अभाव असल्यामुळें विषयही तेथें नसतात. अशा अवस्थेंत जीव मात्र स्वरूपाचाच आनंद गाढ झोंपेंत अनुभवीत असतात, पण स्वरूपास ओळखत नाहींत. गाढ झोंपेंतून उठल्यावर "मी सुखानें निजलो होतो व मला कांहीं कळलें नाहीं" या दोन वाक्यानें प्रत्येक जीव आपला अनुभव सांगत असतो. अशा रीतीनें तो आपल्या स्वरूपाची सुखरूपता व स्वरूपावद्दलचे अज्ञानही सांगतो, याच्यानें अज्ञानाचेंही ज्ञान आपल्यास झाले असे नकळत आपली ज्ञप्तिमात्रता सिद्ध करीत असला तरी, स्वरूपाचा अनुभव घेत असूनही त्याची जानपछान या गाढ झोंपेंत होत नसल्यामुळें, ते स्वरूपास पाहून न पाहणेंच होय. बापानें पुरून ठेवलेल्या मोहोरेच्या हंडयावर दररोज झोंपीं जाणारा मुलगा, या द्रव्यनिधीच्या ज्ञानाचे अभावी, सकाळीं उठून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निर्वाहकरितां झोळी घेऊन फिरतो. त्यास तें द्रव्य असून नसल्या-सारखेंच आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक जीव रोजच्या रोज आपल्या स्वरूपांतून येत जात असतांही, गाढ झोंपेंत त्यांतच बुडी मारून आनंदभोग घेत असतांही, स्वरूपावद्दलचे त्यांचे गाढ अज्ञान कायमच असतें; म्हणून गाढ झोंप हें स्वरूपप्राप्तिचे साधन नव्हे. साधकास गाढ झोंपेंत अभ्यासास कांहींही वाव नसतो, ही गोष्ट विसर अवस्थेचा अभ्यास करतेवेळीं मात्र नसते. विसर अवस्थेचा अभ्यास करणें म्हणजें झोपीं न जातां जागे राहून गाढ निजणें होय. जागती झोंप कशी घ्यावी याचें ज्ञान सद्गुरु करून देतात **'जळामध्यें मासा झोंप घेतो कैसा । जावें त्याचे वंशा तेव्हां कळे ।।** पाण्यांत मासा झोंप घेत असतां त्याचे डोळ्यांत पाणीं शिरून त्याची झोंपमोड कशी होत नाहीं, हें वर्म माशाचे पोटी जन्म घेतल्याशिवाय समजत नाहीं. तद्वत झोंप तर गाढ घ्यावयाचीं पण जागा राहावयाचें हें कसें साधतां येईल? तें गुरुपुत्र होऊनच समजून घ्यावें. कारण शरीर म्हणजे विसर अवस्था ही गाढ झोंपच आहे, पण ही अभ्यासांतली जाणून बुजून अंतःकरणांत जागेपणीं निर्माण केलेली सामसूम आहें; न कळता आलेली ही झोंप नव्हें. न कळता आलेल्या गाढ झोंपेत कांहीं कळत नाहीं पण "कळून आलेल्या या विसररूपी जागत्या झोंपेनें स्वरूपज्ञान होतें;" हाच तो गाढ झोंप व समाधी यामधील फरक होय. विसर अवस्था ही शुद्ध विसररूप असून त्यांत कशाचेंही ज्ञान नसतें, हें जरी खरें असलें तरी सर्व विसरल्यावर केवळ ज्ञानच शिल्लक राहतें. हें विसर अवस्थेच्या अभ्यासानेंच कळते, हें शंभर पटीनें तितकेच खरें आहे. गाढ झोंप व विसर अवस्था दोन्हीहि तमोगुणाचीच कार्यें आहेत. पण फलाचे दृष्टीनें या दोघांत जमीन–आस्मानाचें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अंतर आहे. कोळसा आणि हिरा या दोन्हीचे पृथःकरण केल्यास दोन्हींतहि कार्बन या द्रव्याशिवाय कांहीं सांपडत नाहीं, म्हणजे कार्बनचेच कोळसा व हिरा हीं रूपें होत, हें जरी खरें असलें तरी दोहोंच्या किमतीत काय फरक आहें हें सांगण्याची जरूरी नाही. कार्बन हें दोघांचेंहि एकच घटक असून कोळसा काळा निस्तेज कां? व हिरा चमकणारा तेजस्वी कां? याचे कारण कार्बनचें दोहोंतील मिश्रणाचे भिन्नभिन्न प्रमाण हेंच होय. त्याचप्रमाणें गाढ झोंप व विसर अवस्था यांतील अज्ञानाचें प्रमाण भिन्नभिन्न असल्यामुळें गाढ झोंपेंत अज्ञानाचा घनदाटपणा व विसर अवस्थेंत विरळपणा प्रतीत होतो. ज्या मानानें झोंपेचा गडदपणा कमीं त्या मानानें जागृति येत असतें. गाढ झोंपेंतून उठून बसलेला मनुष्य थोडा झोपेंच्या गुंगीत तर थोडा जागा असतो हा झोपेच्या विरळपणाचाच परिणाम व खडखडीत जागेपण म्हणजे झोंपेचा अस्तच होय. आत्मदीपाच्या आड काळाकुट्ट जाड पडदा म्हणजे दिव्याचें दर्शनही न होऊं देणारी गाढ झोंप व या आत्मज्योतीच्या आड असलेला झिरझिरींत पातळ विरळ मखमलीचा पडदा म्हणजेच साधकाचें अभ्यासांतील विसर अवस्था उर्फ कारण शरीर. स्वरूपाचा आनंदभोग दोन्हीं अवस्थेंत जरी सम असला तरी स्वरूप फलप्राप्तीच्या दृष्टीनें गाढ झोंप म्हणजे वंध्यामैथुन असून, विसर अवस्थारूपी आनंदमय कोशाचा अभ्यास आनंददायक स्वरूप-फलोन्मुख आहे, इतकें सांगून आतां आपण विसरअवस्थेनंतर येणाऱ्या ज्ञानलाभानें युक्त अशा महाकारण देहाचें अवलोकन करूं!

(४) पण जरा थांबा, श्री स, भाऊसाहेब महाराजांचें सांप्रदायिक नामधारकांचे मनांत आणखी एक शंका येथें येण्याचा संभव आहे व ती अशी कीं, कारण शरीराचा अभ्यास म्हणजे सर्व कांहीं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विसरावयास शिकणें व असें जर आहे तर मग गुरूनी दिलेला मंत्रोच्चार व अर्धोन्मिलीत नेत्रापुढें उभे राहणारे रंगरूपही विसरावयाचे कीं काय? याचें उत्तर "होय, तसेंच करावयाचे;" पण तसें करण्यापूर्वी मंत्रोच्चार व कोणतेही रंगरूप एवढेंच नेमाचेवेळी शिल्लक राहून बाकीची गडबड, मानसिक बडबड शांत झाली की नाहीं हें नामधारकाने तपासून पहावें. गुरूनें दिलेले नाम व अर्धे डोळे झांकून नाशिकाग्राचे ठिकाणीं दृष्टि लावल्यावर दिसणारे रंगरूप याशिवाय कोणताही दुसरा शब्द आकार नामधारकाचे मनांत स्फुरता अगर उठता कामा नयें. असें झाले म्हणजे हेंही विसरण्यास पाहिजे हें खरें आहें. घरातील सर्व केरकचरा झाडून साफ करण्याकरितां हातात घेतलेली केरसुणी घरांतील प्रत्येक काना-कोपऱ्यांतील केर झाडून साफ केल्यावर हातात ठेवावयाची नसते. तीही एका कोपऱ्यांत फेकून देऊन मोकळे व्हावयाचे असते. हाच न्याय नामधारकानें गुरूने दिलेल्या नेमाबद्दल समजावा. आपल्या देह-मनरूपीं घरांत अनंत जन्मीचा सांचलेला संकल्प विकल्पात्मक केरकचरा झाडून साफ करण्याकरीतांच आपल्या हाती सद्गुरूनीं नामरूपाचें साधन दिले आहे. हें हृदयांत कोठपर्यंत बाळगावें व केव्हां सोडून द्यावे, हें वर सांगितलेच आहे. असो.

३. ५. आतां महाकारण शरीर म्हणजें काय तें पाहू. महाकारण देह हा मागील सर्व देहाचा जनक आहे. जनकराजा विदेह होता. त्यास जानकी नांवाची कन्या होती, अशी जी पुराणांतली कथा आहे, त्यांतील जनकराजा म्हणजे हा महाकारण देहच होय. देह असून विदेही अशी जर कोणती अवस्था असेल तर महाकारणांतील ज्ञानावस्था होय. या महाकारण जनकराजाचे पोटींच जानकी (जाणकी-जाणणारी ज्ञान कला) निर्माण झाली असून तिला वैदेहि

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असेंही दुसरें नांव आहे. मागील तीन देहाचें सापेक्षेनें या ज्ञानावस्थेस जरी महाकारण देह असें नांव ओळखीसाठीं आले. तरी हा देह उपाधिरूप नसल्यामुळें विदेहच आहे. महाकारण देह ज्ञानरूप आहे. याचा अर्थ असे मात्र समजू नये कीं, मागील तीन देहांत ज्ञानाचा अभाव आहे. ज्ञान हें समीसम व विषमी समच आहे, समावस्थेंत ज्ञान जितके चोख निर्भेळ आहे तितकेंच विषम अवस्थेंत विषयाच्या कर्दमातहि तें निर्लेप समच असतें. सर्व अवस्थेंत ज्ञान एकरूपानें सारखेंच असतें; पण महाकारणाशिवाय इतर तीन शरीरांतील विषम अवस्थेंतील ज्ञान हें मिश्रज्ञान किंवा पदार्थज्ञान या रूपानें प्रतीत होतें व महाकारणांत सम अवस्था असल्यामुळें शुद्ध ज्ञान-रूपानें ज्ञानाचा अनुभव येतो. सम-विषमभाव अवस्थेंत असले तरी ज्ञान हें सर्वकाल समच आहे; पण अवस्थाभेदामुळें किंवा उपाधीं सान्निध्यानें अनुभवी जीवास ज्ञानांतही सम-विषमतेचा भास होतो. लाडू, जिलेबी, बासुंदी वगैरे गोड पक्वान्नांतील गोडी म्हणजे साखरच आहे, त्याशिवाय पदार्थास गोडीच येणार नाही. गोडी वास्तविक साखरेचीं असून साखर गोड न म्हणतां लाडू वगैरेंतील इतर पदार्थरूपी उपाधीच्या सान्निध्यांत साखर असल्या-मुळें लाडू गोड, जिलेबी गोड, बासुंदी गोड असा आपण शब्द-प्रयोग करतो. लाडू, जिलबींतील पदार्थांत न मिसळता साखर जर निराळी ठेवला; तर साखरच गोड म्हणावे लागेल. ज्यानें कधी साखर खाल्ली नाहीं अशा माणसास साखरेची कल्पना आणून देणें असल्यास, लाडू, जिलबी खावयास देऊन त्यांतील गोडी म्हणजेच साखर असें सांगूनही त्यास साखरेच्या शुद्ध स्वरूपाचा बोध कधीच होणार नाहीं; परंतु कोणत्याहि पदार्थांत न मिसळलेली शुद्ध साखर दाखवून मग ती खाण्यास दिली तर मात्र साखरेची पक्की

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ओळख होईल. तद्वत सर्व अवस्थेंत उपाधीमुळें ज्ञान हें ज्ञानरूपाने ओळखतां येत नाही. किंवहूना पदार्थज्ञानच डोळ्यापुढें उभं राहणार; पण महाकारण देहांत मात्र इतर तीन देहांत स्पष्टपणें प्रतीत न होणारे ज्ञान ठळठळीत आपल्या शुद्ध स्वरूपानें उदीत होतें म्हणून तर साधकांस या महाकारण देहांत न्यावयाचे आहें व एकवार या महाकारणांतील शुद्ध ज्ञान कळल्यावर मग तें कशांतहि मिश्र झालेलें असो, कशाहि अवस्थेंत असो, त्यास मग बरोबर ओळखतां येईल; व ज्ञानाशिवाय जग म्हणून कांहीं निराळा पदार्थ आहे हें त्यास स्फुरणारच नाहीं.

(ii) कोणतीही अवस्था जात येत राहिली तरी त्या अवस्थेचा साक्षी मात्र 'कुठे आया नहीं कुठे गया नही' स्थूलशरीरांतील काळेगोरेपणा, बाल्य–तारुण्य–वार्धक्य ज्यानें पाहिलें त्यानेच सूक्ष्म शरीरांतींल संकल्प–विकल्पाची खानेसुमारी केली व त्याच साक्षी-दारानें सर्व संकल्प-विकल्पाचा अभाव म्हणजे विसर अवस्थारूपी कारण शरीरही पाहिले. तरी सर्व शरीरास पाहणारा हा महा-कारणदेह सदा जागा आहे. एका बाईची अशी खोड होती कीं, तिला जन्मलेल्या कोणत्याही मुलानें आईची ओळख होण्यापूर्वीच व दुसऱ्या भावंडाचे तोंड पाहण्यापुर्वीच मरावें. अशा रीतीनें त्या बाईस खंडीभर पोरें झाली व मेलीं! बाई मात्र सर्व पोरांस मातींत घालून शिल्लक राहिली. एका पोरानें दुसऱ्या पोराचें तोंड पाहिले नाहीं तरी या बाईनें मात्र सर्व पोरांचें तोंड पाहिले होतें, सर्वांची खानेसुमारीं इच्यापाशी तयार होती. त्याचप्रमाणें महाकारणरूपी महामायेच्या पोटीं जन्मलेल्या तीन शरीरास साक्षित्व जरी तिला करतां आले तरी, तीन शरीरास मात्र परस्पराचें अगर आपल्या जननीचें मुखावलोन करतां आले नाहीं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

एका अवस्थेचा दुसऱ्या अवस्थेंत व्यभिचार असला तरी सर्व अवस्थेंत ज्ञान मात्र अव्यभिचारपणें सारखे आहे. एका मण्यांत दुसरा मणी जरी नसला तरी ज्या सूत्रांत हें मणी वोवले आहेत. त्या सर्व मण्यांना आधारभूत असा दोरा मात्र सर्वांना सारखाच व्यापून राहतो. त्याचप्रमाणें सर्व अवस्थेंत व्यापून असणारा हा महाकारण देह होय. महाकारणांतील ज्ञानावस्था अज्ञानाचा विसर पाडून स्वतः आपल्याच प्रकाशाने उघडी पडणारी स्वयंज्योती होय.

(iii) साक्षी–ज्ञानाचें शुद्ध स्वरूप कळलें म्हणजे अज्ञान अवस्था जाते; पण त्याबरोबर सर्व दृश्यभासही आटोपतात हें मात्र खरें नाहीं. दृश्यभास कायम राहून त्याकडे पाहण्याची साधकांची दृष्टी बदलेल एवढेंच. अभ्यासाचे बलावर सर्व दृश्यभास ज्ञानरूपच आहे असा अनुभव येईल. दागिन्यांतील सुवर्णाचें ज्ञान झाल्यावरोवर दागिन्यांचा नाश संभवत नाहीं, त्याचप्रमाणें जगांतील जनार्दन कळला म्हणजे जग मिटत नाहीं. दिव्याच्या प्रकाशानें अंधार नाहींसा झाला तरी अंधारांतील उघडे पडलेले पदार्थ नाहींसे होत नाहींत. प्रकाशाचे अभावामुळें ज्या पदार्थांचे स्वरूप अंधारांत कांहींतरी आहे यापलीकडे कांहीं कळत नव्हतें, ते प्रकाशामुळें अंधाराचा नाश झाल्यावर स्पष्टपणें कळतें. त्या पदार्थांचे खरें स्वरूप प्रकाशांत ठळकपणें कळून येतें, त्याचप्रमाणें अज्ञानांधःकारांत आपण आंधळ्या डोळ्यानें या जगाकडे चांचपडत पाहात असतां सद्‌गुरु बोधानें डोळसपणा येऊन अंतःकरणांत ज्ञानज्योती पेटली व त्याचा प्रकाश फांकला म्हणजे अज्ञान अंधःकराचा नाश होऊन हें जग आहे तसेच राहून त्याचें स्वरूप मात्र उघडकीस येतें. व ज्ञानपूर्वीच्या दृष्टीनें जगाकडें पाहत होतो तीं दृष्टी मात्र ज्ञानोत्तर-कालीं बदलतें. मृगजलाकडे पाहण्याची सूर्यदृष्टी वेगळी, मानवदृष्टि

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वेगळी व मृगदृष्टी वेगळी, पदार्थ एकच पण दृष्टि वेगळी; सूर्यकिरणाने खडक तापून त्यावर वाफेच्या ज्या लाटा उठतात तें लांबून पाहाणाऱ्यास जणूं काय पाण्याचा वाहणारा ओघच आहे कीं काय असा भास होतो. या भासास मृगजल म्हणतात. मृगजल म्हणण्याचें कारण असें कीं, या भासाकडे पाहून हरिण त्यास खरोखरीचें पाणी समजून आपली तृषा भागविण्यास त्या जलभासाकडे धांव घेतो व फसतो. जलभास सत्य मानणें ही मृगदृष्टि होय; पण जलासारखा दिसत असतांही मनुष्यास तहान लागली असतां तो आपली तहान भागविण्यास हरिणाप्रमाणें त्याकडे धांव घेत नाहीं. याचें कारण ते जसें दिसतें तसें नाहीं, तो केवळ पाण्याचा देखावा आहें, पाण्याचा एक थेंबहि तेथें नाहीं. हें मनुष्यास कळतें म्हणून जलदेखावा दिसत असूनही तो फसत नाही, ही मानवदृष्टी होय. आतां मार्तंडदृष्टीस मृगजल म्हणून कांहीं पदार्थ दिसतच नाहीं, मग भासाची गोष्टच कशाला? याचप्रमाणें बद्ध, साधक व सिद्ध यांचीही जगाकडें पाहण्याची वेगवेगळी दृष्टि असते. बद्ध हा जग सत्य मानून आपल्या व्यवहाराचा गाडा हांकीत असतो. साधक आत्मज्ञानसंपन्न होऊन जगाकडे मिथ्यादृष्टिनें पाहतो. व सिद्ध पुरुष म्हणजे स्वयंसिद्ध जो आत्माच बनला, त्याला जगच दिसत नाही. स्थूल शरीरापासून महाकारण शरीरापर्यंतचा सर्व वाद पूर्वपक्ष होय; व महाकारणानंतरचा सिद्धांतपक्ष होय. सबब महाकारणांत साधकानें प्रवेश करून आत्मज्ञान संपादन केलें तरी तो पूर्वपक्षांतच मोडतों, तो साधकच ठरतो. त्यास सिद्ध पुरुष म्हणतां येत नाहीं महाकारणापलीकडे असलेला विज्ञानाचा प्रांत हा सिद्धांचा विसावा होय; पण जाऊं द्या, आतांच त्याची वाटाघाट कशाला? आपल्या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पायाखाली तूर्त महाकारणाची पायरी आहे. त्याबद्दलच थोडी अधिक चर्चा करू.

(iv) महाकारणशरीर हें अज्ञान अवस्थेंचें नाशक आहे असे म्हटलें. पण अज्ञान अगर विसर अवस्था हीं स्थूल, सूक्ष्म शरीर अवस्थेच्या सापेक्षेनें आलेली अवस्था होय. तिला खरोखरीचें अस्तित्व नाहीं व ही नसलेलीच अवस्था ज्ञानानें घालवावयाचीं आहे. नाहींपण घालवावयाचें म्हणजे अजबच आहे! 'रामा जवळ आंगठी आहे, गोविंदाजवळ आंगठी नाहीं' या वाक्यांत आंगठी आहेच्या सापेक्षेनें आंगठी नाहीं हा शब्दप्रयोग उत्पन्न झाला. वास्तविक आंगठीचें नाहींपण हें कसल्यातरी वस्तूचीं आस्तित्व दर्शक अवस्था आहे काय? मूळींच नाहीं. त्याचप्रमाणें विसरही नसलेलीच अवस्था स्थूल सुक्ष्माचे सापेक्षेंने कांहीं तरी नाहीं-पणानें आलेली कल्पिलेली अवस्था आहे; पण ती नाहींच नाहीं म्हणून समर्थानीं "नाहीं नाहींपणें निमाले" असें या विसररूपी अज्ञान अवस्थेचे नाहींपण ज्ञानावस्थेंत सिद्ध केलें.

(v) आतां ज्ञानावस्था ही तरी आहेपणानें आहे काय? विसर अवस्थेंतील सर्व संकल्प-विकल्पाचा अभाव ज्याला पाहता आला किंवा ज्यानें जाणले तो वृत्तीचे लयसाक्षित्व करणारा ज्ञानदेव म्हणजे महाकारण देहांतील अध्यक्ष होय; पण वास्तविक महा-कारणांतील साक्षीज्ञान कारण अवस्थेंतील अज्ञानाचे सापेक्षेनेंच शुद्ध स्वरूपावर उठलेले वांडगूळ होय. ज्ञानाने साक्षित्व करण्याचें सोडून दिल्यावरोबर म्हणजे विसर अवस्थेस विसरल्यावरोबर तो आपले आपल्यासच पाहुं लागतो. स्वतःचे स्वतःच निरीक्षण करणें यास साक्षित्व म्हणतां येत नाहीं. स्वतःस विसरून आपल्याहून भिन्न अशा दुसऱ्याकडे ज्यावेळी पाहतो, त्यावेळी त्यास साक्षी

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

म्हणावे लागते. आपल्यास आपण पाहूं लागला किंवा आहे त्या स्थितींत सहज राहतां येंऊ लागलें म्हणजें तें ज्ञान केवलरूपानें शिल्लक राहतें. पण येथेंही एकटयासच स्वतःचे स्वतः बरोबरच **'अहं ब्रह्मास्मि''** या नादस्फूर्तीनें गुणगुणावेसे वाटल्यामुळें या शुद्ध ज्ञानासही महामायेच्या महाकारणरूप देहाच्या बंधनांत सांपडावें लागले ही गुणगुणच गुणरूपिणी त्रिगुणात्मक महामाया होय. ह्रिच्या तडाक्यांतून सुटावयाचे झाल्याच ही गणगुणही बंद झाली पाहिजे. म्हणजे या महामायेची भुणभुण कायमची सुटते.

(vi) शुद्ध स्वरूपाचे ठिकाणीं अहंब्रह्मास्मि असा अहंकार वास्तविक निरहंकार होय; पण असला सूक्ष्म अहंकारही शुद्ध-स्वरूपांत दुधांत मिठाच्या बारीक खड्याप्रमाणेंच त्याज्य होय. खोटयाचा अभिमान धरणें यास दुरभिमान व सत्याचा अभिमान धारण करणें तो निरभिमान होय. या न्यायानें स्थूल देह तो मी सूक्ष्म देह मी, व कारण देह मी असें जोपर्यंत त्यानें देहाचें ठिकाणी अहंता धरली होती तोपर्यंत तो दुरभिमान होता खास! परंतु महाकारण देहांत या ज्ञानानें अहं ब्रह्मास्मि असा अहंकार धारणकेला तर त्यास निरभिमानच म्हणता येंईल, कारण या देहांतील अभिमान सत्य वस्तूबद्दलचा आहे. ज्ञानानें मी ज्ञान आहे ब्रह्मानें मी ब्रह्म आहे किंवा एखादे ब्राह्मणानें मी ब्राह्मण आहे असें म्हंटल्यास त्यात खोटे कांहीं आहे काय? वास्तविक खोटें असें कांहीच नाहीं; पण खऱ्यानें आपल्या खरेपणाचा डांगोरा पिटीत राहण्यानेंही त्याचें खरेपणाबद्दल संशय येतो! एखादा ब्राह्मण जो भेटेल त्यास "मी ब्राह्मण आहे, बरें कां"! असें जर म्हणत सुटला तर ऐकणारा म्हणेल की, "हा गृहस्थ जर ब्राह्मण आहे" तर "मी ब्राह्मण मी ब्राह्मण" असा जप आल्यागेल्यापुढे करीत राहतो;

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

यांचें कारण काय? हा कोणी कमजात नीच वर्णीय असला पाहिजें. "त्याशिवाय मी ब्राह्मण म्हणून सांगत हिंडण्यांत त्याचा हेतू काय?" असा त्या ब्राह्मणाच्या ब्राह्मणत्वाबद्दल सहज संशय निर्माण होतो. त्याप्रमाणें 'मी ब्रह्म आहे' 'मी ब्रह्म आहे' अशा जपानेंहि या महाकारणांतील ज्ञानास आपले स्वरूपाबद्दल निःसंदेहता प्राप्त झाली नाहीं, असेंच म्हणावें. या दृष्टीनें महाकारण देहांतील अहं ब्रह्मास्मिरूपानें स्वतःबद्दलची होणारी आठवण देखील जिरून आठव–विसररहित अशा अवस्थेंत सहज राहतां आलें पाहिजे; म्हणजे साधक शुद्ध ज्ञानरूप सच्चिदानंद होतो.

(vii) आपला नित्याचा स्थूल अनुभव घेतला तरी आपण आठव-विसररहित अशा सहज अवस्थेंतच राहत असतो. मी मला विसरलो होतो किंवा माझी मी आठवण करीत होतो, असा कोणाचा अनुभव आहे काय? किंवा वरील तऱ्हेचे शब्दप्रयोग करून आपलें अस्तित्व सिद्ध करण्याचा कोणी प्रयत्न केला आहे काय? आपला आपणास कधीं विसरही पडत नाहीं किंवा स्वतःची आठवण करण्याचीहि कधीं जरूरी वाटत नाहीं, असें आठव-विसराचे पलीकडील अवस्थेंत आपण असतो. तेच आपलें शुद्धस्वरूप होय. आठव किंवा विसर हे आपल्याहून निराळ्या वस्तूबद्दलचा असतो. यावरून जेवढें म्हणून आठवेल किंवा जेवढे म्हणून विसरतां येईल ते तूं नव्हेस, ही पक्की खूणगांठ मारून ठेवावी. स्वतःची आठवण किंवा विसर नसून असणें हेंच आपलें स्वयंप्रकाशित्व ते नीट ओळखून ठेवावे. असो, येणेप्रमाणें स्थूल देह तूं नव्हे, सूक्ष्म देह तूं नव्हे, कारण देह तूं नव्हे, महाकारण देहांतील शुद्ध ज्ञानस्वरूप तूं आत्मा आहेस, तेंच तूं बनून रहा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
३.६. (i) वर बोध केल्याप्रमाणें व्यतिरेक पद्धतीनें शुद्धज्ञान निश्चय

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

साधकाचे ठिकाणीं बाणल्यावर अन्वय पद्धतीनें या सर्व चौदेहाचा समन्वय श्रुतीनें केला आहे. तीन देह आतांपर्यंत तूं नव्हे म्हणून सांगितलें; पण सर्व काळी तूच आहेस, सर्व दृश्य-भास-जगत् हा तुझाच ज्ञानविलास आहे, सर्व रूपाने नटलें आहे, असा फिरून उलट खाऊन बोध केला आहे. न्याय असा आहें कीं, ज्यापासून जी वस्तु निर्माण झाली ती तद्वतच असतें. पाण्यापासून बर्फ झालें तरी बर्फ पाणीच आहे. वरवर पहाणाऱ्यास पाणी प्रवाही तर बर्फ कठीण. पाणी निराकार तर बर्फ साकार. येणेप्रमाणें जरी दोहोंत भेद दिसले तरी दोन्ही एकरूपच आहेत. तद्वत जग आणि जगदीश एकच आहेत असा श्रुतिसिद्धांत आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश व आत्मा हे जरी स्थूलदृष्ठीनें. गुणभेदामुळें भिन्न असें भासले तरी बर्फ पाण्यांत ज्याप्रमाणें विरघळून एकरूप होतें, त्याप्रमाणें पृथ्वी पाण्यांत विरते, तेजांत आपाचें शोषण होतें, तेज वायूचे पोटी समावते व वायू आकाशांत पसरून गडप होतो व या सर्व पंचभूतांचें मायपोट आत्मा असल्यामुळें यांत सर्व विलीन होतात. जर हीं तत्त्वें परस्पराहून भिन्न असतीं तर एकमेकांत त्याचा अभिन्नपणें समावेश झालाच नसता; ज्याअर्थी समावेश होतो त्याअर्थी ही पंचभूतें पंचभूतात्मक स्थूल-सूक्ष्म जगत म्हणजे केवळ आत्माच होय. आत्म्याची हीं निरनिराळीं सोंगे होत. भिंतीवर चिताऱ्यानें रंगविलेले वृक्ष, पाषाण, गाई म्हशी, नदी, आकाश, देव, दानव, मानव हें जसे सर्व मिळून एक रंगच आहे त्याप्रमाणें अनंतरूपानें भासणारा हा जगाचा देखावा, म्हणजे शुद्ध ज्ञानच आहे, ‘अगा छातीठोक अन्वय केला आहे’. आतां येथें एक गोष्ट सांगून ठेवली पाहिजे, ती ही कीं, अन्वय किंवा व्यतिरेक पद्धतीनें अगर इतर कोणत्याहि पद्धतीचा अंगीकार

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करून उलट–सुलट प्रकारें निरूपण केलेले असले तरी सर्व निरूपणें एक आत्मा कळण्याकरितां केलेलीं असल्यामुळें कोणतीही निरूपण-पद्धत गौण असून आत्मबोध होणें हें मुख्य कार्य आहे. एकच गणित निरनिराळ्या मुलानीं निरनिराळ्या पद्धतीनें सोडवून उत्तर एकच दिले असल्यास सर्वांची गणितें बरोबर धरणें भागच आहे. उदाहरण सोडविण्याची रीत गौण असून उत्तरास प्राधान्य आहे. त्याचप्रमाणें साधकास ज्या कोणत्याहि प्रकारानें स्वरूपाचा बोध करून देतां येईल त्या प्रकारची निरूपणपद्धति श्रुतीने स्वीकारली आहे.

(ii) अन्वय पद्धतीनें पाणी बर्फ एकच आहे, सुवर्ण व सुवर्णाचे अलंकार एकच आहेत. त्याचप्रमाणें जग व जगदीश एकच आहे; असल्या प्रकारच्या निरूपणानें जगाचें व जगदीशाचें एकत्व सिद्ध करण्यामध्येंही एक प्रकारचा दोष उत्पन्न होतो. कारण, सोनें व सोन्याचे अलंकार एक असलें तरी सोनाराने सोन्यावर कांहीं तरी हातचलाखी–विकृती केल्याशिवाय अलंकार घडला गेला नाहीं. तसेंच पाण्यांत कडक्याच्या थंडीमुळें विकृती होऊन त्याचें बर्फांत रूपांतर झाले. त्याचप्रमाणें जग आणि जगदीश एक असले तरी जगदीशामध्यें कांहीं तरी विकृती होऊन तो पृथ्वीरूपानें गोठला अथवा विरघळून पाणी झाला अथवा त्यावर शोषणक्रिया घडून तेज झाला वगैरें अशा रीतीनें जगदीशाचे पंचभूत बनलें व पंचभूतापासून जग बनलें असावें असा तर्क होतो व अन्वय पद्धतीवर वरील प्रमाणें आक्षेप उत्पन्न होतो; पण असल्याहि आक्षेपाचें खंडण '**अरे जे झालेचि नाहीं । त्याचि वार्ता पुससी काई ॥**' या ओवीनें समर्थानीं केले आहे. परब्रह्माचे ठिकाणीं जग झालेंच नाहीं. स्वत:ला विसरणें हेच मायेचें उद्भवणें, मग तूं स्वत:ला कधीं विसरला होतास म्हणून ब्रह्म ठिकाणीं माया संभवेल? दृश्य–

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भासरूपी माया (मा=नाहीं या=जी) जी नाहीं किंवा अविद्या म्हणजे जो विद्यमान नाहीं, अशा नाहीं बाईचे वर्णन काय सांगावें? वंध्यापुत्र काळा कां गोरा? त्याचे वय किती? त्याची उंची रुंदी काय? त्याची जातगोत काय? हे आम्ही कसे सांगावे! रडक्या पोराला गप्प बसविण्याकरितां "वागुलबोवा आलारे आला" म्हणून नसताच वागुलबोवा निर्माण करून त्याच्या धाकानें पोरास गप्प बसविले खरे; पण पोरगा थोडा शांत झाल्यावर त्याने बाबास विचारले, "बाबा, वागुलबोवा कसा होता? त्याची दाढी, मिशी किती लांब होती; त्याचे डोळें, दांत व नाक किती मोठे होते?" वगैरे प्रश्नांचा भडिमार सुरूं केल्यावर बाबा काय आपले टाळकें सांगणार! पण कांहीं तरी सांगितल्याशिवाय पोराची टाळकी तर बंद पडत नाही. अशावेळी बापानें पोराचे समजुतीकरितां वागुलबोवाचें नाक रामेश्वरापर्यंत ओढावें, पाय पाताळापर्यंत खोल न्यावें; डोकें आकाशास भिडवावें, काय वाटेल ते सांगून एक अक्राळविक्राळ भुताचें चित्र रेखाटावें व हा वागुलबोवा असा असतो, पुन्हां रडूं नको बरें कां असे म्हणावे अशांतलाच प्रकार मायेच्या सर्वांनास लागूं पडतो.

(iii) नसलेलीच माया झाली म्हणावी, तिनें जग निर्माण केलें म्हणावें! व त्याची उत्पत्ती कशी झाली, माया कशी आहे वगैरे प्रश्न करणाऱ्या अज्ञानी जीवाच्या मगदुरीप्रमाणें त्याच्या अक्कल हुशारीप्रमाणें जगाची व मायेची कांहीतरी उपपत्ति लाऊन श्रुतीनें अज्ञ जीवांची समजूत करावीं असे झाले आहे. एका उपपत्तीशी दुसरी तिनेच लावलेली उपपत्ति विसंगत आहे म्हणून श्रुतीने एकाला एक व दुसऱ्याला दुसरेच सांगून फसविले म्हणण्यापेक्षां ज्या निरनिराळ्या साधकांच्या निरनिराळ्या बुद्धीच्या चष्म्यांतून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्यांची जगासंबंधीं वेगवेगळी फसवणूक झाली, त्या त्या तऱ्हेची उलटसुलट निरनिराळी उपपत्ति त्यांना सांगून त्यांचा भ्रमनिरास श्रुतीनें केला व सर्वांना सारखाच आत्मबोध केला असेंच म्हंटले पाहिजे. आईने एका मुलास गव्हाची खीर खावयास दिली व दुसऱ्या अपचनाचा विकार जडलेल्या पोरास गव्हाचें जड अन्न त्यास पचणार नाहीं, उलट उपाय करील म्हणून त्यास ज्वारीची भाकरी दिली तर त्या मातोश्रीस तुम्ही पक्षपाती म्हणाल काय? कोणत्या मुलाला कोणतें अन्न हितकर हें त्या माऊलीसच माहीत. तशीच गोष्ट हूबेहूब निरनिराळ्या बुद्धीच्या साधकास जडलेल्या भव-रोगांवर श्रुतीनें योजलेल्या उपायाबद्दल म्हणतां येईल. भवरोग (भव=झालेले) म्हणजे जग झालें आहे अशा कल्पनेच्या रोगावर ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणें निरनिराळें निरूपण करणें तिला भाग पडले. ज्वर एक असला तरी रोग्याच्या भिन्न प्रकृतीप्रमाणें औषधी योजना कुशल वैद्य निरनिराळी करतो. सर्वांचें आरोग्य हे एकच ध्येय त्याच्या डोळ्यापुढें असतें. औषधांत मात्र फरक पण ध्येयांत फरक नाहीं. एका प्रकृतीस मानवलेले औषध दुसऱ्या प्रकृतीस मानवत नाहीं. तसेंच एकास पटत असलेला बोध दुसऱ्यास पटत नाहीं. एका भूमिकेवर असलेल्या साधकास जो उपदेश त्याच्याहून वरच्या किंवा खालच्या दर्जाचे भूमिकेवर असलेल्या साधकास निरुपयोगी आहे. श्रुति माऊलीनें वेळोवेळीं स्वीकारलेल्या भिन्नभिन्न निरूपण पद्धतीत दोष नसून, निरूपणाचे वेळीं साधकाचे मनोभूमिकेत असलेले निरनिराळे प्रकारचे दोष होत. श्रुतीनें कोणाला कांहींहि सांगितलें असले तरी तिचे अंतिम ध्येय सर्वांस आत्मबोध करून देणें, हेंच असल्यामुळें निरूपणांतील विसंगती शोधून काढण्याची काकदृष्टि सोडून साधकानें आपले मूख्य कार्य आत्मबोध ते साधून कृतार्थ व्हावें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकरण ४ थें

महाकारणाचा बहुविध उलगडा व स्वरूपप्राप्ति

४.१. (i) येथपर्यंत चार देह म्हणजे काय ह्याचे विवरण झालें. आतां या चार देहांतील ज्ञान कसकसें होते तें आपण पाहूं. स्थूल देहांतील बाह्य स्थूल डोळ्याच्या साहाय्यानें स्थूल पदार्थांचे ज्ञान होण्यास स्थूल, सूक्ष्म, कारण महाकारण अशा चारी देहांची अपेक्षा आहे. उदाहरणार्थ आपणास आंब्याचें फल दिसतें किंवा हा आंबा आहे असें ज्ञान होतें म्हणजे काय होते तें पहा नुसत्या स्थूल डोळ्यानें तो आंबा दिसतो म्हणावा तर चित्राचें डोळ्यासही आंबा दिसला पाहिजे; पण ज्याअर्थी तसें होत नाहीं, त्याअर्थी स्थूल डोळ्याच्या मागें सूक्ष्म शरीरांतील बुद्धीरूप डोळा आहे, त्याची मदत त्यास घ्यावी लागते, एवढ्यानेंच भागत नाहीं. स्थूल आहे, सूक्ष्म बुद्धीरूप डोळा आहे; पण यांना त्याचे मागें असलेल्या कारणशरीराचा आधार नसेल तर बुद्धी ही मृतवत जड आहे. कारणशरीर म्हणजे अज्ञान, अवकाश, आकाश. भकाश, अंतरफट, संधी इतक्या अंगाने असल्यामुळें बुद्धि चालण्यास आकाशाची (पोकळीची) जरूरी आहे आतां डोळा आहे, बुद्धि आहे, कारणशरीररूपीं आकाश आहे; पण महाकारण देहांतील साक्षी जर या तिन्हीच्या जोडीस नसेल तर कशाचेंहि ज्ञान होणार नाहीं. यावरून स्थूल पदार्थज्ञानास चार देहांची गरज आहे. सूक्ष्म शरीरांतील विकाराचें ज्ञान होण्यास मात्र स्थूल शरीराची गरज नाहीं. पुढील देहाचें ज्ञान होण्यास त्यापुढील देहाची अपेक्षा असली तरी मागील देहाची गरज लागत नाहीं. स्थूलशरीरांतील कोणत्याहि अवयवांचे मदतीशिवाय सूक्ष्मशरीरांत उत्पन्न होणारे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

राग-द्वेषादि विकार, तहान भूक, पोटांत दुखणें वगैरेचें ज्ञान होतें; मात्र त्यास कारण, महाकारण देहांचें साहाय्य पाहिजे. आतां कारण 'शरीरांतील ज्ञान होण्यास त्यांतील स्थूल–सूक्ष्म शरीरांतील गरज संपते, फक्त महाकारणाची अपेक्षा आहे. कारण शरीरांतील ज्ञान होण्यास सूक्ष्मशरीर म्हणजेच अंतःकरण, मन, बुद्धी, चित्त अहंकार, प्राण, इंद्रिये यापैकीं एकाचाही उपयोग नाहीं. या सर्वांचा अम्मल फक्त स्थूल–सूक्ष्म–शरीरांतच चालतो. कारण शरीराचा प्रांत वेगळा असून येथें पाय टाकण्यासाठी या सर्वांना मज्जाव नाही. मग महाकारणांत त्यांचा प्रवेश कोठून होणार? मन, बुद्धीचा लागु सूक्ष्म शरीरापर्यंत असून त्यापुढील दोन देहांत म्हणजे कारण, महाकारणांत त्यांचा रिघाव होऊ शकत नाहीं.

(ii) आतां महाकारणांतील ज्ञान मात्र निरपेक्ष आहे. मागील तीन देहांपैकी कोणत्याही देहाची अपेक्षा या ज्ञानास नाही हें ज्ञान स्वयंप्रकाश आहे. डोळयानें सर्व पदार्थांस दाखविले तरी पदार्थ डोळयास दाखवूं शकत नाहीं. सूर्यास दाखविण्यास कोणत्याहि दिव्याची गरज भासत नाहीं. त्याचप्रमाणें डोळयाचा डोळा जो हा ज्ञानराज त्यास दाखविण्यास कोणी समर्थ नाहीं. तो आपल्याच प्रकाशानें स्वतःची सिद्धी करीत आहे. डोळयास डोळा जरी दिसत नाहीं तरी डोळसास 'आपणास डोळे आहेत कीं नाहीं' अशी कधी शंका येत नाहीं, कारण डोळे आहेत म्हणून तर सर्व दिसतें, हा ठाम निश्चय त्याचे ठिकाणीं असतो. त्याप्रमाणें ज्ञानास ज्ञान होणें हें म्हणणेंच चमत्कारिक आहे. जो केवळ ज्ञानरूपच आहे त्यास स्वतःचे ज्ञान दुसऱ्याचे साक्षित्व करीत असतांना फार तर होईल. आपला डोळा आपल्यास पहावयाचा असल्यास आरशासमोर उभे राहून त्यांतील डोळयाचे प्रतिबिंबाचे साक्षित्व करूनच दिसेल व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तेंहि ज्ञान बिंबाचे नसून प्रतिबिंबाचेंच होईल. आपल्याहून इतर सर्वांचे प्रकाशन करूनच हे ज्ञान स्वयंसिद्धी करीत आहे. त्याचे सिद्धीकरितां दुसऱ्या कोणत्याहि पुराव्याची गरज नाहीं. हे ज्ञान अति व्यापक, मोठे, उघडे असूनहि अज्ञानीं जीवास गुप्त व दिसेनासे झालें व महाकारणापेक्षां स्थूलशरीर म्हणजे दर्यामें खसखस इतक्या प्रमाणाचें असूनहि तोच सर्वांत मोठा होऊन बसला आहे! ही जगाची उलट राहटीच आहे!

(iii) आपणांस संवयच झाली आहे कीं, लहान पदार्थ पाहत असतां मोठी वस्तू विसरतो. स्वयंसिद्ध वस्तूस सोडून कृत्रिम वस्तूची तारीफ करतो. विजलीबत्ती पाहून आपल्यास जे कौतुक वाटतें ते सूर्याकडे पाहून वाटत नाहीं! भितीवरील चित्रें पाहत असतां भितच विसरतो, भिती पाहत असतां घरच विसरतो, प्रकाशांतील पदार्थ पहात असतां प्रकाश विसरतों, अक्षरे वाचीत असतां कागद ध्यानांतच येत नाहीं! म्हणजे काय होतें कीं, व्यापक हा व्याप्य पदार्थापेक्षां अनंत पटीने मोठा असूनहि व्याप्य पदार्थाकडे लक्ष दिल्यास व्यापकास विसरतो. स्थूलास सूक्ष्मानें व्यापले, सूक्ष्मास करण्यानें व्यापलें व कारणासही महाकारणानें व्यापले असे असतां महाकारण दिसत नसून स्थूलाकडेच सर्वांची दृष्टि लागली आहे. ही सर्व जीवांची आकुंचित दृष्टि ज्यावेळीं व्यापक होईल, त्यावेळीं 'सत्य ज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण'–आकाशालाहि ज्याची गवसणी झाली आहे त्यासत्य-ज्ञान-अनंताचे दर्शन होईल.

४.२.(i) महाकारण शरीरांतील ज्ञान हें अज्ञानाचें म्हणजें कारण शरीराचें नाशक असलें तरी ते ज्ञान स्थूल, सूक्ष्म शरीरांचे नाशक नाहीं. सामान्य ज्ञान हें अज्ञानाचें नाशक नाहीं. फक्त विशेष ज्ञानच अज्ञानाचें विरोधी आहे. ज्याप्रमाणें लाकडांत सामान्येकरून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अग्नी आहे; पण तो लाकडांचा नाश करीत नाहीं; पण घर्षणक्रियेनें लाकडाचे ठिकाणीं अग्नी उत्पन्न केल्यास तो लाकडाचे भस्म करतो. तसें (सामान्य ज्ञान हें कशाचेंहि नाशक नाहीं.) सामान्य ज्ञानावर अज्ञान देखील जगते. विशेष ज्ञान झाल्यावर अज्ञान जातें. पण स्थूल, सूक्ष्म शरीरांचें कार्य नाहीसे होत नाहीं. अज्ञान्याचे ठिकाणी ज्याप्रमाणें स्थूल, सूक्ष्म देह व त्यांचे धर्म स्फुरतात त्याचप्रमाणें ज्ञान झाल्यावर ज्ञानाचेहि ठिकाणीं स्फुरतात. अंधारांत दिसेनासे झालेल्या पदार्थांचें ज्ञान दिव्याच्या प्रकाशानें अंधाराचा नाश होऊन होतें. प्रकाशामुळें अंधाराचा नाश झाला तरी पदार्थाचा नाश होत नाही अंधार गेल्यावर पदार्थ व प्रकाश असे उरतात व पदार्थांचे ज्ञान होते. या ठिकाणीं अंधाराचा विशेष नाश होतो. त्याप्रमाणें आत्मज्ञान झाल्यावर, अज्ञानाची निःशेष नाश होऊन मग स्थूल, सूक्ष्मशरीर स्फुरतात व कारणशरीर मात्र अजिबात स्फुरत नाहीं असे होते की काय, याचा थोडा सूक्ष्म विचार करू. प्रकाशाचे अभावी असलेल्या अंधारास काळोखीं हे एकच स्वरूप असल्यामुळें प्रकाशानें त्या स्वरूपाचा नाश केला की, काळोख कोणत्याहि रूपानें मागे उरत नाही; पणतसे अज्ञानाचे नाहीं, कारण अज्ञानाची अनेक रूपे आहेत. अज्ञान, आकाश, अवकाश, भकास, संधी, अंतर इतक्या विविध रूपानें असल्यामुळें ज्ञान झाल्यावर अज्ञानाचा नाश होतो पण या ज्ञानांत स्थूल, सूक्ष्म स्फुरण्यापूर्वी स्फुरण किंवा इच्छा हेच आकाशाचे अवकाशाचे गुण असल्यामुळें आकाश उत्पन्न झाल्या-शिवाय स्फुरणच होणार नाहीं. म्हणजे काय झाले कीं, ज्या क्रमानें एकएक शरीर मागेमागे एकएक पायरीने नाहीसे झाले, त्याच क्रमाने सिंहावलोकन करण्याचे वेळी ज्ञान, मग कारणशरीर (आकाशरूपानें) मग सूक्ष्मशरीर व नंतर स्थूलाचें भान सिद्ध होते.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

स्थूल, सूक्ष्म स्फुरण्यापुर्वी कारणशरीरांतील अज्ञान हें अज्ञानरूपानें नाहींसें झाले तरी अवकाशरूपानें सूक्ष्म देह व महाकारण देह यांच्यामध्ये पायरी स्थापित केल्याशिवाय राहत नाहीं.

(ii) ज्ञान हें स्वत:पासून सुटून जेंव्हा आपल्यापेक्षां निराळ्या वस्तूचें स्फुरण आपल्यांत होऊं देते, त्याचवेळीं त्या ज्ञानांत अवकाशरूपीं कारणशरीर प्रथम निर्माण होऊन मग क्रमाने सूक्ष्म-शरीर व नंतर स्थूल शरीर दिसूं लागते. १ स्थूल, २ सूक्ष्म, ३ कारण, ४ महाकारण या चार पायऱ्या ज्या क्रमानें आपण वर चढत गेलों त्याच क्रमानें खालीं उतरतेवेळी १ महाकारण, २ कारण ३ सूक्ष्म, ४ स्थूल अशा नंबरवारीने उलट पायऱ्या लागतात. ज्ञान हें ज्ञानाचें ठिकाणीं स्वस्थ न राहतां चुळबुळ करूं लागलें किंवा खालीं घसरूं लागलें म्हणजें तिसरी जी कारण अवस्था ती अवकाशरूपानें प्रथम लागल्याशिवाय त्यामागील दोन पायऱ्या लागत नाहींत. या दोन पायऱ्या सूक्ष्म व स्थूलाच्या असून या ठिकाणीच जगदाभास होतो. एकंदरीत काय झालें की, अंधारांतील पदार्थ प्रकाशामुळें अंधाराचा समूळ नाश होऊन जसें दिसतात तसें जगदाभास ज्ञानानें अज्ञानाचा समूळ नाश होऊन होत नाहीं. परंतु अज्ञान हें अवकाशरूपानें उरूनच मग जगदाभास होतो. अज्ञान जर कोणत्याहि स्वरूपानें न उरता नि:शेष जाईल तर सूक्ष्म अगर स्थूल शरीराचेंही भान होणार नाहीं किंवा स्थूल सूक्ष्माचे आधारावर टिकलेलें जगतही भासणार नाहीं. जोपर्यंत जगदाभास होतो तोपर्यंत मग ज्ञानी असो कीं, अज्ञानी असो; त्यांना अज्ञानाला कमी अधिक अंश एका अगर अन्य रूपानें खास आहे असे ठाम समजावें. ज्ञानाचे ठिकाणीं अज्ञान हें अज्ञानरूपाने राहणार नाहीं [illegible] अज्ञानही नि:शेष मरत

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नाहीं. ज्ञान आहे तर अज्ञानही आहे ज्ञान नाहीं तर अज्ञानही नाहीं. ज्ञान व अज्ञान हीं महामायेची दोन जुळीं पोरें एकदमच जन्मतात व एकदमच दोघेही मरतात. एक असलें कीं दुसरें राहते. एक मेले कीं दुसरेही मरतें. अशी सत्य गोष्ट असल्यामुळें हे ज्ञानाचें मरण कसे होईल, तेच आतां पाहू.

४. ३. (i) महाकारण शरीरांतील ज्ञान मरण्यापूर्वी त्याखालील सर्व शरीर आधी मरून पडले पाहिजेत; म्हणून क्रमश: या चार देहांचें मरण कसेकसें होतें याकडे आपण पाहत राहूं. मरत असलेल्या माणसाकडे आपण पाहत बसण्यापेक्षां जास्त कांही करतो काय? आपणही त्याबरोबर मरत नाहीं! त्याचप्रमाणें हे चार देह कसे मरतात ते स्वस्थपणें आपल्या ठिकाणीं आपण उगीच पाहत बसू. मरणाचा असा एक सिद्धांत आहे कीं, 'वाढी खुंटली कीं मोडी लागतें' याचा अर्थ असा कीं, कोणत्याही वस्तूची वाढ थांबली म्हणजे ती मोडण्याच्या किंवा मृत्यूच्या पंथास लागतें. मृत्यूची निराळी खटपट करावी लागत नाही. वाढीमध्येंच मोडी असते किंवा जन्माचे पोटीं मरण व मरणाचे पोटीं जन्म अशी जन्म-मरणाची परंपरा आहे. जन्मास आलेली वस्तू आपल्या मरणानेंच मरत असतें, त्यास मारण्याकरिता निमित्तमात्र कारण जरी दुसरें कांहीहि वरवर दिसत असलें तरी मरणाचे मूळ कारण जन्मच आहे. शुद्ध स्वरूपावर हे चार देह जन्मास आले ते मेलेच पाहिजेत. तें कसे मरतात? तेच आपण पाहूं.

(ii) स्थूल देहाचें मरण "वाढी व मोडी" च्या सिद्धांताप्रमाणें केव्हांना केव्हां आज नाहीं १०० वर्षानें ओढवल्याशिवाय राहत नाही. स्थूल शरीराची वाढ २५ वर्षांपर्यंत होऊन पुढें हें शरीर मोडीस लागतें व हळुहळु मृत्यूचा राजरस्ता आक्रमीत एके दिवशी

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मृत्युवश होतें. स्थूल शरीर हे सूक्ष्म शरीराचे स्थूलरूप असल्यामुळे वास्तविक स्थूलशरीरास स्वतंत्र अस्तित्व नाहीं म्हंटले तरी चालेल. बीजरूपी सूक्ष्मशरीराचा परिणाम म्हणजेच स्थूल देहरूपी वृक्ष होय व हा वृक्ष आपोआप वाढतो.

(iii) सूक्ष्मदेह-हा देह म्हणजे जन्म-मरणाचें बीज आहे. झाड जितक्या सहज रीतीने वाढते तितके बीज लौकर नाहीसें होत नाहीं. याची वाढ इतकी बेसुमार असते की, जर त्याला मुद्दाम पुरुषप्रयत्नाने मोडीस लावले नाहीं तर तो चिरकाल वाढतच जातो व ही वाढ अनंत स्थूल देहास कारण होते व चौऱ्यांशीच्या फेऱ्यांत जीवास घालते. स्थूल देहाची वाढ जशी आपोआप खुंटते, तशी या सूक्ष्म शरीराची नसल्यामुळे सूक्ष्म देहाची वाढ कशी खुंटवावी हे समजून घेण्यास प्रथम सद्‌गुरुची गरज येथेच भासूं लागते. संकल्प-विकल्परूपीं सूक्ष्म शरीराची वाढ खुंटविणे म्हणजे संकल्प-विकल्प करण्याचे सोडून देणे. संकल्प-विकल्प हे मनानेच केलेले असतात. ते मोडण्याचेहि काम मनानेच केले जाते. **'मनें निर्मिली ती करें मोडवेना। करें निर्मिली ती मनें मोडवेना'** याप्रमाणें निर्माण झाले ते हाताने मोडता येत नसून मनानेंच मोडले पाहिजे; ही गोष्ट हिशेबी आहे. संकल्प-विकल्प मुद्दाम जबरदस्तीने मोडण्याचा आपण जेव्हा जेव्हा प्रयत्न करूं, तेव्हा तेव्हा संकल्प-विकल्पाचा गर्दी न मोडता ती अधिकच वाढत जाते. **'हे मन चंचल मोठें। आवरू जातां अधिकची पेटे ॥'** सबब या मनाची वाढ खुंटविण्याचा उपाय सद्‌गुरु असें सांगतात की, "उगी सहज राहण्याचा-हळुवार होण्याचा प्रयत्न केल्यास संकल्प-विकल्प मोडूं लागतात." अगदी लहान मूल झोपी जातांना त्याचे डोळ्यांकडे पाहत रहा म्हणजे तुम्हांस सहज उगी होण्याचे धडे त्याचकडून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मिळत जातील. झोपी जाताना ते मूल किती सहज रीतीने स्वतःचे भान विसरून झोपी जाते हे तुम्हांस कळेल व हे पाहत असतां तुम्हीहि न कळत कसे संकल्प-विकल्परहित विसर अवस्थेत जातां ते पहा. अशा खुबीने कांटयानेच कांटा काढावयाचा असतो, मनानेच मन मोडावयाचें असते. जन्म-मरण, उदय-अस्त ही एकाच अवस्थेची दोन उलट-सुलट अंगे आहेत. यापैकी एक आले कीं, दुसरे येते व एक गेले कीं दुसरेहि जाते. आपल्या डोक्यावर आपलेच हात ठेवून भस्म होणाऱ्या भस्मासुरी मरणाने हे मन मरते व अशा रीतीने एकवार हे मन मोडले म्हणजे त्याखालीं असलेली कारणशरीररूपी विसर अवस्था सहज उघडी पडून साधकास त्या अवस्थेचे ज्ञान होतें (iv) येथें अशी एक शंका येते कीं, मन मोडुन कारण-अवस्था प्राप्त झाली तरी पुन्हां मन उठतेच की नाहीं? त्याचें निःशेष मरण होत नाहीं, त्यास काय उपाय? तर अभ्यासाची वाढ करणें हाच तो उपाय. एकदा मनाची वाढ खुंटविण्याचा अभ्यास सुरूं झाला म्हणजे मन हळुहळु मरणाच्या पंथाला लागून निःशेष मरेलही पण अभ्यास मात्र तितकाच चिकाटीचा पाहिजे. एकदां मोडीस लागलेला वृक्ष जरी पाणी घालून कांहीं दिवस हिरवागार ठेवण्याचा प्रयत्न केला तरी ती कालानुसार मोडून पडणारच. एखादी मोडकळीला आलेली इमारत वरूनवरून गिलावा, रंग, रिपेरी करून कितीहि नीटनेटकी ठेवण्याचा यत्न केला तरी ती केव्हां कोसळेल याचा नेम नाही. त्याचप्रमाणें अभ्यासानें मनाची वाढ खुंटविण्याचा सतत प्रयत्न सुरूं ठेवल्यावर मधूनमधून डोकावण्याचा मनानें कितीही प्रयत्न केला तरी कंटाळून ते मन आपोआप मोडेल याची साधकाने खात्री बाळगावी. मात्र अभ्यासाचा कंटाळा येऊ देऊ नये. याप्रमाणे एक देहाचे मरण म्हणजे त्या-

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

खालील दुसऱ्या देहाचें उघडे पडणें होय. सूक्ष्मशरिराचा पडदा नाहीसा झाल्यावर कारणशरीराचें आवरण आपोआप उघडे पडते.
(v) आतां या कारणशरीराचें मरण कसें होतें पाहूं. कारण-देह हा सूक्ष्म देहाचा जनक असून, तो उघडा पडल्यावर कांहीं कालानें आपोआप कोणतीही अवस्था जी आगंतुकपणें येते ती आल्यावेळीं अल्पकाळ जरी त्या अवस्थेचा अनुभव येतो, तरी तो भर जिरल्यावर थोडया काळानें त्या अवस्थेची आठवण सुद्धां राहत नाहीं. प्रथम येतेवेळीं येणारी अवस्था मोठया जोमाचे वाढीनें येत असते; पण येऊन अल्पकाळ लोटल्यावर जिरत जिरत मोडीस लागते व शेवटी ती कधीं होती कीं नव्हती, अशी निःशेष नाहीशी होते. कडक उन्हांतून तापून आलेला जीव झाडाच्या शीतल छायेंत येतो, त्यावेळीं जीवाचें अंतःकरणांत शांतीचा भर इतक्या झपा-टयाने येतो कीं, तो हृदयांत न माऊनच की काय तो जीव तोंडातून हा! हा! हा! असें शब्द काढून तो शांतीचा भर आंत भरून बाहेर फुटला असे दाखवितो; पण थोडावेळ गेल्यावर 'हा!' बद पडून आपण सावलीत नाहीं याचेही भान त्या जीवास न राहतां उगीच पडून राहतो व ती आगंतुकपणें आलेली शांत अवस्था जिरून सहज अवस्थेंत जीव राहतो. त्याचप्रमाणें सूक्ष्म देहाची गडबड, धांदल, धांवपळ मिटल्याबरोबर त्याचे सापेक्षेनें आलेली शांत शून्यरूपी कारण देहांतील विसर विसरानेंच विसरली जाते. नाहीचे निमणें नाहीपणेंच होत असते, या नाहीं अवस्थेस मारण्यास आहेपणाची तलवार लागत नाहीं; म्हणून समर्थांनी या कारण-शरीराचें मरण "नाहींपणें निमालें" या शब्दांनीं स्पष्ट केले आहे.
(vi) येणेप्रमाणें ही विसर-अवस्था निमाल्यावर ज्ञानावस्था अगर तूर्यावस्था अगर महाकारणदेह हा आपोआप उघडा पडतो.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ही ज्ञानावस्थाही वरील कारणदेहातील अज्ञान अवस्थेच्या अपेक्षेनेंच येत असल्यामुळें याही ज्ञान अवस्थेचें प्रथम येण्याची वाढ खुंटली कीं तीहि मोडीस लागतें. ज्ञान होतें तर त्यास जाणेंहि भाग आहे. ज्याला ये आहे, त्याला जा आहेच. अज्ञान जसें होतें तसें ज्ञानही होतें. सबब झालेलें ज्ञान गेलेच पाहिजे. अशा रीतीने महाकारण देहाचें मरण आल्यावर ज्ञान–अज्ञानातीत चौदेहातीत परमात्मा आपोआप उघडा पडतो, तो मात्र कधीं झाला नाही म्हणून त्याचा अंतहि होणें शक्य नाहीं. सर्वांचें जन्म-मरण पाहून स्वत: जो शिल्लक राहिला ते तुझें रूप होय.

४,४.(i) भगवंतानीं गीतेंत **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागश:** असें जे वचन सांगितलें आहे, त्याचा अनुभव प्रत्येक जीवास स्वत:चेच ठिकाणीं चौदेहांत घ्यावयास सांपडतो––माझी सृष्टी चतुर्वर्णात्मक असून ते वर्ण-गुण-कर्माप्रमाणें विभागले आहेत. स्थूल देहापासून महाकारणदेहापर्यंत सर्व देह मिळून भगवंताची सृष्टीच होय. चार देहापर्यंत सर्व प्रकृतीचा संसारच आहे. गुणकर्माप्रमाणें हे चार देह कसें विभागले गेले ते पहा. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांचे गुणकर्म निरनिराळें असल्यामुळें त्यामध्यें आपोआप विभाग पडले. महाकारणदेह ब्राह्मण वर्ण, कारणदेह क्षत्रिय वर्ण, सूक्ष्मदेह वैश्य वर्ण व स्थूलदेह शूद्र वर्ण याप्रमाणें शुद्ध परमात्माच्या ठिकाणीं त्यांचेत्यांचे गुणभेदानें चारवर्ण निर्माण झाले. स्थूलशरीर जड असून ते राबून कष्ट करण्याचे व सेवा चाकरीचे साधन आहे म्हणून त्याचा शूद्र वर्ण होय, गादीवर बसून म्हणजे स्थूल शरीरांत एके ठिकाणीं बसून सर्व जगाची घडामोड संकल्प-विकल्पाचे भांडवलावर हातांत तराजू धरून अमुक चांगले, अमक वाईट, हे मोठें, ते लहान अशी तुलना करणारा बुद्धाजीशेट

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

स्थूल शरीररूपी शूद्रास आपले नोकरीस ठेऊन त्यास मनमानेल तसे राबविणारा धनी असल्यामुळें या व्यापाऱ्यांस वैश्य ही संज्ञा प्राप्त झाली. आतां कारणशरीररूपी जीवाजीपंताचा पराक्रम पहा! सूक्ष्मशरीररूपी बुद्धाजी शेटजीचा, त्याचे संकल्प-विकल्पाचे भांडवलदार उभारलेल्या जगरूपी मालमत्तेसह त्याचे स्थूलदेहरूपी नोकरासह स्वाहाकार करून या कारणशरीराने आपले राज्य स्थापन केलें. सर्व संहाराची रुद्रस्वरूपी कारण अवस्था आपल्या क्षात्र वृत्तीमुळें क्षत्रिय वर्णास योग्य झाली. आता राहता राहिला तो महाकारणदेह याच ठिकाणी मागील तीन देहाचे औदाशीन्य! राबराबून मरणाऱ्या शूद्र स्थूलदेहाचा, मनोव्यापार करीत सर्व जगाचा व्यापार करीत सर्व जगाचा पसारा माजविणाऱ्या सूक्ष्म-शरीरांतील बुद्धि-वैश्याचा, व त्या दोघांस मारून जणू काय 'कांही झालेच नाही' असा बहाणा करून गुपचुप बसणाऱ्या कारण-शरीररूप क्षत्रियाचा आपणास कांही संबध नाहीं; कोणी कांहीं करो, स्थूल राबो, सूक्ष्म व्यापार करो, कारण लढो त्याचे आपल्यास काय होय, **'तूं तो राम सुमर जग लढवा दे'** असे जाणून जो **'अहं ब्रह्मास्मि'** असा वेदघोष करीत आपल्या आसनावर स्वस्थ बसला तो महाकारणदेह ब्राह्मण या श्रेष्ठ वर्णास पावला. या ब्राह्मणाचे सोवळे मोठे कडक असून खालील कोणत्याहि वर्णाचा विटाळ त्यास खपत नाहीं. खालील वर्णानीं आपले मस्तकीं धारण असून त्याचे पदरज सर्व खालील वर्णानीं आपले मस्तकी धारण केले आहे. विज्ञानदृष्टया हा ज्ञानरूपी महाकारण ब्राह्मण जरी भ्रष्ट झाला तरी तो तिन्ही लोकीं श्रेष्ठ होय.

(ii) स्थूलदेह हा स्वर्गलोक, सूक्ष्मदेह मृत्युलोक व कारणदेह पाताळलोक, महाकारण हा ब्रह्मलोक होय. गुणभेदानें हे चार देह

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ज्याप्रमाणें निरनिराळे चार वर्ण पावले त्याचप्रमाणें चार निर-निराळच्या लोकांचीही त्यांचें ठिकाणी भेद निर्माण झाले. स्थूलदेह हा स्वर्गलोक असून तो सर्वलोकांचे वर आहे. या लोकांत सर्व तऱ्हेचे बाह्य भोग घडतात. जगांतील अनेक उपवने, व नंदनवने याच लोकांकरिता निर्माण झाली. येथील देवता रजोगुणी ब्रह्मदेव आहे. या खालचा मृत्यूलोक म्हणजे सूक्ष्मशरीर होय. हे लोक म्हणजे जन्म-मृत्यूचा एक मोठा कारखानाच. या ठिकाणीं नित्य जन्म व नित्य मरण सारखे चालू आहे. हे नित्य जन्म-मरण म्हणजे दुसरे तिसरे कांहीं नसून, एकवृत्ती उठणें हे जन्म व ती वृत्ती मावळणे हे मरण या प्रमाणे आपण दिवसांतून किती वेळ जन्मतो व किती वेळा मरतो. या जन्म पुनर्जन्म व पूनर्जन्माचा हिशोब ज्याचा त्यानेच ठेवावा! प्रत्येक संकल्पावरोवर दृश्यभास निर्माण होऊन त्याचे मावळण्यावरोवर दृश्यभासहि आटोपतो. अशा तऱ्हेच्या कल्पनेचा अंत तोच कल्पांत. प्रत्येक प्राणीमात्रांचें ठिकाणी सूक्ष्मशरीरांत नित्यश: प्रचीत होतो. दृष्टी-सृष्टीवाद म्हणून शास्त्राकारानीं जो एक वाद अंगीकारला आहे, त्यांतहि हाच सिद्धांत मांडला आहे. कल्पनेच्या उदयावरोवर जगाचा उदय व कल्पनेच्या अस्तावरोवर जगाचाहि अस्त होतो. या सूक्ष्मशरीररूपीं मृत्यूलोकास कायमची मूठमाती मिळाल्याशिवाय वरील तऱ्हेचे शेकडो कल्पना येत जात राहणारच. सवव मरण एकदाचे असे मरावे की, पुन्हा जन्मण्याची दगदगच राहूं नये; व स्वरूपाचे अंगाने असे जगावे की पुन्हा मरण्याची भीतीच राहू नये. असो. हे घडेल तेव्हा घडो; पण तोपर्यंत हा सूक्ष्म शरीररूपी मृत्यूलोक सर्व जीवाकरितां 'आ' पसरून उभा आहे एवढे खास. सूक्ष्मशरीराचें ठिकाणी अंत:करण असून अंत:करणाची देवता विष्णू आहे. तोच या लोकाचे पालन

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करतो. आतां या खालील पाताळलोक म्हणजे कारणशरीररूपी विसर अवस्था होय. या पाताळ लोकांत अज्ञानाचा गडद अंधार असल्यामुळें येथें सर्व संहारकर्ता महेश हा तमोगुणी देव नांदतो. या सर्वांच्यावर असलेला सर्वश्रेष्ठ असा महाकारणदेहरूपी ब्रह्मलोक हा तिन्हीलोकीं श्रेष्ठ आहे. लोकांतील मुख्य अधिष्ठान–देवता शुद्धज्ञान हेच असून, सर्व देवाचादेव आहे याच लोकांपासून बाकी सर्व लोकांची उत्पत्ती झाली आहे. येथींल देवतेस त्रैलोक्यनाथ म्हणतात.

(iii) **'वर्णानां ब्राह्मणोगुरुः'** या वचनाप्रमाणें ब्रह्मलोकांतला हा ब्राह्मण सर्व वर्णांत श्रेष्ठ आहे. खालील वर्णांचे प्रकाशन हाच करतो म्हणून यास गुरुपद प्राप्त झाले आहे. या ब्राह्मणास मन-बुद्धीवृत्तीची विटाळ असून अज्ञानाची सावलीही तो आपल्यावर पडूं देत नाहीं. मग स्थूलदेहाच्या जड प्रेतास तो कवटाळील ही गोष्टच नको. हा सोवळा शुद्धचेतनस्वरूप ब्राह्मण आपल्या महाकारणरूपी घराचे उंवरठ्याचे आंत कोणाही शूद्र वैश्य अगर क्षत्रियाला येऊं देत नाहीं (महाकारणांत स्थूल, सूक्ष्म, कारण शरीरांचा रीघ होत नाहीं.) या त्रिवर्णांस ब्राह्मणाखेरीज तर चालत नाहीं, त्यांचें सर्व शुभाशुभ कार्य या ब्राह्मणाचें जोरावरच चालते. अशा वेळीं हा ब्राह्मण आपल्या घराबाहेर पडून या त्रिवर्णांचे कार्य करतो व काम संपल्यावर घराबाहेरच्या उंबरठ्या-वरच शुचिर्भूति होऊन मग घरांत येतो. हा ब्राह्मण मोठा वेदसंपन्न आहे म्हणून त्याला वेदो–नारायण असें म्हणतात. तो त्रिकाळज्ञानीं (आधी, मध्य व अंतीं जाणणारा) असून तो संध्याशील (सर्व कल्पनेंच्या संधीत राहणारा) आहे. सर्व लोकांना हा वंद्य असून यास भूदेवही म्हणतात.

४.५ (i) Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri [illegible] देवाची पूजा सर्व जातीचे व सर्व

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वर्णाचें लोक समजून किंवा न समजून करीत आहेत. तो पूजक हिंदु असो, मुसलमान असो, ख्रिस्ती असो, जैन, बौद्ध, पारशी इराणी, तूराणी कोणीही असो, त्या या देवाची पूजा केलीच पाहिजे; न करून भागतच नाहीं. या देवास भूक लागली असतां त्यास अनेक खाद्य-पेयाचा नैवेद्य नित्यशः अर्पण केला जातो. या देवास झौंपण्याकरिता गाद्या, गिरद्या, पलंग तयार आहेत. या देवास फिरावेसें वाटल्यास मोटारी, विमाने, पालख्या तयार आहेत. सुगंधी पुष्पमाला पुरविण्याकरितां अनेक वृक्षलता पुष्पभारांनीं फुलून गेल्या आहेत. सर्व नौकर चाकर याच देवाच्या सेवेस हात जोडून उभे आहेत. वायका मुलें, राजमंदिरें याच देवाच्यां करमणूकीकरिता व निवासस्थानाकरितां बंगला आहेत. हा देव सर्वांचें अंतर्यामी बसून सर्वांकडून अनेक तऱ्हेची सेवा घेत आहे. असे असून देहासच देव समजून देहाचीच आम्हीं पूजा करतो, अशी अज्ञा जीवानीं आपली लटकीच समजूत करून घेतली आहे, या चुकीच्या एका भावनेसाठीं 'देवभक्ताशी पडली तुटी' असें झाल्यास काय नवल! अनेक कर्मरूपानीं जें जें कोणीं जें जें कांही करीत आहेत, तीं त्यांची सर्व शुभाशुभ कर्मेहि या देवावर चढत असलेली फुलेच असून त्याची पूजाच होत आहे. पंचकर्मेंद्रियें व पंच-ज्ञानेंद्रियामार्फत शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध याविषयांचा नित्य अभिषेंक याच महादेवावर होत असतो, हे ज्याला गुरुकृपेनें समजेल तोच भक्त धन्य होय. या भक्ताची सहज कर्मे ब्रह्मार्पण होतात. पशु, पक्षी, किडा, मुंगीसुद्धां याचदेवाची आराधना करीत आहेत. पण ह्या योनी निर्बुद्ध असल्यामुळें त्यांना ही पूजा समजत नसेल तर त्यांना दोष देतां येत नाहीं. पण बुद्धीमान मनुष्यप्राण्यानें त्याची सर्व नित्य-नैमित्तिक कर्मे याच प्रीत्यर्थ चाललेली आहेत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

हे समजू नये यापरते दुर्भाग्य ते कोणते? पक्वान्नाचा प्रत्येक घास घेत असतां त्याचा स्वाद जाणणारा, फुलांतील सुगंध व विष्टेंतील दुर्गंध जाणणारा, कर्णमधुर व कर्कश ध्वनी जाणणारा, उत्तम रूपाची व भेसूर रूपाची परिक्षा करणारा, मृद व कठीण स्पर्श जाणणारा हा शुद्ध ज्ञानराज सर्वांचे अंतरांत सदोदीत विराजमान आहे. त्या देवास सोडून आम्हीं दुसऱ्याची पुजा करतो असे म्हणणें ही केवढी दिशाभूल आहे!

(ii) ख्रिस्ती लोक ख्रिस्ताची, मुसलमान लोक महंमदाची हिंदुलोक ब्रह्मा, विष्णू महेशाची, पारशीलोक झोऱ्यास्थरांची व बुद्धलोक बुद्धाची पूजा करतात म्हणजें काय करतात? याचा विचार तर करून पहां. हे सर्व लोक वरील देवतांच्या प्रेतांची पूजा करीत नाहींत ना? पूजा-प्रार्थनेच्या वेळीं डोळे मिटतात त्यावेळीं मनांत देवाचे प्रेत तर आणीत नाहींत ना? मग पूजकांची भावना पूजेच्या वेळी काय असतें? प्रत्येक धर्मांतील देवभक्तांस विचारा कीं तुझा देव कसा आहे? तर तो म्हणेल "माझा देव चेतनारूप, प्रकाशमय, ज्ञानघन, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वव्यापी, सर्वशक्ती, सर्वांचा चालक, मालक, अजन्मा, अमर असा आहे" कोणी "माझा देव दगड, धोंडा, माती, धातु, जड, मंद, पोकळ, अचेतन, अशक्त, आंधळा, बहिरा आहे" असे सांगेल, किंवा त्याची भावना तशी असू शकेल काय? यावरून हेच स्पष्ट होते की, पैगंबर झाला काय, विष्णू झाला काय, ख्रिस्त झाला काय, किंवा बुद्ध झोऱ्यास्थर कोणता देव झाला काय, त्यांचें स्वरूप वरील चैतन्यादि गुणांनीं युक्त असेंच त्यांचे भक्त मानणारा व या लक्षणांनीं युक्त जर कोणी असेल तर तो एक सर्वांचे अंतर्यामी वसलेला वासुदेव ज्ञानरूप परमात्माच होय. महंमदांतही तोच देव वसला. ख्रिस्ताचें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अंत:करणही याच देवाने व्यापिले. विष्णूचे विष्णूपणही याच देवाने टिकविले असून, कोणत्याहि भक्ताने कोणत्याहि रूपात या देवाची पूजा केली तरी याच अंतरात्म्याची ती पूजा आहे. "**सर्व देवाला केलेला नमस्कार या एकट्या केशवं प्रतिगच्छति,** हे नितांत सत्य आहे. वरील सर्व रूपें ही या देवाची देवालये आहेत व नांवेही देवळाची आहेत. सर्व रूपाचें अंतर्गत असलेला तो हा आत्मदेव होय. तोच सर्वांत वसून सर्वांची पूजा घेतो.

(iii) स्थूल शरीरानें तुमच्याकडून घडत असलेली कोणतीही कर्मे, सूक्ष्मशरींरानें तुमच्या मनांत येणारे कोणतेहि संकल्प-विकल्प याच देवाचे आधारावर त्याच्याच प्रीत्यर्थ होत आहेत. एवढे ओळखले की, तुमचा कार्यभाग संपला. तुम्हीं सर्वजण कांहींना कांहीं शरीराने व मनाने करीतच असतां करूं नको म्हंटल्यास होण्याचें थांबत नाहीं; पण कांहींहि करीत असतां सर्व कृत्यांचा कर्ता हरी व भोक्ताहि हरीच आहे, ही एकच गोष्ट सर्व हालचालींत ओळखणें आहे. सर्व शुभ-अशुभ कर्मे याच रीतीनें ब्रह्मार्पण होऊन साधक मोकळाच राहतो. ज्ञानयज्ञ तो हाच होय.

अहो येतां जातां वदनि वदतां ग्रास गिळतां ।
सदा देतां घेतां उठत बसतां कार्य करितां ।
घरीं दारीं शय्येवरी रतिसुखाचे अवसरीं ।
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवत्‌चिंतन करी ।।

या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें सर्व कर्मांत एक ज्ञानच कसें खेळत आहे, याचें सतत चिंतन साधकानें करणें म्हणजे भगवत्‌चिंतन करणें होय "**देहबुद्धी तो आत्मबुद्धी करावी ।**" किंवा **आत्मबुद्धी निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची । अहमात्मा हे कधीची । विसरू नये ।।** या समर्थांचे उपदेशाप्रमाणें किंवा हेंचि दान देगा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

देवा । तुझा विसर न व्हावा ॥" या तुकोबाच्या मागणीप्रमाणे स्वतःचा विसर कधीं पडूं देतां कामा नये, म्हणजे मोक्ष पायाशी लोळण घेत येईल. या मनरूपीं दोरखंडाला देहबुद्धीचें वळण ज्या दशेनें फिरवून पडलें त्याचे उलट दिशेनें आत्मबुद्धीचे वळण लावण्यास हा दोरखंड ढीला पडून त्याचें तंतू वाऱ्यावर उडून जातील व दोरखंड म्हणून शिल्लकच राहणार नाहीं. स्क्रू जसा आंत गेला तसा त्याचे उलट फिरविल्यासच तो निघतों, त्याप्रमाणें देहबुद्धीचे उलट आत्मबुद्धीचे वळण मनास लावल्यास **"मन रामीं रंगले, अवघे मनची राम झालें** असे होऊन मन म्हणून कांहीं शिल्लक न राहतां **'सबाह्य अभ्यंतरी अवघें रामरूप कोंदाटले ।'** असा देखावा साधकांस दिसेल.

(vi) सर्व कर्मांत, सर्व विषयांत एक शुद्ध ज्ञानच कसें खळत आहे हें पटून घेण्यास, एकदम घराबाहेर पडून चंद्राकडे पहा. डोळ्याचे गवाक्षांतून ज्ञानसंवित् किती वेगानें चंद्रमंडळापर्यंत जाऊन धडकते व सर्व आकाश किती अल्पावकाशांत व्यापून टाकते. याचा अनुभव घ्या. मनाचा वेग इतका आहे काय? कोठून असणार! याच ज्ञानाचे आश्रयानें मनास वेग मिळाला आहे. मग जाईल त्याचें अगोदर ज्ञान तेथें हजर असतेंच. मन मनाची गती ज्ञानांत खुंटते यांत काय नवल! डोळ्याचे पाते उघडण्याचाच काय तो अवकाश, हे ज्ञानसंवित् सर्व नभोमंडळ, तारामंडळ चंद्रमंडळ एक समयावच्छेदेकरून व्यापून टाकते. व्यापून टाकते म्हणण्यापेक्षां आधीच व्यापलेली अनुभवास येते. डोळ्यांतून ज्ञानसंवित् चंद्रापर्यंत जाऊन चंद्राचें जे ज्ञान होते ते सविषय ज्ञान होय. या ठिकाणीं चंद्र हा विषय असून संवित् तदाकार बनल्याबरोबर चंद्राचें ज्ञान होते. चंद्राचें आड ढग असेल तर ढगाचे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अडथळ्यामुळें चंद्रापर्यंत ज्ञानसंवित् न जातां ढगाजवळच थांबते म्हणजे ढग हा विषय प्रथम पुढें आल्यामुळें ढगास व्यापून ढगाकार बनते व ढगाचें ज्ञान होते. आतां निर्विषय ज्ञानाची म्हणजे ज्या ज्ञानांत कसल्याही विषयाची भेसळ नांहीं असल्या शुद्ध ज्ञानाची खूण नीट लक्षांत घ्या. डोळा व चंद्र किंवा ढग यामध्यें जी पोकळी डोळ्यापासून चंद्रापर्यंत किंवा ढगापर्यंत राहिली, तेच पोकळी तुमचे ध्यानांत न येतां जी सहज पसरून राहिलीं, तेंच शुद्ध ज्ञान होय. लक्षांत न येण्यापूर्वीची पोकळी हें शुद्ध ज्ञान असले तरी मुद्दाम त्या पोकळीकडे लक्ष वेधल्यानें ती पोकळी निराळेपणानें लक्षाचा विषय बनून आकाश बनते. 'लक्ष ती माया व अलक्ष तें ब्रह्म' आहे. चंद्र पाहत असतां त्यामधील पोकळी तुमच्या ज्ञानात ग्रहण झाली नाहीं म्हणून ते निर्विषय ज्ञान होय. याचे पोकळीकडे वेगळेपणानें त्यास विषय करून पाहिल्यास शुद्ध ज्ञानाचे शून्यांत रूपांतर होते. समर्थांनीं म्हंटलेच आहे कीं, **'वेगळेपणें पाहणें घडे। वृत्ती शून्यत्वी पडे ॥'** आकाश आणि शुद्ध ज्ञान यांत जर कांहीं फरक असेल तर तो हाच कीं, वेगळेपणानें स्वरूपाकडे पाहणें हें आकाश व हे असले पाहणें सोडून देणे हेच स्वरूप शुद्ध ज्ञान होय. येणेप्रमाणें या शुद्ध निर्विषय ज्ञानाची एकवार चांगली ओळख पटली म्हणजे ते कशांतहीं मिसळलेले असो, बरोबर हुडकून काढतां येईल. शुद्ध पाण्याची एकवार जानपछान झाल्यावर त्यांत कांहींहि मिसळलेले असले तरी चटकन पाण्याचा अंश कोणता हें ओळखता येते.

(v) पाणी हे पातळ प्रवाही पदार्थ आहे; पण गोठून बर्फ झाला, पाताळपणा टाकून घनपणा स्वीकारला तरी याहि रूपांत ते ओळखता येते. चिखलांतील ओलावा हा पाण्याचाच अंश म्हणून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ओळखण्यास जड जात नाही. तद्वत् ज्ञान हे शुद्धस्वरूपानें एकवार कळल्यावर या स्थिर-चर जगांत ते आहेपणाने सत्-चित्-आनंद-रूपाने कसे आहे ओळखता येते. शुद्ध पाण्यास रंग, रूप, चव, गंध यापैकी कांही नाहीं हे एकवार कळून चुकल्यावर मग ते पाणी कोणत्याही रंगात मिश्र केलेले असो. ते पाणी बर्फात गोठून कोणतेही आकार धारण करो, ते पाणी मिरचीत जाऊन तिखट बनो किंवा ऊसांत शिरून गोड बनो, किंवा कोलन वॉटर, रोज वॉटर बनून सुगंधीत होवो, कोणत्याही रंगात रूपांत, चवीत व गंधांत पाण्याचा भाग कोणता हे अचूक ओळखतां येते. रंग, रूप, चव, गंध यांची वजा करून बाकी राहिले ते शुद्ध पाणी हे बरोबर समजते. त्याचप्रमाणें व्यतिरेक पद्धतीने उपाधीत मिश्र असलेल्या या शुद्ध ज्ञानाची ओळख उपाधीच्या वजाबाकीनें भागाकारानें (आकारांत भाग पडून) करून घ्यावी म्हणजे सर्वत्र रूपांत तेच शुद्ध ज्ञान कसे ओतप्रोत भरले आहे याची बरोबर ओळख पटतें. व्यतिरेक पद्धतीनें याप्रमाणें ज्ञान होण्यापूर्वी जर कोणी एकदम अन्वय पद्धतींचा अंगीगार करून सर्वाभूतीं परमेश्वर भरला आहे, सर्व घटी राम आहे, जग-जगदीश एकच आहे, अशा वाता मारू लागला तर त्याची ही पापटपत्री कांही कामास येणार नाहीं. उलट "मी ब्रह्म आहे, इंद्रियाची कामे इंद्रिये करितात, मी अकर्ता आहे, माझे ठिकाणीं पापपुण्य धर्माधर्म कांहीं नाहीं;' वगैरे शाब्दिक बडबड करून आत्मप्राप्तीचे ऐवजी आत्मवंचना मात्र होईल. अशाने हे आत्मवंचक इहपर सुखास आंचवून 'आया वैसा गया' या कबीर उक्तीप्रमाणें जन्मले तसे मेले यापरते त्यांच्या पदरात कांहीं पडत नाहीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

(iv) या शब्दपंडितांची शाब्दिक बडबड आत्मानुभवाचे दृष्टिनें

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अक्षरशः बरोबरच असतें; पण ते नितांत निष्ठुर सत्य या अननुभव्यास काय होय! इंद्रियांची कामे इंद्रियें करितात. मी इंद्रियें नव्हें, मनाचे धर्म मनापाशी, देहधर्म देहापाशी त्याचा माझा काय संबंध? 'मी याहून वेगळा' यांत काय खोटे आहे? पण हे सत्य कोणाला? या सत्याचा साक्षात् अनुभव कोणाला? ज्याने आपण कोण हे जाणले त्याला. इतराला त्याचे काय हो! **'ज्याचे सुख त्याला । काय असे भलत्याला ।।'** या तुकोबाचे उक्तीप्रमाणें ज्याचे त्यालाच होय एकदा पोपटासही "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" हे शब्द शिकविता येईल; व तो पोपट त्याप्रमाणें म्हणेलहि म्हणून त्यास ब्रह्म काय, जग काय, सत्य काय, मिथ्या काय, हे समजले असे म्हणतां येणार नाहीं. जिथे कांहीं समजले नाहीं तिथे समजल्याचा आनंदही असणें शक्य नाहीं. असो. साधकानें, शब्दपटू अशा पाखांडयांच्या नादी न लागतां अभ्यासपूर्वक व्यतिरेक पद्धतीनेच प्रथम शुद्धज्ञानाची ओळख करून घ्यावी.

४.६.(i) ज्ञान हे सामान्य–विशेष, सविषय–निर्विषय, सविकल्प-निर्विकल्प अशा दोन तऱ्हेनें नित्यशः प्रतीत होते. सामान्य, निर्विषय व निर्विकल्प हे तिन्ही शब्द समानार्थी समजावें. तसेंच विशेष, सविषय सविकल्प हे तिन्ही शब्दहि वरील शब्दाचे उलट समानार्थीच आहेत. शुद्ध ज्ञानसंवित् डोळ्यावाटे बाहेर पडून ज्यावेळीं बाह्य पदार्थ आपल्यांत ग्रहण करते, त्यावेळीं ते तदाकार होऊन विशेष, सविषय किंवा सविकल्प ज्ञान होते. पदार्थ स्थूल असेल तर सविषय म्हणावे व सूक्ष्म कल्पनामात्र असेल तर सविकल्प म्हणावे. याप्रमाणें शुद्ध ज्ञान हे पदार्थरूप किंवा कल्पनारूप ज्यावेळी होते त्यावेळी ते विशेष ज्ञान या नांवास पात्र होतें. विशेष ज्ञान हे कृत्रिम असल्यामुळे अल्पकाल टिकणारे असेच

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असतें. विशेष हें निःशेष होऊन सामान्य बनलेच पाहिजे, असा नियम आहे. कारण, सामान्य ही सहज अवस्था आहे. उदाहरणा' आपण चालतो ही सहज किंवा सामान्य गती होय; पण सहजगती वाढवून ज्यावेळीं आपण पळतो त्यावेळीं पळणें ही विशेषगती होय; पण पळणार किती वेळ? थोडा वेळ गेल्यावर पळणें थांबून सहजगती जीं सहज चाल त्यावर लवकरच यावें लागतें. त्याच प्रमाणें आपण स्वतः परम प्रेमास्पद आनंदरूप आहो, म्हणून स्वतःचे ठिकाणीं असलेलें प्रेम व आनंद हें सामान्य प्रेम होय. पण ज्यावेळीं मुलाबद्दल, बायकोबद्दल, घराबद्दल व मित्राबद्दल आपणास जे प्रेम येतें ते प्रेम आगंतुक असते. जे प्रेम येते ते जाते. आलेले प्रेम हें विशेष प्रेम असून ते अल्प व नाशवंत असते विषयाचा ठिकाणचा आनंदही विशेष आनंद होय, म्हणून ते अल्प व अल्पकाळ टिकणारेच असतें. अल्प वस्तूचा विशेष अनुभव येतो, व्यापकाचा अनुभव येत नाही. कारण व्यापक वस्तु मोठी असून तेच आपण ब्रह्म होय. विशेष माया व सामान्य ब्रह्म होय. ते आपण असून आपले प्रेम आपल्यास येत नाहीं, किंवा आपला आनंद आपल्यास होत नांही म्हणून विशेष तितके निःशेष झालेच पाहिजे. असो.

(ii) आतां सामान्य, निर्विषय किंवा निर्विकल्प ज्ञान कशास म्हणतात ते पहा. बाह्य स्थूल पदार्थ व डोळा किंवा अंतर सूक्ष्म कल्पना व बुद्धीरूप डोळा यामधील जी फट, जे अंतर जी संधी व जी पोकळी ती ज्ञानास विषय होत नसल्यामुळे आपण ती पोकळी किंवा संधी पाहत असूनही न पाहिल्यासारखी पोकळीचे ज्ञान होत नाहीं. ही मधील पोकळी किंवा संधी शुद्ध ज्ञानच असल्यामुळें ज्ञानास ज्ञान हें विषय होऊं शकत नाहीं म्हणूनच ज्ञानास ज्ञानाचें

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ज्ञान होत नाहीं. गूळास गूळच कसा गोड लागावा? त्याचप्रमाणें ज्ञान हे स्वत:स विषय होऊन जाणण्याचे कार्य करीत नाही. ते जाणीव अगर नेणीवेशिवाय पदार्थ व डोळा, संकल्प व बुद्धी यांचे-मध्यें सहज पसरून आहे हेच ते निर्विषय किंवा निर्विकल्प ज्ञान होय. यासच सामान्य ज्ञान असे नांव आहे. अशा रीतीनें सामान्य व विशेष ज्ञानाचा अभ्यास साधकाने सारखा करीत सर्वा-घटी व्यापकता अनुभवावी.

(iii) हे सामान्य ज्ञान पदार्थ ग्रहणापूर्वी किंवा संकल्पग्रहणापूर्वी आपणातच आपण कसे सहज समावून असते हे वरचेवर पाहत असावे. हे पाहणे मात्र पदार्थ पाहणें, संकल्प पाहणें अशा धर्तीचे नसून, पाहण्याचा भाव व मी पाहणारा हे दोन्ही सोडूनच त्याचे पाहणे घडते. पदार्थ पाहण्याचें हत्यार म्हणजे डोळा व संकल्प पाहण्याचे म्हणजे जाणण्याचें हत्यार किंवा साधन म्हणजे बुद्धी ही दोन्ही हत्यारें बाजूस ठेवूनच ज्ञानाचे पाहणे घडते. डोळा व बुद्धी ही हत्यारें तेथे बोथटच होतात. शुद्ध ज्ञानास डोळ्याचें किंवा बुद्धीचे साधनाने जाणूं जाणें म्हणजेच ज्ञानास विसरून मनबुद्धी येणें होय. '**जया जाणणें हेंचि त्या नेणणें हो । न जाणीतल्या तोचि होतो पहा हो ॥**' असले त्याचे पाहणे आहे किंवा समर्थांचे शब्दांत सांगावयाचें झाल्यास '**तयास भेटो जातां पडे तुटो । न भेटताची होय अखंड भेटी॥**' हा त्यास भेटण्याचा उपाय आहे. ही कोंडी मोठी बिकट असून, मोठ्या शहण्यांची, योगी, त्यागी म्हणविणाऱ्यांची चूक येथेच होते व 'ते दृश्यासच दृष्टा समजतात व तो परमात्मा असा आहे. चतुर्भुज आहे, कोटी सूर्याचे प्रकाशाप्रमाणे आहे, तेज:पुंज आहे, घनसावळा आहे, विदू आहे' अमूक आहे तमूक आहे म्हणून वाटेल त्याप्रमाणें सांगतात पण

Sri Vidyabharathi Book Centre, Srinagar

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अमुक असा, तमुक तसा आहे, हे ज्याच्या योगाने सांगतां आले, हे ज्याने पाहिले त्यास अचुक विसरूनच ते साक्षात्काराच्या लंब्या बाता मारीत असतात. पाहणाऱ्यास विसरून जे कांहीं पाहिले तेच मी, तेच ब्रह्म म्हणून ओरडत सुटतात, त्यास काय म्हणावें हेच समजत नाहीं. "**ब्रह्म पाहो गेला धीट। तो दृश्यानें रोधिली वाट ॥**" अशीच बहुतेकांचीं स्थितीं होते.

(iv) यात्रेच्या गर्दीत माझी माझ्यामध्येच चुकामुक होऊन मी मलाच हुडकून न सांपडल्यामुळे चावडीवर मी हरवल्याची वर्दी दिली. त्यावेळी शिपायाने माझ्या तोंडांत भडकावून ज्यावेळीं गाल लाल केला व विचारले की, "हा कोणरे?" त्यावेळी कोठे शुद्धीत येऊन मी मला सांपडल्याचा आनंद झाला. असाच हुबेहूब प्रकार ब्रह्म पाहण्याकरितां निघालेल्या ब्रह्मरूप जीवाचा झाला आहे. स्वतःच ब्रह्म असून त्याने ब्रह्म कसे व कुठे पहावे? '**अरे जो सर्वांस जाणे। जयासी कोणी न जाणे** ॥' असे असून त्यास जाणण्यास जाणारा स्वतःच जाणीवरूप न जाणतां जर रानोमाळ मी कोठे आहे म्हणून भटकूं लागला तर केवढें आश्चर्य आहे! जाणणें सोडल्यावरच जो जाणला जातो, त्यास काय जाणावयाचें आहे? जाणण्याची हांव सोडून स्वतःचे ठिकाणीं स्थिर झाल्या-शिवाय ब्रह्मज्ञान होणेंच शक्य नाहीं. एका मूर्खाने झोंप कशी असते ती पाहण्याकरितां व तिला पकडण्याकरितां सर्व रात्र जगत बसला! मधून-मधून त्यास झोपेची डुलकीं येई त्या बरोबर त्यास पकडण्याची एकदम आठवण होऊन, "हां! आतां पकडतो." म्हणून दोन्ही हाताची टाळी वाजवी, त्याबरोबर तो खडखडीत जागा होई; असें करूनकरून तो मूर्ख दमला व झोंपेस पकडण्याचे त्याने अजिबात [illegible] दिले. [illegible] तो न कळत गाढ झोपी

Sri Vidyapeetham Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गेला, ब्रह्म पकडण्याची अशीच तऱ्हा आहे. त्याला जाणण्याचे सोडून दिल्यावर सोडून देणारा ब्रह्मरूपच होतो.

(v) स्थूल–सूक्ष्म देहाचा निरास केला त्यावेळीच मन-बुद्ध्यादिक सर्व हत्यारे मोडूनपडून साधक कारणदेहरूपी विसर अवस्थेत जातो. हेच ते जीवाचे अज्ञान होय. हे अज्ञान जाणण्याकरितां ब्रह्मज्ञान करून घेतले पाहिजे म्हणून साधक सूक्ष्म बुद्धीच्या साहाय्यानें व शुद्ध ज्ञानाचे चिदंशाने ब्रह्माचे ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करतो; त्यास शंकराचार्यांनीं महामूर्ख म्हंटले आहे. विटाळशी वाईनें गोमयानें भूमी सारवून शुद्ध करण्यांतलाच हा प्रकार! सारवीत सारवीत ही विटाळशीवाई जेवढी भूमी व्यापीत जाईल तेवढी जागा शुद्ध होण्याऐवजी विटाळानेच दूषित होत जाणार. त्याचप्रमाणें सूक्ष्म बुद्धीच्या मदतीनें ब्रह्म जणू पाहण्याऱ्याची बुद्धी सूक्ष्मदेहाचा प्रांत वाढवीतच राहणार. सूक्ष्म–शरीराचा नाश होऊन कारणशरीरांत आल्यावर त्यापुढील महा–कारणांत त्याचा पाय पडण्याऐवजीं बुद्धीच्या मदतीने ब्रह्म जाणु जाणारा साधक महाकारणांत तर ठरत नाहींच; पण कारण्याच्याहि मागें आढळून सूक्ष्म शरीरांत येऊन पडतो व संकल्प–विकल्पाचे तावडींत पुन्हा सांपडतो. मनबुद्धीचा विटाळ होऊन शुद्ध ब्रह्मज्ञान होते म्हणावे तर मागच्या पंक्तींत वसून जेवणाऱ्या ब्राह्मणाचें ब्राह्मण्यहि कायम राहते म्हणावे लागेल. जेथें वाणीं व मनाचा शिरकाव नाहीं तेथें शब्द व मनाचा उपयोग करून जाईन म्हंटल्यास साधक आपली प्रगति करून न घेतां पुच्छप्रगती किंवा अधोगती मात्र करून घेईल. साधकाला साधकच न राहतां सिद्ध बनावयाचें आहे व तेवढ्याकरितां तर चौदेहाची चौकी ओलांडण्याचा एवढा अट्टहास केला आहे. अभ्यासानें चौदेहाचा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

चौरंग घासून पूसून लख्ख तयार केल्यावरच त्यावर सत्य-नारायणाची स्थापन करणें आहे व तेवढें झाले कीं साधक सिद्ध झालाच म्हणून समजावें.

४.७. (i) चौदेहाचें निरूपण व अभ्यासक्रम आतापर्यंत सांगितला तो साधकांस कळलाही असेल; चौदेहाचा चौरंग तयार केला तरी तो ओबडधोबड तयार होतो. त्यास लखलखीत घोटीव करण्यास थोडी जास्त मेहनत केली पाहिजे. वस्तू तयार करण्याची क्रिया वेगळी व त्यास घोटून गुळगुळीत करण्याची क्रिया वेगळी. घोटण्यानें वस्तु चकचकीत प्रकाशमान होते व ती अशी तयार केल्याशिवाय त्याची पूर्णता होत नाहीं व त्यास फारशी किंमतहि नाहीं. म्हणून सिद्ध होण्यापूर्वी आपण आणखी कांहीं काल साधकच राहून महाकारणांतील शुद्धज्ञान घोटघोटून त्यास पूर्ण उज्वल करूं. या शुद्धज्ञानरूप परमात्मा सर्वांघटीं भरला आहे, हें आपणास कळलें; पण त्यास वळविण्याकरितां चांगला घोटचा मारला पाहिजें. त्यास उपाय म्हणजे आत्म-ज्ञानोत्तर सर्व जीवमात्रांस सुखी करण्याचा प्रयत्न करणें होय. या उपायानेंच आत्मा सर्वांघटी भरला, ज्ञानमयच सर्व जगत आहे. या श्रुतिसिद्धांताचा रोकडा प्रत्यय येतो व आत्मज्ञान पक्के मुरतें सर्व जीवमात्रास सुखी करणें हीच ती ज्ञानोत्तर भक्ती होय. परमात्म्याची सगुण पूजा ती हीच होय. कीडा, मुंगी, श्वान, सूकरापासून तो ब्रह्मदेवापर्यंत अनेक रूपात तोच आत्माराम भरला आहे. निर्गुण, निराकार, अव्यक्त परमात्मा जगतरूपानें सगुण, साकार व्यक्त झाला आहे. स्थिरस्थावरांत तर तो आहेच आहे; पण जर जंगम प्राण्यांत तो स्पष्ट प्रतितीस येतो म्हणून जड, वृक्ष, पाषाण, धातु मूर्ती वगैरे अचेतन पदार्थांची पूजा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करण्यापेक्षां हालत्या, बोलत्या, चालत्या, देवाची पूजा करणें अधिक श्रेयस्कर होय. गुणाचा जेथें रोकडा प्रत्यय येतो ते सगुण होय. दगडाच्या मूर्तींत काय गुण आहेत? सत्व, रज व तम असे तीन गुण आहेत, यापैकी धातु-पाषाणाच्या मूर्तींत काय गुण-आहेत? तेच चलनवलन करणाऱ्या प्राण्यांत या तिन्हीपैकी एक अगर अधिक गुण असतात. सबब हे सर्व प्राणी भगवंताची सगुण रूपेंच होत; सत्वगुणाने युक्त अशा सज्जनांची करुणा भाकल्याने तावडतोब तो प्रसन्न होऊन आपले इच्छित कार्य करतो. तसेच तमोगुणात्मक दुर्जनांचीं निंदा केल्याबरोबर तो आपल्या तोंडात भडकावून सगुण साक्षात्काराचा अनुभव तावडतोब आणुन देतो, म्हणून **'चलता देव पूज ले प्यारे । नहीं पत्थरसे काम ।।** असें कबीरांनीं स्पष्ट शब्दांत चालते बोलतें देवाची सगुण पूजा करण्यास सांगितले आहे.

(ii) पूजा म्हंटल्याबरोबर गंध. अक्षता, फुलें, हळद, कुंकू. अबीर, बुका वगैरे पूजासामग्री ध्यानांत येते; पण पूजा याचा अर्थ प्राणिमात्रास सुखीं करणें असा आहे. ज्या साधनसामग्रीनें जो प्राणी सुखी होईल, ती साधनसामग्री त्यास अर्पण करणें ही त्याची पूजा होय. शंकरास बेलाने आनंद होईल, तर मारुतीस शेंदुरानें संतोष होईल. विष्णूस तुळशी लागेल तर अंबाबाईस हळद-कुंकू लागेल. अनेक देवांची पूजा अनेक विविध प्रकारानीं होतें. एका देवाची पुजासामग्री दुसऱ्या देवास अर्पण केल्यानें त्या दुसऱ्या देवाची पूजा होत नसून त्याची चेष्टाच होईल. सर्वत्र परमात्मा एकच असला तरी उपाधिभेदाने पूजाविधिही भिन्नभिन्न आहेत. गाढवांत परमेश्वर आहे म्हणन गाढवास नुसतें नमस्कार करणें ही त्याची पूजा नसून परमेश्वराची थट्टाच होय, गाढवास

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नमस्कार केल्याने संतोष होतो काय? जर होत नसेल तर पूजा म्हणजें संतोष करणें या व्याख्याप्रमाणें ती त्याचीं पूजा होऊ शकणार नाही. गाढवास हिरवे गवत स्वच्छ पाणी पाजणे ही त्या गार्दभरूपाने नटलेल्या भगवंताची पूजा होय. मनुष्यमात्रास नमस्कार केल्याने तो संतोष पावतो, ही त्याची पूजा होय; पण भुकेच्या वेळी त्यास अन्नाचा प्रत्यक्ष नैवेद्य (नुसते हात दाखवुन नव्हे) समर्पण करूनच त्यास संतुष्ट करणें ही त्या मानव देहधारी परमात्म्याची पूजा होय. सारांश, गाढवाचा चारा माणसास, माणसाचें अन्न गाढवास घालून त्यास संतोषित करूं पाहणें म्हणजे शंकराचा बेल मारुतीस व मारूतीचा शेंदूर शंकरास वाहून त्या देवास प्रसन्न करण्यासारखेच आहे. ज्या ज्यावेळी जें पाहिजे ते दिल्यानेच त्यांचा अन्तरात्मा प्रसन्न होऊन तावडतोब आशीर्वाद देतों. सर्प, विंचू, हेहि नारायणच आहेत; त्याची पूजा दुरून त्यास वंदन करण्यांतच आहे. ' याचा भावार्थ सर्प, विंचू पाहिल्यावरोबर त्यास धरून जर त्याची हळदीकुकुवाने पूजा करण्यास सुरवात कराल तर ते प्राणी प्रसन्न होतील कां? ते म्हणतील, "भक्ता आम्हाला जिवानिशी सोड म्हणजे तुझी पूजा मला पावलीं." सबब त्यांना दुरूनच वंदन करावे म्हणजे त्यांना जिवानिशी जाऊं द्यावें. ही त्यांची पूजा. असें न करतां सर्पास धरून जर त्यास भक्ती-प्रेमाने आलिंगन देऊं जाल तर तो सर्पनारायण कडकडून दंश करील व आलिंगन देणें ही माझी पूजा नव्हे... असा साक्षात्कार देईल.

(iii) येथें कोणी अशी शंका घेईल कीं, सर्प, विंचू न मारतां त्यास जिवे जाऊं देणें ही त्याची पूजा तशी असूं शकेल? ते प्राणी दुष्ट आहेत. त्यांना ठार मारलेच पाहिजे. तर आम्हीं तुम्हास उलट असा सवाल करतो की, सर्प-विंचूस निदान कोणाचा धक्का

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

लागल्याशिवाय ते कोणास उगीचच्या उगीच दंश करीत नाहींत; पण मनुष्यप्राणी त्यास लांब पाहुनच ठार करण्यास उद्युक्त होतो. हा मानवीं स्वभाव, त्या सर्प, विंचूच्या स्वभावापेक्षां अधिक दुष्ट ठरत नाहीं काय? या दृष्टीने मनुष्यप्राणी तरी जगण्यास लायक आहे काय? सर्प, विंचूस मारण्याची भावना तुमच्यांत असल्या-मुळें तुम्हांस मारण्याचीं भावना सर्प-विंचूत आहे. सर्प-विंचू हे प्राणी मत्स्वरूप आहेत अशी भावना दृढ होऊं द्या. मग काय चमत्कार होतो तो पहा. सर्प-विंचूत असलेला आत्मा हा कांहीं दगड धोंडा नाहीं. तुमच्यांत सर्प-विंचूबद्दलचा आत्मभाव पक्का झाला कीं, सर्पांतील आत्माहि तुमच्या आत्म्याशी एकरूप होऊन सर्पाचे ठिकाणीहि तुमच्याबद्दल आत्मीयभाव प्रगट होऊन तुम्हांस दंश करण्याची बुद्धीही त्याचे ठिकाणी उत्पन्न होणार नाहीं. सर्पास सर्परूपानें तुम्हीं जोपर्यंत पाहतां तोपर्यंत सर्पहि मानव देहधारीस शत्रु या भावनेनेंच पाहणार. आरशांत तुम्हीं जसे तोंड करून पहाल तसेच प्रतिबिंब पडणार, यांत आरशांचा काय दोष? स्वतःचा चेहरा हंसरा केल्याबरोबर आरशांतील चेहऱ्यास तूं हंस अशी आज्ञा करण्याची जरूरी पडत नाहीं. चोर आपली चोरी कां करतो! तर आपणही दुसऱ्यास नानातऱ्हेनीं लुबाडून आपलें घर भरावे अशी सतत भावना बाळगतो म्हणून. तेच आपण सर्वस्व त्यागाची भावना जो जो दृढ करूं तो तो आपल्यांतील त्यागभावनेचे प्रतिबिंब आपल्यासमोर येणाऱ्या प्रत्येक प्राण्यांत उठून ते तुम्हीं नको नको म्हणत असतां आपल्या जवळचें असेल-नसेल त्यांचा त्याग करून तुमच्यापुढें ढीगचढीग घालण्यास तयार होतात. जो मागतो त्यास मिळत नाही व न मागेल त्याच्यामागे घ्या घ्या म्हणून लोक [illegible] आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

(iv) या विवेचनावरून साधक गोंधळून जाईल व म्हणेल "महाराज, तुमची विचारसरणी बरोबर दिसतें; पण साप पाहिल्याबरोबर त्यास जिवंत सोडणें किंवा कोणी आपल्या खिशांत हात घालून नोटाचे बंडल काढीत असतां त्यास व सर्पास नारायण समजून उगीच बसणें हे आपल्यास जमणार नाहीं." कबूल. शभर वेळां कबूल. बा साधका, अनेक जन्मीच्या संवयीमुळे हे एकदम साधणार नाहीं. हे अगदी खरे असले तरी प्रारंभ सर्प, विंचूपासून न करता ढेकूणापांसून केला तरी चालेल. ढेकूण न मारण्याचें क्षुल्लक कामगिरीपासून आत्मीय भावना सर्वत्र दृढ करण्याचा अभ्यास करावा व काय अनुभव येतो पहावा म्हणजे त्याहून पुढील व अधिक तापदायक प्राण्यांचे ठिकाणीं क्रमाक्रमानें आत्म-भाव दृढ करण्याचा आत्मविश्वास वाढतो. ढेकूण मारावयाचे नाहीं म्हणून त्यास सोडावयाचे नसून ढेकूण हे मत्स्वरूप आहे, त्याचे सुख तेच माझें सुख. आई आपल्या मुलास स्तन शोषण करू देऊन ते मूल तृप्त होण्यांत स्वतः तृप्तीचा आनंद मानते, त्याच भावनेने ढेकण्यास आपल्या अंगांतील रक्त शोषण करू देऊन आपण तृप्त झालाचा अनुभव घेत राहणें. हा या सर्वात्मभाव पाहण्याचा धड्यांतील ओनामा आहे. अशा रीतीनें हळूहळू अभ्यास करीत गेल्यास कालांतरानें निर्वैर पृथ्वीतल होऊन निर्भयता तुम्हांस माळ घालून सर्व भयापासून मुक्त करील, आत्म-ज्ञान निःशंकपणें साधकास झालें असता तो मुक्त होतो, हे जरी खरे असले तरी मुक्तीचा सोहळा अनुभवण्यास सांपडत नाहीं. श्रीमंती निराळी व श्रीमंतीचें ऐश्वर्य निराळे. एखादा श्रीमंत असूनही कंजूष असल्यामुळें श्रीमंतीचे ऐश्वर्य तो भोगू शकत नाहीं. त्याचप्रमाणें आत्मज्ञानी पुरुषाचे ठिकाणी सर्वात्मभाव न बाणल्यास

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कंजूष श्रीमंताप्रमाणें त्याचें ज्ञान विकास पावत नाहीं व जीतेपणीं त्यास मोक्षसुखाचा आनंद मिळत नाहीं.

(v) आत्मज्ञान झालें तरी सर्वात्मभाव बाणल्याशिवाया त्यास निर्भयता प्राप्त होत नाहीं व पूर्ण आनंद तर निर्भयतेंत आहे. द्वैतांत नेहमीं भय ठेवलेलेच आहे. भय हे मोक्षसुखोपभोगास फार मोठें वावडें आहे म्हणूनच निर्भय होण्यास परमात्म्याची वर सांगितल्याप्रमाणें पूजा करण्यास ज्ञानोत्तर साधकानें लागावें म्हणजे कोरड्या ज्ञानास भक्तीचा ओलावा येतो. ज्याप्रमाणें तुपांत तळून निघालेल्या कोरड्या जिलबीस साखरेच्या पाकांत टाकल्यावर जसा त्यास रसाळपणा येतो त्याप्रमाणेंच **हा कोरडा आत्मज्ञानी ज्ञानोत्तर भक्तीनें पुर्णत्वास पोहोचतो.** सुरफटीच्या खेळांत पहिल्या घरापासूण गडी वरपर्यंत जाऊन पुन्हां प्रत्येक घरांत वरील लोण आणून सोडतो, त्याचवेळीं डाव पुरा होतों. त्याप्रमाणें स्थूलदेहापासून महाकारणापर्यंत चढत जाऊन तेथील ज्ञानाचे लोण पुन्हां खालील सर्व घरांत आणून सोडणें व स्थूल जगतसुद्धां ज्ञानमयच आहे असा रोकडा प्रत्यय घेणें हेच ज्ञानाचें विज्ञान होणें होय. आपल्याहून जगांत दुसरा कोणी आहे अशी भावना आहे म्हणूनच दुसऱ्यापासून आपल्या बायका-पोरांचे व मालमत्तेंचें रक्षण करावें असे वाटून आपण रात्रंदिवस भीतीनें गस्त घालींत असतो व गस्ती ऊर्फ रामोशी बनतो; पण सर्वात्मभाव बाणून सर्वत्र मीच भरलो आहे अशी दशा साधकाचें अंगी येईल त्या दिवशी गस्तीचा अगस्ती बनून त्यास हा भवसमुद्र एका आचमनासही पुरा पडणारा नाहीं. अशा रीतीने निर्भय बनलेला ज्ञानीभक्त **'याच देही याच डोळा। भोगिजे मुक्तीचा सोहळा।'** असो.

(iv) येणेप्रमाणें ज्ञान व ज्ञानोत्तर भक्तीचें निरूपण झालें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

साधक ज्ञानीभक्त होण्यापर्यंतचा पल्ला गांठला, महाकारण-देहांतील ज्ञानाची पूर्णता, आत्मभावनेनें सर्व जगत पाहण्यांत होते. हे सर्व जरी खरें असलें तरी समर्थांनीं महाकारणापलीकडे असलेल्या निश्चल परब्रह्माचें अपेक्षेनें महाकारणांतील ज्ञानास चंचल ब्रह्मच म्हंटलें आहे. स्थूल, सूक्ष्म, कारणशरीर हे दृश्य म्हणून जड, महाकारण ज्ञान हा दृष्टा म्हणून चंचल व चौदेहातील दृश्य-दृष्टयावेगळे असलेले परब्रह्म निश्चल असा निवाडा केला. सबब जे अज्ञान नव्हे व ज्ञानही नव्हें, असा ज्याचा श्रुतीनें "नेति" "नेति" या शब्दानें उल्लेख केला तो निश्चल परमात्मा तेवढा सार, बाकी सारे असार असे दशक ११, समास २ मध्यें समर्थानीं सारसार प्रकरण लिहून निकाल दिला आहे. ज्ञान चंचल कां? तर त्यास अनेक पुरुषवाचक, स्त्रीवाचक व नपुंसकलिंगी नामें आली आहेत. सच्चिदानंद, परमात्मा, ईश्वर, अहंकार दृष्टा, साक्षी शेषनारायण, मूळपुरुष, शिव वगैरे पुरुषवाचक नामें आणि शक्ति, प्रकृति, मूळस्फूर्ती, शांभवी; चित्कला, नारायणी वगैरे स्त्रीवाचक नामें व निजरूप, महाकारण शरीर, शुद्धज्ञान, ब्रह्म, स्वानंदसाम्राज्य, वगैरे नपुंसकलिंगी नामे ज्ञानास आलीं आहेत. यांपैकी एकही जें नव्हें ते सारे निश्चल ब्रह्म होय. महाकारणांतील शुद्ध ज्ञानाची थोरवी खालील जडशरीराच्या अपेक्षेनें कितीही मोठी असली तरी त्या ज्ञानास व्यतिरेकाने गाळून काढतां येते व अन्वयानें पुन्हां मिसळता येते. असा या घाल-काढीच्या विकारी ज्ञानानें साधकास निर्विकार परब्रह्माची प्राप्ती झाली म्हणतां येत नाहीं. जेथें गेले असतां तेथून परत येतां येत नाहीं. असलें हे ज्ञान धाम आहे काय? ज्ञानास ज्ञान हे नांव आहे; पण ब्रह्मास नांव नाहीं. ज्ञानात ज्ञानरूप विकार आहे. मनाची

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

चित्तवृत्ती, अज्ञानवृत्ती जशी आहे तशी ज्ञानवृत्तीही आहे पण ब्रह्म हे निवृत्ती आहे. (वृत्ती म्हणजे अवस्था) ज्ञान ही एक अवस्था आहे. ब्रह्म सर्व अवस्थातीत आहे याप्रमाणें ज्ञान व विज्ञानांत प्रकाश व अंधाराइतकी तफावत आहे. **'चंचल** (ज्ञान) **निश्चलाची** (विज्ञान) **संधी तेथें भांबावते बुद्धी ॥'** या समर्थोक्ती प्रमाणें अखेर फसवणूक येथेंच होतें. ज्ञान कळण्यापूर्वी जसें विसर अवस्थेसच ज्ञान म्हणून फसवणूक होतें त्याचप्रमाणें ज्ञानासच विज्ञान समजून ज्ञान हेंच निवृत्तीपद परब्रह्म म्हणून त्यासच कवटाळून साधकाची गति येथेच खुंटीत होते; पण या ज्ञानास समर्थांनीं स्वप्नांतच जागा होऊन मी जागा झालों म्हणून घोरत पडलेल्या पुरुषाची उपमा दिली आहे. **"तुज वाटे ही जागृति । परि तुझी भ्रांती गेलीच नाहीं ॥"** असा स्पष्ट इशारा दिला आहे. (vii) स्थूल, सूक्ष्म व कारण शरीर हे ज्या महाकारणांत स्वप्नवत् ठरतात ते महाकारण शरीरही विज्ञानांत स्वप्नमयच आहे. अज्ञानांत बंधन व ज्ञानांत मोक्ष आहे; पण जेथें अज्ञान व ज्ञान दोन्ही नाहींत, तेथें बंध-मोक्षाची वार्ता तरी कोठून असणार? महाकारणदेहापर्यंत शास्त्राची मांडणीं असून तेथपर्यंत सर्व पूर्वपक्ष आहे. महाकारणापलीकडील प्रांत सिद्धांतचा असून मांडणीची मोडणी किंवा संव्हारणी तेथें आहे. सर्व मांडणीची संव्हारणी झाल्यावर जें राहिले ते तुझें खरें स्वरूप असून त्याचें वर्णन शब्दाने करणें अशक्य आहे. शब्दज्ञानही जेथें अज्ञान ठरतें, जाणीवच नेणीव होते, सर्व शास्त्रसंमत उपायच अपाय ठरतात, अशा त्या परंधामास महाकारणाचा प्रांत ओलांडून तूं कसा जाशील तें तुझें तूं पहा. उंबरठ्यापर्यंत आणन सद्गुरुनें तुला आंतही ढकलले आहे; पण आंतील मौजा मात्र सद्गुरु तुला दाखवूं शकत नाही.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ते सुख तुलाच लुटलें पाहिजे. यापुढें सांगण्याचे कांही शिल्लक राहिले नाहीं. सांगावयाचे तेवढे शब्दानें सांगितले. सांगता येत नाहीं ते तुझ्यावर सोंपविले. तुला साधक करतां येईल; पण सिद्ध तुलाच झाले पाहिजे. याठिकाणी **आला ग्रंथाचा शेवट । सरली शब्दांची खटपट । येथें सांगितले स्पष्ट । सद्गुरु भजन ॥**

हरिः ॐ तत्सत्

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आत्मज्ञानाची गुरुकिल्ली

भाग २

अर्थात् "विज्ञानबोध लहरी"

१ निश्चयाचें बळ

(चाल: आर्या)

लौकिक वहु संपादी परि नाहीं अंतरांत जो जागा ।
शरीरांत देव आत्मा जो नेणें आत्मघातकी तो गा ॥१॥
साधी आत्मज्ञाना लौकिक येईल काय कामाला ।
जन वंदन ज्याला करिती आज, उद्या तेच निंदिती त्याला ॥२॥
मी देव म्हणूनि पूजिला देहाला जाणा आत्महत्या ती ।
म्यां म्यां करितें बकरें त्यांसि बळि देवतेपुढें देती ॥३॥
जो भजतो शरिराला तो पुनरपि येणें शरीर घेवोनी ।
आत्माराम भजे तो आत्माची त्यास येईना योनी ॥४॥
जो ज्यास भावनेने भजतो रूप तेंच तो घेई ।
पेरील बीज तैसें हाताला जाणा तेंच तो येई ॥५॥
लागे एकचि जरि ते भूत कशा करवितेच चेष्टेला ।
मग पंचभूत लागे काय करील नेम ना मुळीं त्याला ॥६॥
नसते मनीं भरवुनीं म्हणति "कसें बनविलेच साल्याला" ।
तैसे "मी" मायेनें बनवील रावरंक ब्रह्माला ॥७॥
"मी" नेंच जगत् सारें ब्रह्मादि कीटकांस बनविलें ।
ब्रह्मचि असुनी त्याला पापात्मा पुण्यवानही केलें ॥८॥
एक गरोदर विंचू मारियल्या मरति सर्वही पिल्ली ।
"मी" भाव मारितांची जाई सकल द्वंद्व ही 'गुरुकिल्ली' ॥९॥
आप मरे फिर दुनिया डूब गयी हा जाण सत्य सिद्धांत ।
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
मीपण गेल्या जाई त्यापरिरें काल्पनीक तें जगत ॥१०॥

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अज्ञान, जीव, माया वृत्तीं ती कल्पनाच 'मी' आहे ।
आई, भगिनी, मामी, पत्नी बहु नाम एक स्त्री आहे ॥११॥
भाई खुदा सुमरना खुद्द असे तोचिरे खुदा जाण ।
आपण शिव होवोनी यजन शिवाचें करी खरें भजन ॥१२॥
देवासी न विभक्ति भक्ती तेंची अनन्य तें शरण ।
नोहे अनन्य लक्षण जोडी कर दोन होऊनी दीन ॥१३॥
केल्याविण उच्चारा नांदे सर्वत्र तो 'अहं ब्रह्म' ।
उच्चार अहंतेचा करितां जीवभाव येतसे ठाम ॥१४॥
वस्तु होऊनि ठेला संशय ब्रह्मांडाबाहिरी गेला ।
साधू निःसंगवत, स्वर्ग-नरक पाप-पुण्य ना त्याला ॥१५॥
आत्मज्ञानाविणे केले जरि काय, काय हो झाले ।
आत्मज्ञानानंतर केले जरि काय, काय हो झाले ॥१६॥
जीवीशि लग्न झालें पोरें झालीं बहुत स्वप्नांत ।
उठतांच जिवी गेली राजाचे मूल बाळ ते सात ॥१७॥
उठल्यावरि मग स्मरला राजा जैसाच स्वप्नसंसार ।
आत्मज्ञानानंतर "मीचा" स्मरतांच पूर्वसंस्कार ॥१८॥
स्वप्न असें पण अपुले मिथ्या स्मरलेहि काय ती हानी ।
मी ब्रह्म हाच निश्चय असतां अपरोक्ष तेच दृढ मानी ॥१९॥
निश्चय ऐसा होता रक्ताचा बिंदू एक ते रोम ।
जाळुनि चिरुनि पाहिल त्या शास्त्रज्ञास वदति आम्हीब्रह्म ॥२०॥
निश्चयबळ जें तेंची फळ वदला निश्चयें तुकाराम ।
निश्चय दृढ दत्ताचा चरणावरि **सिद्धराम** परंधाम ॥२१॥

२. संगत्याग

संग त्यजावा म्हणतां सोडनि घरदार-पुत्र-पत्नीला ।
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
वन सेविलें जयानें परि तो निःसंग कायरे झाला ॥१॥

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संग न याचा जडला ते जड तुजहून दूर आहे ती ।
ते न वेगळां तव पडती परि बाहेरे तुझीं तुला भीती ।।२।।
घरदार विषय सारे काय बिचारे तुला सतवतील ।
उलटे सुखासि कारण संग तुझा सोडतांच होतील ।।३।।
गेला दूर वनाला किंवा मसणांत ते तुझ्या पाठी ।
त्याचा संग न गेला तोवरि वहुफोल साधनें कोटी ।।४।।
घर जातां मठ आले अन्न सुटे खाशि कंद-फल-मूळे ।
वस्त्रें नसतां छाटी, पुत्र नसे जमति भोंवती चेले ।।५।।
न सुटे संग अशानें रूपांतर मात्र हें खचित होई ।
जोंवरि सद्‌गुरूबोधे उमजेना फुकट सर्व ते जाई ।।६।।
गेला शुक भेटीला जनक विदेहीघरा फजित झाला ।
कारण त्याग कशाचा करणें हें समजलेंच ना त्याला ।।७।।
योगींद्र, ब्रह्मचारी, ज्ञानाचा मूर्तिमंत तो पुतळा ।
वैराग्यनिधी केवल, परि संगानेंच शुकमुनी फसला ।।८।।
'जा' सेवकास वदला "शुक आला म्हणूनि सांग जनकाला" ।
रायें उत्तर दिधले "होय सुखी संग सोडूनी बाळा" ।।९।।
कडदोरा, लंगोटी फेंकी शुक जानवेंहि ते तोडी ।
जा सेवकासि वदला "शुक तोडीं सर्व संगतीबेडी" ।।१०।।
सेवक तसेंच वदला "शुक तोडीं सर्व संगबेडीला" ।
पुनरपि उत्तर आले "होय सुखी संग सोडूनि बाळा" ।।११।।
उरला काय आतां तो संग विचारांत शुकमुनी पडला ।
हो! हो! असें बरोबर मी तो शुक बोललो खराच खुळा ।।१२।।
जा सेवकास बदला सांगें जनकास "ब्रह्म आलों मी" ।
सेवक वदला राया "आलों मी ब्रह्म" शुक वदे स्वामी ।।१३।।

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आला निरोप तोचि "होय सुखी संग सोडून बाळा" ।
ऐकूनि प्रकाश पडला शब्दा सोडून मूक शुक झाला ॥१४॥
त्याने विचार केला आला आला गेलाच तो कलीपुरुष ।
मी ब्रह्म सर्व व्यापक येणें जाणे नसें मला सोस ॥१५॥
"मी मी" कल्पित मिथ्या संग मला ग्रहण आत्मसूर्याला ।
शुकही "मी" ब्रह्मही 'मी' केला 'मी' नेंच सर्व घोटाळा ॥१६॥
उमजुनि ऐसें बसला जेथें होता तिथेच शुक मौनी ।
स्वानंदपदीं रमला "मी" वृत्तिचाच संग टाकोनी ॥१७॥
पाहुनि ऐसें त्याला जनकाला तोष की बहु झाला ।
मग फार आदरानें आलिंगुनि त्यास जवळि बैसविला ॥१८॥
बहु त्यास राजभोग देऊनि राये परीक्षिलें पूर्ण ।
त्यागी अथवा भोगी शुक रमला तो निवृत्ती परिपूर्ण ॥१९॥
सेवि पूर्ण निवृत्ती टाकुनि "मी" भाव-वृत्तीचा संग ।
प्रभु सिद्धरामबोधें दत्तात्रय जाहला निःसंग ॥२०॥

शब्दांतील अनिर्वाच्य

मी अमुक असें बुद्ध्या सांगे तो तोतया खरा जाण ।
सांगत न सुटे मी ती अमुक तोतया सत्य त्या करा नमन ॥१॥
मी सत्य ब्रह्म ऐसें बोले तोतया असें 'मी' ही ।
ब्रह्म न बोले कांहीं मी सत्य कि अमृत यांतले कांही ॥२॥
जड जंगम जे प्राणी मूक आम्हीं अमुक ते न कीं वदती ।
शब्दांतील सदोदित यास्तव सहजीच ब्रह्म ते असती ॥३॥
सुरवात शब्द जेथें तो कल्पित प्रांत खास समजावा ।
वेद जरी मग बोले त्याचाही शब्द अमृत मानावा ॥४॥
साक्षी, ब्रह्म, निरंतर, निर्गुण, आनंदरूप वेद वदे ।
ते परि मायिक ईश्वरविषयाचा बोध वेद वदे शब्दे ॥५॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

स्वरूपाविषयीं वेदही मूक गिळे तो म्हणें न तें अमुके ।
न इति न इति बोले कारण की अन्य शब्द सर्व फिके ॥६॥

जाणुनि जें जें वदनें तें तें येईल सर्व ज्ञानांत ।
ज्ञान नसे विज्ञानीं मी अमुका लेश ना त्यांत ॥७॥

ब्रह्म 'अमुकसे' म्हणतो आता मोठा लबाड तो जाणा ।
'मी ब्रह्म देखिलें' जो बोले तो अंध वा असे कोण ॥८॥

सर्व खलु ब्रह्म इदं, जाणुनि मग बोलला जयी कांहीं ।
आजीस म्हणे आज ब्रह्माला जग विनोद मग पाही ॥९॥

ब्रह्माशिवाय दुसरे जगती या अनुभवास येत नसे ।
म्हणशी दुसरे कांहीं मिथ्या ती कल्पनाच ठाम असे ॥१०॥

नाना पदार्थ रुचिला घेऊनि प्रत्यक्ष भोजनी घाला ।
अनुभव नंतर सांगे नसतां रसस्पर्श जीभ तोडाला ॥११॥

भोक्ता भोग्य तसेचि भोग नसुनि बोलतोच अनुभव तो ।
त्रिपुटीविण हा अनुभव तो स्वरूपाचा साधकां तसा होतो ॥१२॥

वाक्यार्थ **तत्त्वमसि**चा ज्ञानसमयिं जीव शिवचि आहे ।
ब्रह्म पहा विज्ञानी जीव न शिव ते असे तसे आहे ॥१३॥

ऐसा अनुभव ज्याशी स्वरूपाचा तो असे सदा मौनी ।
मौन न भंगे त्याचें बडबडला कांहिंहीं दिवस रजनी ॥१४॥

मौन महापुरुषाला स्वरूपाविषयीं अबोलणें साजें ।
सिद्धांत क्षुद्र कल्पित पुरुषाचे तोंड ते सदा वाजें ॥१५॥

ज्याला कांहीं न म्हणतां येई म्हणोनीच ते 'अनिर्वाच्य' ।
या शब्दें श्रुति वर्णी शब्द न ते शब्दस्तब्धता साजें ॥१६॥

आहे तितुके नाही नाहींपणें निमाले ही ।
आहे नाहीं जाऊनी नसुनि [illegible] ब्रह्म [illegible] ॥१७॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दत्तात्रय जरि बोले सत्ता ती बोलण्यास त्या कैंची ।
बोलविता धनि त्याचा सद्‌गुरु **श्री सिद्धराम** ईश्वरची ॥१८॥

४ सविकल्प-निर्विकल्प ज्ञान

सविकल्पाचें तैसें ज्ञान दुजें निर्विकल्प जाण मनी ।
आत्मज्ञानहि झाले विक्षेपाचेच असति बहुत धनी ॥१॥
दो भागी उजळावी उंबरठ्यावरील दीपिका ज्योतीं ।
आत्मा स्फुरतो तैसे देह स्फुरे साधका द्विधाच मती ॥२॥
सविकल्प यास म्हणती विक्षेपाचे जिथें असें वसती ।
सरतां सर्व विकल्पहि दृढनिश्चय होय आत्मनिष्ठा तीं ॥३॥
आत्मत्वी दृढनिश्चय यासी अपरोक्ष निर्विकल्प म्हणे ।
मी देह असें चित्ती तुमचे क्षण एक कालही कवणे ॥४॥
संशय निजरूपाचा तिळहि मनीं जोंवरी तुझ्या वागे ।
झाले आत्मज्ञानहि लौकिक सविकल्प भूत तुज लागे ॥५॥
सद्‌गुरुबोधें होई आत्म्याचें ज्ञान तेचि सविकल्प ।
म्हणती कृपा तयाला दृढ ठसणें संशयी नुरे अल्प ॥६॥
सविकल्प आत्मज्ञान गुरुबोधें साधकां लाभे मुक्ती ।
त्याउपरी सद्‌गुरुची पूर्ण कृपा निर्विकल्प ही भक्ती ॥७॥
संकल्पशून्य स्थितिला पूर्ण समाधीच निर्विकल्प असे ।
वदती बहुजन वेडे काष्ठ अवस्था, अशीच काय नसे ॥८॥
जोंवरि देह मनाचें असणें संकल्प तोवरी बापा ।
संकल्प-विकल्पहि ते उत्थानीं चुकत ना तया बापा ॥९॥
संकल्प-विकल्पहि ते असति मनोधर्म दुष्टसुष्ट तसे ।
उठले किंवा निमले तूं निर्मल स्पर्शतील तुज कैसे ॥१०॥
तैसे स्थूल शरीरें घडले व्यापार चांगभलतैसे ।
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
शरीराचा तुज नाही कांही संबंध होऊं होत जसे ॥११॥

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विमल म्हणति या ज्ञान शुद्ध परम निर्विकल्प परिपूर्ण ।
दत्त म्हणें मग सारे मिश्र शबल द्वैत पूर्ण अज्ञान ॥१२॥

५. भ्रांतीकृत चमत्कार

मरना सब कोई कहे मर जाने ना कोई शरीरमध्ये ।
ऐसा मरजानारे फिर जनम होय ना, कबीर वदे ॥१॥
मस्तक प्रभुचरणावरि वाहि तरी तीं घडे महापूजा ।
मरण असे हे 'मी' चे मिथ्या जाणुनि सांड 'मी माझा' ॥२॥
ब्रह्मचि पाहों जाती परि 'मी मी' म्हणूनि हुंबरे कोण ।
याचा शोध न घेती भेटे नच ब्रह्म गेलिया प्राण ॥३॥
दोरीवर साप नसे साप जयें भासला तये वेळां ।
मीपण ब्रह्मीं नाहीं केव्हांहीं समजुतींत घोटाळा ॥४॥
आपण कोण पहावें आत्मनिवेदन तयासची म्हणती ।
नाही आपण कोठें ब्रह्मचि तें ऐकलें पहा जगतीं ॥५॥
देव पहाया गेला देवचि तो भक्त होऊनी ठेला ।
'मी' स पहाया गेला ब्रह्मचि मी होऊन स्वयें बसला ॥६॥
नव्हते आकाश पाणी भक्त पुरातन प्रभूच स्वयमेव ।
आधीचे आधीचें देवाही आधीचे आम्हीं देव ॥७॥
ब्रह्माविष्णूमहेश्वर अमुची हीं लेकरेच वृत्तीची ।
आम्हीं पूर्ण निवृत्ती आम्हांशी जाणती न ते साची ॥८॥
ब्रह्मा म्हणजे बुद्धी, विष्णू हा अंतकरण, तो शंभू ।
रूप अहंकाराचे याहुनि मी वेनळा स्वयंभु विभू ॥९॥
शंभू शंभूपणानें विष्णूही विष्णुपण सदा मिरवी ।
ब्रह्मा ब्रह्मपणानें मी पण घेताच आत्मपद हरवी ॥१०॥
मीपण गेल्या वृत्ती मिथ्यात्वें, मग उरें निवृत्तीच ।
भोगुनि सहस्त्रनारी कृष्णासम ब्रह्मचारि तो साच ॥११॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कळे नारदाप्रमाणें लावित फिरला तरी निवृत्ति तो ।
जनकासम भोग घडे करितां सदा निवृत्ति तो ॥१२॥
निद्रा तीच समाधी त्याची मग जेवलाच उपवाशी ।
अंघोळ तीर्थ त्याचे पद ठेविले पुण्यभूमि ती काशी ॥१३॥
'असि' पद जितुके जगती ते आहे रूप ब्रह्माचे ।
जरि पाहशील नेटुनि वगळुनि ते दृश्य नामरूपाचे ॥१४॥
सोन्याचा खंडोबा सोन्याचें श्वान उच्चनीच दिसे ।
हीच करामत 'मी' शी वस्तू दोहींत एक हेम असें ॥१५॥
दृश्य सकल हे निर्मी वांझेचे कारटेच जो हा 'मी' ।
बंदुक तोफा ठरती वृत्ती 'मी' मारण्यास कुचकामी ॥१६॥
वृत्तीचा ना उठावी होईल तेंव्हां निवृत्ती पदलाभ ।
म्हणतो ऐशा मूर्खा होईल मग त्यास मरण विक्षोभ ॥१७॥
देह असोन विदेही होय निवृत्ती असोनि ती वृत्ती ।
परिवार सर्व असतां राजा करि राज्य तो जसा रीती ॥१८॥
बोलत चालत असतां मूर्छित नसतांचि ती निवृत्ती लाभे ।
एकचि उपाय याला मिथ्या तीं जाणतांच वृत्ति दबे ॥१९॥
मरण तरी मी माझें पाही ऐसे वदे तुकावाणी ।
राहुनि जीवंत आपण मिथ्यापण मीपणास तो आणी ॥२०॥
हेच मरण ते 'मी' चे तो मायात्याग निश्चयें जाण ।
होतां बुद्धीपालट माया असूनि नसे तिला प्राण ॥२१॥
म्हणशी स्तब्ध बसू या, परि बसणे मूकवृत्तिचा भाग ।
आप बसे व्हां साहिब नाहीं निवृत्तिपदाहि तो लाग ॥२२॥
म्यानांत एक जैसे दोन कधीं राहती न तलवार ।
तैसे मीपण तेथें न वसे ब्रह्मत्व हाच निर्धार ॥२३॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मी देहभाव जाऊनि 'ब्रह्म अहं' तोही वृत्तिची खोडी ।
मीपण तेथें नांदे लोह अहो हेम एक ती बेडी ॥२४॥
एकचि ती 'गुरुकल्ली' देऊन तुज ठेवितो गुरुपुत्रा ।
निवली वृत्ति जयाची मिथ्यात्वें, तो खरा असे ज्ञाना ॥२५॥
परिसाच्या संगानें झालें लोखंड तें भांगार ।
हेमासि करूं जाता लोह पुन्हा होईनाच साचार ॥२६॥
तैमे सद्गुरुसंगे जाऊनि जीवशिव ब्रह्म होय स्वयें ।
मग देहबुद्धी घेईन म्हणतां मी ती पुन्हा न घेतां ये ॥२७॥
जाणुनि संत महत्वा मागितलें दोन एक तुकयानें ।
"नलगे धन मुक्तीला सत्संगचि दे" प्रभूला हा स्तवनें ॥२८॥
मग पाहतो तसा तूं फिरविसी मज जन्ममरण फेऱ्यांत ।
"घाल सुखें मज गर्भी" तुकयाचा गर्भितार्थ हा होत ॥२९॥
ज्यास कळे ही बोली 'मी' च्या अंती तुझीच तुज प्राप्ती ।
नाही गती-अनगती मति तैंसी ती गती तुझ्या अंतीं ॥३०॥
अंत चहू देहांचा नश्वर त्या तीन प्रथमाच्या मुक्ती ।
सायुज्य एक घरची अविनाशचि मुक्तींवरील ती भक्ती ॥३१॥
सरले स्वप्नचि 'मी' चे आली ती जाग्रती पुन्हां मजला ।
ब्राह्मण स्वप्नी झाला अंत्यज उठतांच तो पुन्हां पहिला ॥३२॥
आज जन्म-मरणी सुटला अद्वैताचेहि द्वैत से गेलें
गेला निःसंगाचा संगचि होचेंच ते पुन्हां झालें ॥३३॥
अमरासि अमर केलें मोक्षाला मुक्तीलाभ तो झाला ।
निर्गुण निर्गुण झाला निर्मळ जो त्यावरील मूळ गेला ॥३४॥
सारा प्रताप 'मी' चा त्याचा हा भ्रांतिचा चमत्कारा
दत्तात्रयासि कथिले गुरुदेवें त्यास असो नमस्कार ॥३५॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असुनि अनाम तुजला शंकर हें नांव कल्पिलें 'मी' नें ।
पार्वतीपति कीं पुसतां गाळण उडतें तुझीच भीतीनें ॥१॥
व्यवहारीं ओळखाया नां तुझें ठेविलेच नांवाला ।
दृढ घेता अभिमान ज्ञानी-जन ठेवितील नांव तुला ॥२॥
ब्रह्म तरी तूं अससी सोडित ब्रह्मत्व म्हणसि न सुटे रे ।
मीपण घेऊं जातां नाहींच मग सांपडेल कैसे रे ॥३॥
अससी शूर जरि तू काढी शोधून 'मी' कुठें चोर ।
आजवरी न कुणाला सांपडला शोध हा करी थोर ॥४॥
हा 'मी' जरि सांपडला होईल भारीच मौज जगतात ।
एकत्वाचा थोरा मिरवितसे ब्रह्म, जिरवि तूं तात ॥५॥
परि दुर्दैव तुझें कीं सांपडतो 'मी' न कोटि कल्पांत ।
नाहीं इलाज म्हणुनीं समरसुनी जाई तूंच ब्रह्मांत ॥६॥
आहे म्हणतां आला चालुनि घरि जेवि 'रंगीचा नवरा'* ।
नांही म्हणतां गेला 'मी' चा ऐसाच खेळ हा सारा ॥७॥

रंगीची गोष्ट

* अगदीं लहानपणीं एक रंगो या नावाच्या मुलीचा नवरा बेपत्ता झाला होता. पुढें १०-१२ वर्षांनीं रंगीच्या गांवातच एक देऊळ होते. तेथें एक पांथस्थ उतरला होता. तो रंगीच्या नवऱ्यासारखा साधारणपणें दिसत होता. त्यालाच तो स्वतः "मी" नाहीं नाहीं म्हणत असता त्या गांवच्या सर्व लोकांनीं व रंगीच्या आईबापानीं रंगीचा नवरा ठरवून घरीं त्याला जबरदस्तीनें नेऊन ठेवलें. त्यालाही आयतेच कनककांतेचा फुकटचाच लाभ झाल्यामुळें तो आल्या भोगास सादर झाला. पुढें त्याला रंगीपासून मुलेंबाळें झालीं. त्यानंतर कांही दिवसांनी खरा रंगीचा नवरा आला. त्यावेळी खुणाखुणा पटल्यावर तो त्या रंगीच्या नवऱ्यास "तूं रंगीचा नवरा नव्हेस" म्हटल्याबरोबर तो म्हणाला "मीं नाहीं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निस्तेज ग्रहणकालीं असुनी तें चंद्र सूर्य दैदिप्य ।
राहू केतू गिळती व्यापुनि करि निर्व्यापकांस कीं व्याप्य ॥८॥
तैसे 'मी' चे करितां ग्रहण लपे आत्मसूर्य काळोखीं ।
इच्छा इंद्रियरूपी चंद्रहि तमपूर्ण होय अवलोकी ॥९॥
राहू तोच असे 'मी' केतू तो तो तूंच कीं असे बापा ।
'मी' 'तुं' पण हे जातां ग्रहण सुटे हरुनि सर्वही तापा ॥१०॥
तत्त्वीं सांपडतांची 'कोऽहं' ज्ञानांत 'मी' म्हणे 'सोऽहं' ।
तो 'मी' च दोन ठायीं विज्ञानी 'कोण मी' नसे सोऽहं ॥११॥
जीवा विकल्प म्हणती, सोहं मी ब्रह्म जाण संकल्प ।
कोऽहं सोऽहं म्हणतों कांहीं जाई न मीपणा अल्प ॥१२॥
जोंवरि मीपण नांदे तोंवरि जरि बोलला मुनी योगी ।
जीवन्मुक्त विदेही म्हणतो ते सर्व 'मी' च भवरोगी ॥१३॥
माया ती हीच असे मायेच्या थोर अजबखान्यांत ।
पडले तऱ्हेतऱ्हेचे पशु हे समजोनि आपणा मुक्त ॥१४॥
कीटक कोळी पावे बंधन आपुलेच निर्मुनी जाळें ।
आपण मीपण कल्पुनि आपुलेची तोंड करवितो काळे ॥१५॥
ग्रहण सुटे जरि "मी" चें आत्मा मी सर्वरूप हेंच कळें ।
"इच्छा इंद्रिय विषयासह आपण" ब्रह्मबोध साच फळें ॥१६॥
"मी" नाहीं हे कळतां आहे तें ब्रह्म सहज तूं आता ।
सामान्य ब्रह्म घेई देहमनाचे विशेषपण आतां ॥१७॥
'निजला तोचि पळाला तोचि वसे तोचि कीं असे उठला ।
रडला हंसला तरि तो एकचि नर एकपणा नसे मुकला ॥१८॥

नाहीं म्हणत असतां तुम्हीच मला रंगीचा नवरा बनविला आतां नाहीं म्हणतां तर नाहीं चालली वापडी" असे म्हणून तो निघून गेला.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तैसाचि तूं अगोदर सामान्यत्वे, विशेषपण घेशी ।
गोचर मनबुद्धीला देहानें सगुण तूंच अवतरशी ॥१९॥
पूर्ण निवृत्ती अथवा येऊनि वृत्तींस घेशि आनंद ।
सामान्य विशेषत्वें अगुण सगुण दत्त एक गोविंद ॥२०॥

७ वृत्तीमुळेच निवृत्तीची सिद्धी

वृत्ती अन्याविषयीं करितां नोहे विघाड स्वरूपांत ।
स्वरूपीं वृत्ती धरितां होय निवृत्तींत थोर आघात ॥१॥
जैसा सूर्य इतरां प्रकाशितां सूर्यपणें असें परिपूर्ण ।
तोचि स्वामी प्रकाशूं जातां होतसे पूर्ण असुनि अपूर्ण ॥२॥
जैसा डोळा अन्यासी पहातां देखणा असे पूर्ण ।
तोचि डोळा डोळ्यासी पाहूं जातां अंध होतसे संपूर्ण ॥३॥
अन्याविषयीं वृत्ती हीच असे खूण ती निवृत्तीची ।
फळफूलपर्ण असतां झाड असे ठाम जाण जीवाची ॥४॥
लाट दिसे तरी खाली आहे गंभीर जलनिधी उमज ।
आधार निवृत्तीचा ये वरती वृत्तिलाट कीं सहज ॥५॥
धूर दिसे तरी अग्नी, आहे याचा न संशयी कांहीं ।
येता अनंत वृत्ती होई निवृत्तींच उघड की पाही ॥६॥
धूर नव्हे तो अग्नी, पाण्याचा फेसही नव्हें पाणी ।
वृत्ती नव्हे निवृत्ती हा मोठा भेद तूं मनीं आणी ॥७॥
वृत्ती तीच निवृत्ती पाण्याची लाट नीरची आहे ।
भाव तयांतुनि निघतां एकचि दोन्हीपणें विलासताहे ॥८॥
शोभाच उलट येई, काय अलंकार झाकि हेमाला ।
वृत्तीमुळे परमात्मा काय निवृत्तीमधोनियां ढळला ॥९॥
एकपणा नच ढळतां दोनपणें ये विलास बहु करिता ।
या कारण परमात्मा वृत्तिमुळें दोन जाहला आतां ॥१०॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सूर्याचे किरण नसे भिन्न तयाहूनि तोच ते असती ।
अंगस्वभाव तयाचे त्याला सोडोनि तें कुठें जाती ॥११॥
वृत्तीचे भाव तसे नानाविध सोडुनि निवृत्तीला ।
जातील कुठें सांगा यमनियमें बहू प्रयत्न जरि केला ॥१२॥
यास्तव आवरशी कां वृत्तीला त्या शठो निमो सहजी ।
तूं तरि पूर्ण निवृत्ती पद ताणुनि पाय आपल्या शेजीं ॥१३॥
मीपण मिथ्या करुनि संचित प्रारब्ध आणि क्रियमाण ।
नाही ऐसें केलें दत्ताचा **सिद्धराम** गुरु जाण ॥१४॥

८ तत्त्वविचार

सातचि तत्त्वे असतीं बनले जग देह तत्त्वगांठोडे ।
त्यांतचि मीपण नांदे गांठोडे सोडतां सुटे कोडे ॥१॥
भू, जल, तेज, समीर, खं भूतें हीं पांच तत्त्व चैतन्य ।
ईश्वर तेच सहावे ब्रह्म असे सातवे नसे अन्य ॥२॥
स्थूल शरीरे जितुकीं सूक्ष्म मन-प्राण पंचभूतांचे ।
चेतन आत्मा वसतो ब्रह्म अधिष्ठान जाण सकलांचे ॥३॥
याविण अन्य दिसेना गांठोडें सोडतां दुजें तत्त्व ।
वहु शोधिले कुठें "मी" या माजी सांपडे अस्तित्व ॥४॥
"गांठोडे" शब्द वृथा गांठोडे काय ही असे चीज ।
उकलुनि पाहूं जातां गांठोडचाचे न सांपडे बीज ॥५॥
गांठोडचांतील वस्तू वस्तूमाजीं मिळोनिया जाती ।
पंचतत्त्व पावल्यावरि गांठोडे हरवले असे म्हणती ॥६॥
नाहीच मुळीं जें तें हरपे ऐसें कसें म्हणो येई ।
आहे तत्त्व तयाचे रूपांतर मात्र मरण त्या नांही ॥७॥
सात जरी तीं तत्त्वें ब्रह्मचि तें एक तत्त्व तूं जाण ।
एकात एक जाऊनि शेवट उरलेंच ब्रह्म परिपूर्ण ॥८॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भू पाण्यांत समावे पाणि तेजांत तेज समिरांत ।
वारा नभीं विरे नभ चेतनतत्त्वांत तेहि ब्रह्मांत ॥९॥
जन्म–मरण मग कोणा या जगती सांगरे विचारोनि ।
'सर्वं खलु ब्रह्म इदं' आपण म्हणुनि उरेचि ना कोणी ॥१०॥
आपुलीच कल्पना ती घडवी आपणास ती जशी करितो ।
आपण जीव म्हणो तरी जीवाची, जरि ब्रह्म ब्रह्मची होतो ॥११॥
योगी त्यागी भोगी संत महंतादि देव दानवहीं ।
आपुल्याच कल्पनेनें बनविले लोक तीनही पाही ॥१२॥
कल्पतरु तू अससी चिंतामणि चिंतनशील ते होई ।
सत्ता तुझीच तूं कीं जन्म-मरण बंध–मोक्षदाताही ॥१३॥
वंध्येस मुले देती साधू खाऊन भाकरीभाजी ।
प्रारब्ध नष्ट करिती लेखावर मेख मारिती कींजी ॥१४॥
जेउनि तृप्तचि झाला तोंडानें बोलतांच उपवासीं ।
त्यास क्षुधेची पीडा होईल मग सांगरे तरी कैसी ॥१५॥
निजबोधानें तृप्ती पावुनि मी जीवही जरी म्हणशी ।
काय तुझी ती हानी जाणोनी पूर्ण वेड पांघरशी ॥१६॥
साप नव्हे ही दोरी जाणुनि मग साप म्हणुनि बोंवलला ।
अज्ञाना भय त्याचे होतील रे गुदगुल्यापरि तुजला ॥१७॥
तैसे 'आपण नाहीं ब्रह्म सकल' तत्त्व निश्चये कळतां ।
लवही बोध मिळेना मी माझे लोकरीतिनें म्हणतां ॥१८॥
आत्मज्ञानहि झाले संवयीनें देहबुद्धि डोकावे ।
अनुसंधान निरंतर स्वरूपाचे म्हणूनि नित्य राखावे ॥१९॥
म्हणशील ब्रह्म जरी मी बोले त्यापरि घडेना कां खास? ।
कारण शोधूं जातां नाहि तुला पूर्ण आत्मविश्वास ॥२०॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आत्मज्ञानानंतर विक्षेपाचा करावया नास ।
मीपणविरहित सांगे दत्तासी **सिद्धराम** अभ्यास ॥२१॥

९ ज्ञानभक्ति–भेद–अन्वय–व्यतिरेक

कोण मी जाणणें आत्मज्ञाने । सर्व मी जाणणें ब्रह्मज्ञाने ॥
आत्मज्ञानें व्यतिरेक सिद्ध होई । ब्रह्मज्ञाने अन्वयीं ऐक्य पाहीं ॥१॥
आत्मज्ञानी तो नव्हे ब्रह्मज्ञानी । कसा आंबा कयरी एक मानी ॥
जात दोघांची भिन्न जरी नोहे । एक हिरवे ते दुजे पक्व आहे ॥२॥
ज्ञान प्रभूचें होईल कीं विचार ते । भक्ति त्याची वहु कठिण जाण वारे
ज्ञान सारासार निवडि द्वैतें । भक्ति अद्वैते मिळवि श्रीहरी ते ॥३॥
आत्मज्ञानासी ज्ञान म्हणो येई । ज्ञान जिरतां ते भक्तिरूप घेई
परम मंगल ते ज्ञान परी स्फूर्ति । स्फूर्ति जातां मग सहज उरे भक्ति ॥

२

कळणें आत्मज्ञान वळणें तें ब्रह्मज्ञान समजावें ।
वळल्याविण हरिभक्ती करीन म्हणें त्यासि कांहि नचं ठावे ॥१॥
कळल्या मोक्ष जरी तो मोक्षाचा मोक्ष भक्तीचा ठायी ।
बंधाचि नाहीं ठावें मोक्षाची भावना तिथे नाही ॥२॥
तोय असे हें कळलें कळल्यानें काय भागते तहान ।
मी आत्मा हें कळतां वळल्याविण पूर्ण हें नव्हे ज्ञान ॥३॥
कळल्याचा मोद असें वळल्याचा तो प्रमोद जाणावा ।
स्त्रीलाभे मोद जसें संभोगानें प्रमोद वाढावा ॥४॥
ज्ञानें अज्ञान विरे ज्ञानाचा भाव विरुनि मौन पडे ।
मौनहि शून्यत्वाचा भाव विरे तै समूळ द्वैत उडे ॥५॥
ज्ञानाचें कार्य असे अज्ञानाशीच दूर करण्याचें ।
अज्ञान दूर होतां सिद्धस्वरूप दर्शन घडे साचें ॥६॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दर्शनमात्रें साधक पावे आनंद त्रिपुटिभेदानें ।
आनंदरूप आपण ध्येय त्रिपुटिभेदानें स्वयें होणें ॥७॥
सांख्यानें योगबळें व्यतिरेके कोण मी असें कळतें ।
'अन्वय वेदांतानें आपण जग एक प्रत्यया येते ॥८॥
जग मिथ्या ब्रह्म असे सत्य व्यतिरेक न्याय वेदांत ।
'सर्व खलु इदं ब्रह्म' अन्वय सिद्धांत सांगतो दत्त ॥९॥

१० दर्शन–साक्षात्कार–मीमांसा

दर्पण न बघे आपण आपणास पाहतों जैसे ।
जड मन बुद्धी त्यापरि अनुभव अपुलाच आपणा तैसे ॥१॥
आहे मुख हा निश्चय झाला पाहुनियां म्हणे आरसा ॥
"आरसा नसतां नाहीं मुख" या बोले ठरे न काय पिसा ॥२॥
आरशापूर्वी होतें मूख म्हणूनी तो घडे जसा आरसा ।
आपण स्वयंभू म्हणूनी मन-बुद्धीचा उठेच स्पष्ट ठसा ॥३॥
आपण निर्मी जयाला तो आपुली काय करील ती सिद्धी ।
मीच प्रकाश जयाला केवि प्रकाशे मलाच मन-बुद्धी ॥४॥
म्हणशिल आरसा न बघे जड तो परि दर्शनाशी आधार ।
दर्शनही जड खोटे प्रतिबिंबाचेंहि बिंब ते सार ॥५॥
दर्शनभाव नुरोनी दृष्टा जो आपणांत सहज उरे ।
नाहीं जाणीव-नेणिव निजरूपी दर्शनांत हेच खरें ॥६॥
आधी आपण मग हे दर्पण मन आपुला निर्माण ।
कल्पित वस्तु त्याच्या आधारे कल्पना दिसे जाण ॥७॥
जैसा भाव तैसाची घेऊनि आकार भावना नटते ।
दत्त दिसे, राम दिसे, परि जाणा भावरूप दर्शन तें ॥८॥
ध्यानानें जरि ध्याता पाही साक्षात् विविध आकार ।
'यदृष्टं तन्नष्टं'' दृष्टा आत्मा खरा निराकार ॥९॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आश्चर्य थोर वाटे ऐकून पाण्यास लागली तहान
"देव दर्शन" देवचि तूं रडशि नवल कां सान ॥१०॥
मोठा तटाक त्यांतुनी येई थोडे नळांतलें पाणी।
पाहूनि तटाक भुलला पाणी भरण्यास घागरी आणी ॥११॥
तैसा तूं सुखसागर वृत्तिसुखभास-दर्शना भुलशी।
एकचि कारण याला अज्ञानें जाणशी न आपणाशी ॥१२॥
पोट असें आपणाला परि त्याचें जाणवे न अस्तित्व।
होता विघाड पोटीं मग जाणवि पोट उमज हें तत्त्व ॥१३॥
आठव विसरावीणें सहज असुनि जाणिवेस कां येतो।
कारण शोधूं जातां ज्ञानांकुर विकृतिमाजिं की फुटतो ॥१४॥
स्वरूपमाजीं विकृती ती प्रकृती जाण ज्ञान तज्जन्य।
या ज्ञानें जें दर्शन विकृतिविण काय ते असें अन्य ॥१५॥
यास्तव निरसुनि ज्ञाना विकृतिचें मूळरूप अज्ञान।
ज्ञानचि केवळ ते तूं ज्ञानाला ज्ञान होई ते कवण ॥१६॥
पाण्या काय धुवावें, अमृतासी अमर कायसे करणें।
दर्शनरूपचि अससी तुं तुज तव दर्शना कसे होणें ॥१७॥
अग्निसी तावावे कैसे जलपान पाणि या करवीं।
आकाशासी शयन कोठें साक्षात्कारासि होय तुज तेवी ॥१८॥
दर्शन अथवा साक्षात्कार होईल अन्य वस्तूचा।
तुजविण कांहीं नसतां अनुभव कोणास येई कोणाचा ॥१९॥
यास्तव मनबुद्धीनें साक्षात्कारीं धरी न तूं हाव।
जाणिव तितकी **दत्तात्रय** जाणरूप स्वयंमेव ॥२०॥

११ ज्ञान-विज्ञान

पर-पंच नव्हे आपण भूतात्मक तो प्रपंच हे जाणें।
विषयांत सुख नाहीं आपण सुखरूप हे कळे ज्ञानें ॥१॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अज्ञान निरसण्याचें आहे इतुकेंच कार्य ज्ञानाचें ।
परि नच मीपण जाई उलट अहंभाव थयथया नाचे ॥२॥
मी देहभाव जाऊनि मी घेई ब्रह्मभाव परि खोटा ।
पूर्वी लहान होता 'मी' तोची वाढला आतां मोठा ॥३॥
मानसपुत्र असे 'मी' कल्पित असुनि करी मनोराज्य ।
जगसाम्राटचि झाला परमात्म्याशी दिसे अविभाज्य ॥४॥
संकल्पबळें निर्मी ब्रम्हा विष्णू महेश सुरनर ही ।
बंधन-मोक्ष तयाच्या हातीचा खेळ कीं असे पाही ॥५॥
दिवटा घेऊनि हातीं तो जैसा सांपडे न अंधार ।
ज्ञानमशालानें 'मी' पाहतां त्यासी कुठें नसे थार । ॥६॥
नाहींच कुठें त्याला नाहीं म्हणावयास काय हो भ्यावें ।
भीत्यापाठीं लागे राक्षस 'मी' हेंच खूप समजावें ॥७॥
'मी' नें जरी पांघरिल सात्विक मुनि-साधुचेंहि परि सोंग ।
मी तो मीच असें कीं प्रेतचि ते सजविलें मढें चांग ॥८॥
मिथ्या जाणुनि 'मी' सी आपण होऊन ब्रह्म वागावे ।
निघतां कांटा 'मी' चा ब्रह्माचा कारभार समजावे ॥९॥
पूर्वी मी मी म्हणुनी जें जें तूं कार्य करित होतासी ।
आतां भोजन आसन शयनादी ब्रह्म होऊनी करिशी ॥१०॥
परि ब्रह्म असे 'मी' हा भाव त्यजुनि ब्रह्म तें सहज असणें ।
नातरि वृत्तिबळानें होऊं पाहशील ब्रह्म तें फसणें ॥११॥
कारण मन-बुद्धींच्या आंत न मावूं शके परब्रह्म ।
आहे पूर्ण निवृत्ती वृत्तीचे तेथे काय तें काम ॥१२॥
हत्ती कैसा मावे मातीच्या लोटक्यांत तेंच शिरे ।
गजराज-उदरप्रांतीं किंवा पावेल नाश अविचारें ॥१३॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ब्रह्माकार कराया वृत्तीचें लोटके नये कामा ।
त्यांत समाव तितुक्या भागा समजेल तोच परमात्मा ॥१४॥
खंडित वृत्ती कैशी व्यापुनि राही अखंड परिपूर्णा ।
यास्तव लाग न तेथें ध्यानाचा व्यर्थ साधनें जाणा ॥१५॥
भात असे जे त्याला आणखी करण्यास जाई जो भात ।
भाताचा शीतहि ते नलगे हातांत होई तें खात ॥१६॥
त्यापरि सहज असे जें ब्रह्म तया ब्रह्म साधनें करितां ।
साधक ब्रह्म न होई केवल भ्रममात्र येतसे हातां ॥१७॥
भेटो जरि तूं जाशी जाणाया दूर तो असें पडला ।
हाव तुटें भेटीची तो भेटे नाहीं जाणतां त्याला ॥१८॥
येथें उपाय करिशी जो जो होईल तोचि अपाय ।
करणें सांडुनि बसतां आहे जें सहज ब्रह्म ते होय ॥१९॥
ज्ञानाच्या शस्त्रानें जिंकी अज्ञान करुनियां युद्ध ।
टाकुनी ज्ञानहत्यारें विज्ञानीं भोग स्वरूपसुख शुद्ध ॥२०॥
ज्ञानाचा रीघ नसे तेथें जाणीव काय कामा ये ॥
साधन सर्वहि जाणिवरूपी टाकोनि ब्रह्म होय स्वयें ॥२१॥
नापिक म्हणे 'करी मीं डोकें' परि काढी केस पांढरे काळें ।
ब्रह्म करी सद्‌गुरु काढूनि अज्ञान ज्ञानाचें जाळें ॥२२॥
कळल्यावरि मग वळतें ज्ञानामाजी असे अशी रीती ।
वळल्यावरि मग कळते विज्ञानी दोन एकची असती ॥२३॥
कळणें परोक्ष होतें पूर्वी अपरोक्ष तूं परी आतां ।
यास्तव वळणें वळणेंरूपचि कीं एक ते तुझें ताता ॥२४॥
आहे त्यास कशाला साधन–अभ्यास करिशि बाहेर ।
करि चाकरीस राजा स्वतःच्या असोनि माहेर ॥२५॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गोडीं सर्व परीनें सर्वांगानेंच ढेप गुळाची ।
त्यापरि सर्व जग तूं आपणासह ब्रह्मरूप कीं साची ॥२६॥
चंदन प्रतिमा जैसी सर्पांगे गांडतोंड चंदनची ।
जो ब्रह्मविद असे हो ब्रह्मचि तनु-प्राण-इंद्रिये त्याची ॥२७॥
निद्रा तीच समाधी खासी तोचि प्रसाद जाण तुझा ।
बोल तुझे ते वेदाचे दत्त करी तीच **सिद्धराम** पुजा ॥२८॥

२१. मीची कहाणी

वंध्यानंदन जो मीं राजा गंधर्वनगरीचा खोटा ।
ऐक तयाची कहाणी कांहिच नसुनी पराक्रमी मोठा ॥१॥
सत्तेनें प्रभुच्या 'मी' मत्त बने जणु प्रभूच कीं दूसरा ।
अग्नि न जळि तयालां आप न बुडवी न शोषवी वारा ॥२॥
देई झुगारुनि प्रभुला हाच करी थोर बंड थोतांड ।
मी निजसंकल्पानें निर्मी निमिषांत सर्व ब्रह्मांड ॥३॥
हाचि सृजि भक्ताला देवाला आणि देवभक्तीला ।
जप, तप, साधन निर्मी बंधन नसतेंच आणि मुक्तीला ॥४॥
शास्त्रानें नच तुटतो न मरे कवण्याहि साधनें अन्य ।
एक उपाय तयाला मिथ्या जाणील होय ती धन्य ॥५॥
मृगजल तरण्यालागी काय करील नाव नावाडी ।
मिथ्या निश्चय करणें याविण सारेच कष्ट कावाडी ॥६॥
मी गेल्याचें पाठीं तत्कृत वेदांत साधनें सरती ।
सरल्या स्वप्न निशीचें स्वप्नजगत् ओसरे जया रीतीं ॥७॥
मीपण कल्पितपुरुष ये रीती मरण ओढवे सोपा ।
मीपण गेल्या तूं-पण जाई उरे ब्रह्म सहजचीं बापा ॥८॥
मीपण निर्मित साधन-सामग्री शास्त्र वेद कांही नुरे ।
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
मीपणविरहित साधन यापुढती साधका खचीत उरे ॥९॥

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मग देह ब्रह्म मनही ब्रह्म मनाचेहि धर्म ते ब्रह्म ।
देहाचीं कर्मेही ब्रह्म जगत् सर्वं दत्त तूं ब्रह्म ॥१०॥

१३ स्वरूपगत–ऐश्वर्य

मायोपाधि तैसे जीव-शिवोपाधि स्वरूपगत बारे ।
ऐश्वर्य चार असती ऐक तुला लक्षणें कथित सारे ॥१॥
सिद्धी सर्व तऱ्हेच्या कल्पित ऐश्वर्य जाणा मायेचे ।
पापाचें पुण्याचें स्वर्ग नरक सुख दुःख द्वंद्व जीवाचे ॥२॥
औदार्य, ज्ञान, श्री, यश, धर्म, तसें जाण पूर्ण वैराग्य ।
ही षड्गुणसंपत्ती समजे ऐश्वर्य ईश्वरी भाग ॥३॥
जीवाच्या सापेक्षे ईश्वरभाव तिलांजली दिधली ।
ऐश्वर्य स्वरूपगत जे उरलें ती ऐक सद्गुरुबोली ॥४॥
मथ्या निश्चय करणें हेचि मरण जीव-शीव मायेचें ।
मेल्यावरि हे सारे ऐश्वर्य सहज नष्ट कीं त्याचें ॥५॥
वृत्ति–निवृत्ति दोन्ही असती ते जाण जीवसंकल्प ।
जीवचि गेल्यापाठी वृत्ति-निवृत्ति न राहते अल्प ॥६॥
कर्माचा जो कर्ता कर्मफलाचा तसाच जो भोक्ता ।
जीवचि मेल्यावरि मग उरला नैष्कर्म्यसिद्धिचा दाता ॥७॥
करूनी कर्म अकर्ता, भोगुनि विषयास तो नसे भोक्ता ।
कारण न उरे ते जीवाची अभिमान घ्यावया आतां ॥८॥
ज्ञानी अहंकार न घे हे बोलहि फोलसे गमें मातें ।
नाहिंच मीपण जेथें घेई अहंकार कोण मग त्याते ॥९॥
ऐसे सहज उरोनी मीपणविरहित कोटि संकल्प ।
उठले अथवा निमले निश्चित मग निर्विकल्प तूं बाप ॥१०॥
पूर्वी धनगर होता झाला राजा बळी मेंढचा ।
कोण म्हणे त्या राजा दीनदरिद्री अशाच रडतोंडचा ॥११॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

स्वरुपी निश्चय झाला मग वर्ते जीवास जरी रंक ।
भ्रांती फिटली नाहीं समजावा मूर्ख तो परम शंख ॥१२॥
घेउनि दर्शन होउनि राही जरि विश्वनाथ कशीचा ।
रामेश्वरा न जातां यात्रा हेतूच कीं विफल-त्याचा ॥१३॥
तैसे स्वरूपचि होउनि बसला उपभोगिला न आपणाला ।
जग विषयेंद्रियरूपें आपण ऐसा न भोग जो घडला ॥१४॥
काय करावी पदवी श्रीमंताची तशीच राजाची ।
भोग न श्रीमंतीचा जरि घडला व्यर्थ ती स्थिती साची ॥१५॥
श्रीमंत तरुण रोगी वृद्ध रते आपुलेनि ऐश्वर्ये ।
दाखवि तसा आपुला परमेश्वरभाव साधयाधैर्य ॥१६॥
केवल ब्रह्म जडत्वें पाषाणापरिच राहणें काय ।
मीपणविरहित सकलां विषयी निःशंक भोगणे होय ॥१७॥
'मी देव' मुखें बोले धैर्य नसे वर्तनीं विफल होय ।
बोले तैसाचि चाले वंदति जन पाय हे नवल काय ॥१८॥
ऐसा भोग घडे ज्या त्याचे ऐश्वर्य स्वरूपगत जाण ।
जाणुनि अज्ञानासम धैर्यानें शूर आदरी शेण ॥१९॥
लोकां विरुद्ध वर्तन हेंचि असें शेण त्या न जो डरला ।
तोच अलौकिक झाला डर तो पीछे रहीं सकल त्याला ॥२०॥
नवरेपण मिरवाया शोभें लग्नांत जेविं बाशिंग ।
त्याउपरी शिरी धरितां हास्यास्पद ते ठरे पशुशिंग ॥२१॥
वस्त्र अलंकाराचें लेणे बहुमोल रत्न भांगार ।
रतिसमयी ज्या रीती तेचि सुखाआड येति शृंगार ॥२२॥
अज्ञाल निरसण्याला ज्ञानाचा त्यापरी वडेजाव ।
विज्ञान समय येतां ज्ञाताज्ञाता नुरेचि कीं ठाव ॥२३॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मी देहभान तेव्हां जि ब्रह्माहं भावनेस ती पदवी ।
देह नव्हे मी कळतां ब्रह्माहं बोलण्यात काय चवी ॥२४॥
कथिलें आजवरी जें तुजला स्वप्नावरी सकल गेलें ।
आतां प्रभात झाला स्वानंदे नित्य तूं आतां डोलें ॥२५॥
विद्यानंद नव्हे हा किंवा नोहेचि वासनानंद ।
ब्रह्मानंद असे हा सगुण एक तूंच गोविंद ॥२६॥
मग देह ब्रह्म मनहि ब्रह्म मनाचेहि धर्म तूं ब्रह्म ।
देहाचि कर्मेही शिष्यगुरु **सिद्धराम** तूं ब्रह्म ॥२७॥
मग बोल तुझे दत्ता असती तें वेद करिशि ती पूजा ।
खासी प्रसाद तोची चालशि तो मार्ग तीर्थपन्थ तुझा ॥२८॥

१४ बद्ध-मुक्तता

ब्रह्मचि-होऊनि आतां म्हणसि कसें ब्रह्म करिल संसार ।
होतां पूर्ण निवृत्ति वृत्तीवर ये कसें ब्रह्म नवल फार ॥१॥
शुक वामदेव झाले वदली दोघेच मुक्त वेद श्रुती ।
शंका तुझी, शुकाचा सद्‌गुरू मग पावला न कां मुक्ती ॥२॥
प्रल्हाद, नारदादिक, शौनिक, व्यासांबरीष, तो भीष्म ।
ब्रह्म, विष्णू, महेश्वर हे सगळे पावले न कां धाम ॥३॥
शुक मुक्त वाद नाहीं परि पडला काय काष्ठवत सांगू ।
वृत्तीवर आल्याविण वदला कैसाच भागवत सांग ॥४॥
काष्ठासमान व्हावें ज्ञानोत्तर नियम हा जरीं असतां ।
अज्ञान लोक मागिल त्यांचा उद्धार कोण मग करतां ॥५॥
यास्तव मूर्छित पडणें लक्षण हें मूढ नाहीं ज्ञानाचे ।
व्यवहार सर्व करितां बिघडेना ज्ञान तो जरी नाचे ॥६॥
वदला अथवा बसला मूक तरी जाण देहसंबंध ।
येथें अनुभव कारण बाकीचें जाण सर्व ते बंध ॥७॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुभव म्हणजे निश्चय स्वरूपाचा पूर्ण तो खरा मोक्ष ।
धरुनी मीपण म्हणतां "मी ब्रह्महि" मुक्ती ती सापेक्षा ॥८॥

म्हणतो "मी मुक्त" असे, तोच खरा जाण बद्ध इरसाल ।
स्वरूपांत बंध-मुक्त अमुक असें म्हणसि सर्व तें फोल ॥९॥

बंधन आहे "मी" ला जेव्हां तो जन्मला नसोनीच ।
मिथ्या कळतां मेला, गेला मुक्तीस जाण तो "मी" च ॥१०॥

ही काल्पनीक मुक्ति त्यापूर्वी नित्यमुक्त गोविंद ।
बंधचि नाहीं तेथें मुक्तिचा केविं होय आनंद ॥११॥

गोविंद तूंच असती मी-तूंपणभावहीन गुरुपुत्रा ।
बंधन मुक्ति 'मी' ला मायेचा हा विनोद रे ताता ॥१२॥

नसल्याच 'मी' स कल्पुनि त्यास दिलें जन्म आणि मरणाला ।
हनुमान-भीष्मदुहिता लग्नाचा सोहळा जसा झाला ॥१३॥

डोळ्यांत खुपें जैसा दगडी कीं साखरीं खडाच असो ।
अज्ञान बंध स्वरूपीं ज्ञानहि तें बंध कांहीं तेथे वसों ॥१४॥

मी मुक्त म्हणूनि बोला योगी, त्यागी, मुनींद्रही बोला ।
बोला कांहीं तरी हो समजा दिधलाच वृत्तिनें झोला ॥१५॥

मी ब्रह्मचारी अथवा ब्रह्म, विरागी, विदेह, मुनि साचा ।
आग्रह बोलविण्याचा मायेनें डाव टाकिला "मी" चा ॥१६॥

घर पेटले विझाया वर ओती घासलेट जे देख ।
त्यापरि 'मी' न मरे तो पुष्टची होईल साधनें आणीख ॥१७॥

अमक्या-तमक्यापासुनि देवा करि संकटातुनी मुक्त ।
'मजला माझ्यापासुनि सोडवि' म्हणतोच एक ना भक्त ॥१८॥

निजल्या ये जागवितां परि झोंपचेंच घेतले सोंग ।
जागविता ये कैसे मीपण तैसेंच काल्पनिक ढोंग ॥१९॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

केवळ ओळखणेंची निजला परि तो असे खरा जागा ।
जागृत असे सदोदित ब्रह्म हि 'मी' त्याच घेऊनीं सोंगा ॥२०॥
चोराला ओळखितां त्याची करी न तो चोरी ।
मीपण मिथ्या जाणें त्यांसी तो 'मी' करी न शिरजोरी ॥२१॥
ज्ञानी 'कुछ नहि जानें' राही स्वरूपांत तो सदा मत्त ।
जाणें न लोकरीती वागे मूर्खापरीच मनसोक्त ॥२२॥
मत्त तरी तो देई ढुसण्या बेलापरीच कीं काय ।
मत्ताचा अर्थ असे "तृप्त" जसा जेवल्यावरी होय ॥२३॥
वागे मूर्ख जसा तो याचाही अर्थ नाही गावाळ ।
चिवडी चिंध्या न करी चाळेंही वेडपा जसा बाळ ॥२४॥
ज्ञानापूर्वी होता मूर्ख जसा वागलाच अज्ञानें ।
ज्ञानोत्तर ही तैसा वागे ज्ञानी स्वभावधर्मानें ॥२५॥
मीपण जातां कैसें वागावें या जगीं तरी ऐक ॥
रीत न अमकी ठेवी सोडी जगरीत आणि लौकीक ॥२६॥
जें तुजला ज्यावेळीं युक्त तसे वाग हीच ती रीत ।
गिरवू नको कुणाचा कित्ता मग तो कुणीं असो तात ॥२७॥
अर्थ कुणी न पुसावा 'रीतीचा' मीपणेंच जो नटला ।
दत्तत्रय नच सांगे जा पुसण्या शरण **सिद्धरामाला** ॥२८॥

॥ राजाधिराज सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराजकी जय ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आमच्या पुस्तकांचें संक्षिप्त विवरण

१) आत्मज्ञानाची गुरुकिल्ली (१३ वी आवृत्ती)

श्रीसद्गुरु सिद्धरामेश्वर महाराजांनी सर्व मानवोद्धाराकरितां केलेल्या सुरस आणि स्वानुभवपूर्ण प्रवचनांचा बोधमय ग्रंथ! या ग्रथांत आपण स्वतःस जाण्याबद्दल (आत्मज्ञानाबद्दल) विवेचनाकरून मनन, निदिध्यास या मार्गाने चारी देहापलीकडे असलेल्या सच्चिदानंद आत्म्याचा आनंद अनुभवण्यासाठीं सुलभ भाषेंत बोध केला आहे. हा ग्रंथ अभ्यासून आत्मानुभवाचा आनंद लुटा!

२) सुलभ वेदांत लहरी (९ वी आवृत्ती)

हा ग्रंथही श्रीसद्गुरु सिद्धरामेश्वर महाराजांचाच असून, त्यांत जीव जन्मापासून ब्रह्मच आहे अशा सिद्धांताप्रत पोचण्यापर्यंतची १७ प्रवचनें अनुभवपूर्ण, अधिकारवाणीने, मनावर परिणामकारतेनें ठसतील अशी आहेत. त्यांच्या अभ्यासानें आत्मानंदाच्या डोहांत पोहा.

३) वचनामृत (९ वी आवृत्ती)

हे पुस्तकही श्रीसद्गुरु सिद्धरामेश्वर महाराजांचेंच असून, ह्यांत व्यवहारांतही परमार्थ कसा आचरता येतो. याबद्दल सुंदर विवेचन केले आहे. व्यवहारांतील रूढ शब्दाचे पारमार्थिक अर्थ येथें दिलें आहेत तें फारच उद्बोधक आहेत.

४) परमार्थ मार्ग प्रदीप (११ वी आवृत्ती)

यांतील पहिल्या भागांत परमार्थाचे रहस्य सांगितले आहे. खरा सद्गुरु कसा असतो याचे विवरण केले आहे. श्री सदगुरु भाऊसाहेब महाराजांच्या सांप्रदायांतील सत्पुरुषांनी केलेली परमार्थप्रतिष्ठा आणि त्यांची चरित्रे आहेत. दुसऱ्या भागांत साधकास उपयुक्त असा उपासनासंग्रह दिला आहे. हा सर्वांना उपयुक्त असा ग्रंथ आहे.

५) भगवद्गीतेंतील ध्यानयोग (७ वी आवृत्ती)

श्रीकृष्ण भगवंतानीं गीतेच्या सहाव्या अध्यायात अर्जुनाला ध्यानयोग सांगितला आहे. यांत मन काबुत ठेऊन ध्यानयोग कसा साधावा त्याचे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सविस्तर विवरण केले आहे. याबद्दल आद्य शंकराचार्य मध्वाचार्य, रामा - जाचार्य यांची मते आणि ज्ञानेश्वर महाराजांपासून लोकमान्यापर्यंत, सर्वांची विवरणे आणि आधुनिक कालांत सर्वांना आत्मोन्नतीसाठी ध्यानयोग कसा साधता येईल आणि प्रश्नोत्तररूपाने केलेले सुबोध विचेतन या ग्रंथांत पहावयास मिळेल.

७) विवेककुंज (४ थी आवृत्ती)

स्वार्थामुळें मनुष्याच्या हातातून अनेक दोष कळत न कळत घडतात ते न व्हावे म्हणून व निंदेपासून दूर राहून सन्मार्गात कसे वागावे हे समजून घेण्यासाठी हां 'विवेककुंज' ग्रंथ प्रत्येकाला उपयोगी पडण्यासारखा आहे. या ग्रंथाच्या कन्नड भाषेंत तीन आवृत्ती निघाल्या आहेत. तेव्हां हा ग्रंथ नित्य वाचनांत ठेवल्याने आपले जीवन सुकर व धन्य होईल.

७) प्रबोध गीते (४ थी आवृत्ती)

श्रीमत् आद्य शंकराचार्य यांनी 'प्रस्थान त्रयी' वर भाष्य लिहून महान उपकार केले आहे. आणि बोधपर लहान लहान अनेक प्रकरणे लिहिले आहेत. त्यांतील २१ प्रकरणे या पुस्तकांत संग्रहीत केली आहे, ती ज्ञान पिपासु साधकाला ज्ञानगंगा लाभल्या सारखीच आहे.

८) भक्तीसाठी भांडण कां? (२ री आवृत्ती)

कित्येक उपासक आपल्या देवतांचे महत्व वाढविण्याच्या भरात अन्य देवतास्वरूपाना लघुत्व आणतात हा विचार दूर करण्याच्या हेतुने व सर्व धर्म समभाव येण्याकरितां हा ग्रंथ मुद्दाम तयार केला आहे.

९) श्रीसंत एकनाथ महाराज यांचे दर्शन (४थी आवृत्ती)

हा ग्रंथ सर्व साधकाना अत्यंत मार्ग दर्शक असून, सद्गुरु शरणांगति, भक्ति, ज्ञान, स्वरूपानुभवाचा आनंद दाखविणार आहे.

१०) सांप्रदायिक भजन (१३ वी आवृत्ती)

श्रीसद्गुरु भाऊसाहेब महाराजांच्या सांप्रदायांतील उपासनेंतील नित्य म्हटल्या जाणाऱ्या भजनाचा व पदाचा संग्रह केलेला आहे यांत अनेक संताचे अभंग एकत्रित आहेत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

११) यशस्वी जीवन दर्शन (४ थी आवृत्ती)

प्रत्येकानीं आपल्या घरच्या माणसाबरोबर अत्मीयतेने वागून; नंतर व्यवहारांत, समाजांत चांगल्यारीतीने कसे वागता येत आहे आणि एकमेकांत प्रेम व शांती कसे राखता येत आहे. त्याबद्दल श्रीसद्गुरु गणपतराव महाराजानीं उत्कृष्ट विवरण देऊन सर्वांनां मार्ग दर्शन या लहानशा ग्रथांत केले आहेत.

१२) सुबोध कर्मयोग (२ री आवृत्ती)

वरील ग्रंथात सांगितल्याप्रमाणे मन शांत ठेऊन विवेकाने सर्व कार्य केले तर तेच ईश्वरार्पण सेवा घडून आपोआप सहजरीतीने कर्मयोग साधता येतो म्हणून श्रीसद्गुरु गणपतराव महाराजानीं आपल्या स्वानुभवानें 'सुबोध कर्मयोग' लिहिले आहेत. हा ग्रंथ सर्वांना अत्यंत उपयुक्त आहे

१३) आत्मानुभवाचीं साधनें (२ रे मुद्रण)

तीव्र इच्छा असणाऱ्या साधकांना ज्ञान, वैराग्य, गुरुभक्ता मुक्ति आणि विशेषता साधनाबद्दल अन्य कोणत्याही अध्यात्म ग्रंथात स्पष्टीकरण नसलेली अनेक रहस्यें येथे सुलभ रीतीने सांगितले आहेत असे दिसून येईल.

या शिवाय भक्ति–उपासनासाठी मिळणारी अमोल पुस्तकें

१) भक्तिमंजरी (श्री जगद्गुरु शंकराचार्य विरचित) ६–००
२) संत आणि सद्गुरुमहिमा श्री एकनाथ महाराज विरचित),, (२ रे मुद्रण) ५–००
३) श्रीविठ्ठल नाममहिमा ,, ३-५०
४) श्री सद्गुरु महात्म्य ,, ४-००
५) श्रीदत्त सहस्रनाम (श्री जगद्गुरु शंकराचार्य–विरचित) (६ वे मुद्रण) २–५०
६) महायोगी रेवणनाथ दर्शन (३ रे मुद्रण) ६–००
७) श्री एकनाथ महाराज यांची जीवनगंगा ,, १०–००

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

या ग्रंथामध्यें–

.... या चुकीच्या एका भावनेसाठी 'देव-भक्ताशी पडली तुटी' असे झाल्यास काय नवल! अनेक कर्मरूपानीं जें जें कोणी जें जें कांहीं करीत आहेत तीं त्यांची सर्व शुभाशुभ कर्मेही या देवावर चढत असलेली फुलेच असून त्याची पूजाच होत आहे. पंचकर्मेंद्रिये व पंचज्ञानेंद्रियामार्फत शब्द, स्पर्श, रूप रस, गंध या विषयांचा नित्य अभिषेक याच महा-देवावर होत असतो. हें ज्याला गुरुकृपेनें समजेल तोच भक्त धन्य होय! या भक्ताची सहज कर्मे ब्रह्मार्पण होतात.

❊ ❊ ❊

......ज्याप्रमाणें तुपांत तळून निघालेल्या कोरड्या जिलबीस साखरेच्या पाकांत टाकल्यावर जसा त्यास रसाळपणा येतो त्याचप्रमाणें हा कोरडा आत्मज्ञानी ज्ञानोत्तर भक्तीने पूर्णत्वास पोहोचतो.

–श्री समर्थ सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराज.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri